८०

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२०५

REFBK-0010848

# साधना

रवींद्रनाथांच्या
पुस्तकाचा
संक्षिप्त अनुवाद

साने गुरुजी

# साधना

रवींद्रनाथांच्या
पुस्तकाचा
संक्षिप्त अनुवाद

•

साने गुरुजी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०८४८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७६६३ वि:
क्रमांक 1275 नों. दि: १७/१२/६७.
REFBK-0010848

साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार, पुणें २.

किंमत रुपये २.००

▣ सर्व हक्क स्वाधीन

▣ प्रथम आवृत्ति : दिवाळी १९६०

▣ प्रकाशक :
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन,
४३०–३१ शनिवार, पुणें २.

▣ मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार, पुणें २.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्ति आणि विश्व | १ |
| २ | आत्म्याची अनुभूति | १५ |
| ३ | पापाचा प्रश्न | २८ |
| ४ | व्यक्तीचा प्रश्न | ३९ |
| ५ | प्रेमरूपानें साक्षात्कार | ५२ |
| ६ | कर्मरूपानें साक्षात्कार | ६५ |
| ७ | सौंदर्यरूपानें साक्षात्कार | ७७ |
| ८ | अनन्ताचा साक्षात्कार | ८३ |

रवींद्रनाथांचें 'साधना' हें पुस्तक साने गुरुजींच्या अत्यंत आवडत्या पुस्तकांपैकीं एक होतें. रामकृष्ण, रवींद्र आणि गांधी हे त्यांचे आदर्श पुरुष होते. यांचा एकपराधांश जरी आपल्या जीवनांत आला तरी आपलें जीवन धन्य होईल, असें त्यांना वाटत असे.

साधना साप्ताहिक साने गुरुजींनीं सुरू केल्यानंतर रवींद्रनाथांच्या 'साधना' या पुस्तकाचा अनुवाद त्यांनीं साररूपानें क्रमशः ता. २८ मे १९४९ ते २४ सप्टेंबर १९४९ या काळांत दिला. वास्तविक या पुस्तकाचा अनुवाद त्यांनीं १९३७ सालींच करून ठेवला होता. त्या वेळींहि तो अनेकांना स्फूर्तिदायक वाटला होता. तोच अनुवाद आतां या रवींद्र-शताब्दीच्या वर्षीं पुस्तकाकारांत उपलब्ध होत आहे. पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामीं श्री. रवींद्र गुजर आणि मुझफर फिदाहुसेन यांनीं मदत केली. ते त्यांचे प्रेमाचे कष्ट असल्यानें औपचारिक आभार त्यांना रुचणार नाहींत.

रवींद्रांच्या सर्व साहित्याचा मराठींत अनुवाद करण्याची गुरुजींची मनीषा होती. विश्वभारतीकडून त्यांनीं त्यासाठीं परवानगीहि मिळविली होती. जर रवींद्रांच्या साहित्याचा साने गुरुजींच्या लेखणींतून उतरलेला मराठी अनुवाद उपलब्ध झाला असता तर ती एक अपूर्व गोष्ट झाली असती. योगायोग तसा नव्हता! पण 'साधना' साररूपानें का होईना आज उपलब्ध होत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि. ..................
क्रमांक .................... नों. दि. ..................
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८४८

# व्यक्ति आणि विश्व

---

ग्रीक संस्कृति नागरिक जीवनांतून विकास पावती झाली. आजकालच्या बहुतेक सर्व संस्कृति नागरिक जीवनांतूनच फुलल्या. नागरिक जीवनाच्या मुळाशीं स्पर्धेनें मिळविणें व मिळविलेलें टिकविणें ही वृत्ति असते. या वृत्तीमुळें भेद-भाव उत्पन्न होतो. दुसऱ्याच्या मालमत्तेपासून आपली मालमत्ता अलग करून तिचें रक्षण करणें ही वृत्ति येथें असते. शहराभोंवतीं असणाऱ्या भिंती हेंच दर्शवतात. या भिंती जगापासून पृथक् राहण्याची भावना निर्माण करतात. आपल्या मनाभोंवतीं आपण तटबंदी करतों. मनांत संशय वागूं लागतो. नवीन विचाराला आपल्या मनांत येण्यासाठीं झगडावें लागतें.

परंतु प्राचीन आर्य भारतांत आले त्या वेळची परिस्थिति याहून निराळी होती. ही भरतभूमि म्हणजे वनाकाननांनीं आच्छादित असा देश. सूर्याचा प्रखर ताप आणि उन्हाळी वारे नि वादळें यांपासून रक्षण व्हावें म्हणून आपल्या पूर्वजांनीं या वनांचा आश्रय केला. गायी चरायला भरपूर गायरानें होतीं. झोंपड्या बांधायला साधनांची वाण नव्हती. जेथें नैसर्गिक रक्षण मिळे, पाणी भरपूर असे, खाण्यापिण्याची वाण नसे, तेथें ते बहुधा वस्ती करीत. भारतांतील संस्कृति तपोवनांत जन्मली. सभोंवतालच्या विशाल निसर्गानें भारतीय संस्कृतीस रंगरूप दिलें. जीवनाच्या आवश्यक वस्तु मिळाल्यामुळें एक प्रकारची निश्चितता असे. कोणी म्हणतात कीं, जीवनाच्या निश्चितीमुळें बुद्धीचा विकास नीट होणें, प्रगतीला पोषक वृत्ति निर्माण होणें तितकें सुलभ नसतें. परंतु आर्यावर्तांतील आर्यांची बुद्धि क्षीण झाली नाहीं; त्यांच्या उत्साहशक्तीचा झरा कधीं सुकला नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांच्या बुद्धिशक्तीची विशिष्ट रीतीनें वाढ होण्यास मदतच झाली. सभोंवतीं सदैव वर्धमान असें सृष्टीचें जीवन असल्यामुळें आपल्या मालमत्तेचें किल्लेकोट

बांधून संरक्षण करण्याची वृत्तीच त्यांच्यांत उत्पन्न झाली नाहीं. अधिकाधिक मिळवावें, असें त्यांच्या मनांत येत नसे. आसपासच्या विशाल सृष्टीच्या सान्निध्यांत राहून तिच्याशीं स्वतःचें अद्वैत अनुभवावें, स्वतःच्या चिच्छक्तींचा विकास करून घ्यावा, असें त्यांना वाटे. सर्वसंग्राहक सत्याप्रमाणें आपण व्यापक व्हावें, अशी त्यांची असोशी असे. विशाल जीवनांत संकुचित डबकीं करून राहणें शक्य नाहीं, ही गोष्ट त्यांनीं ओळखली. आणि वस्तुमात्राशीं अद्वैत अनुभवूनच आपण ज्ञान मिळवूं शकूं, असें त्यांना वाटे. विश्वजीवन आणि मानवी जीवन यांच्यांतील ऐक्यसंगीताचा साक्षात्कार करून घ्यावा, हें भारतीय ऋषींचें ध्येय असे.

हळूंहळूं ऋषींच्या तपोवनांशेजारीं शेतेंभातें झालीं. समृद्ध नगरें उभीं राहिलीं. पृथ्वीवरील इतर सत्तांशीं संबंध ठेवणारीं साम्राज्यें जन्मलीं. परंतु ऐहिक वैभवाच्या शिखरावर चढूनहि येथील जनतेचें हृदय आत्मसाक्षात्कारासाठीं अखंड धडपडणाऱ्या तपोवनांतील जीवनालाच प्रणाम करी. वैभवशाली भारताचें हृदय तपोवनांतील आश्रमाचें तें सरलसुंदर, मधुरगंभीर जीवन बघून रोमांचित होई. जनतेच्या जीवनाला या आश्रमीय ज्ञानभांडारांतून उत्साह नि प्रेरणा मिळे.

आम्ही निसर्गाला जिंकणारे अशी युरोपियन लोक शेखी मिरवतात. जणुं विरोधी हातांतूनच सारें हिसकावून घ्यावयाचें आहे असें त्यांना वाटे. नागरजीवनाचा तो परिणाम आहे. भिंती बांधून शहरें करणाऱ्या संस्कृतीचा तो परिपाक. तेथें मनुष्य निसर्गांत व स्वतःमध्यें भेद मानायला शिकतो. परंतु विराट् प्रकृतीच्या पोटांतच निसर्ग व मानव राहत असल्यामुळें असा भेद करणें कृत्रिम अतएव असत्य आहे. दोहोंमिळून एक महान् सत्य होतें, असें येथील ऋषि मानीत. मी आणि मदितर यांच्यांत द्वैत नसून अद्वैत आहे, यावर येथें भर दिला जाई. सृष्टि व आपण अजीबात विसदृश आणि निराळे असूं तर सृष्टीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध जडणेंच अशक्य होईल, असें ऋषि म्हणत. स्वतःच्या गरजांसाठीं राबावें लागतें ही गोष्ट खरी. शेतीसाठीं नांगरावें लागतें. परंतु याचा अर्थ सृष्टि विरोधी आहे असा नव्हे. तुम्ही नांगरतां तर एका दाण्याचे शंभर करून भूमाता तुम्हांला भेटायला येते. मानव आणि निसर्ग यांच्यांत जिव्हाळ्याचा संबंध हवा.

एकाच मार्गानें जाणारे दोन प्रवासी त्या रस्त्याकडे भिन्न दृष्टीनें बघतात. एक म्हणतो. "हा रस्ता प्रियजनांच्या भेटीच्या आड येतो." दुसरा म्हणतो, "ह्या रस्त्याचे किती उपकार ? तो प्रियजनांकडे मला नेतो." पहिला मनुष्य प्रत्येक पाऊल रस्ता तुडवण्यासाठीं जणूं टाकतो, तर दुसरा मनुष्य त्या रस्त्याला ध्येयप्राप्तीचें साधन मानतो. प्रत्येक पाऊल ध्येयाच्या जवळ नेत आहे या भावनेनें तो टाकतो. भारतीय ऋषींची निसर्गाकडे पाहण्याची ही दृष्टि होती. मानव आणि सृष्टि यांच्यांत विरोध नसून सहकार आहे, हा विचार एक थोर सत्य म्हणून येथें आदरिला गेला. मनुष्यांत विचार करण्याची शक्ति आहे, एवढ्यावरून सृष्टीपासून तो निराळा, असें नाहीं अनुमान काढायचें, तर त्याचें मन आणि ही बाह्यसृष्टि यांच्यांत ऐक्य आहे म्हणून तो विचार करूं शकतो असें समजायचें. सृष्टशक्तींचा आपण उपयोग करतों म्हणून का सृष्टीपासून निराळे ? आपण असा उपयोग करून घेऊं शकतों—कारण दोघांना व्यापून असणारी शक्ति एकच आहे. मनुष्याचें अंतिम ध्येय सृष्टीच्या अंतिम ध्येयाला विरोधी असणें शक्य नाहीं. सृष्टींतून प्रकटणारी इच्छा आणि मानवी इच्छा यांत अंतीं मेळच दिसेल. कधींहि विरोध दिसणार नाहीं.

निसर्ग म्हणजे जडवस्तूंचा मेळावा असें पाश्चिमात्य मानतात. मानवेतर प्राणीहि ते यांतच धरतात. त्यांच्या मतें मानव व मानवेतर सृष्टि यांच्यांत तिळभरहि साम्य नाहीं. हे लोक जीवनक्रमांत जें नीच, खालच्या पातळी-वरचें तें म्हणजे प्रकृति, निसर्ग; आणि जीवनक्रमांतील परमोच्च म्हणजे मानव असें समजतात. त्याला मानव म्हणावें जेथें परिपूर्णतेचा छाप आहे; नीतीचा जेथें विचार आहे. मानवेतर सृष्टि ही सर्व खालची. परंतु हा जो भेद पाश्चिमात्य करतात तो कळी व फूल यांच्यांतील भेदाप्रमाणेंच नाहीं का ? येथील ऋषींना सृष्टीशीं स्वतःचा संबंध जोडायला संकोच नाहीं वाटला. विराट् विश्वाबरोबर मानवाचा अविभक्त संबंध खुल्या मनानें भारतीय हृदयानें स्वीकारला आहे.

व्यक्ति आणि विश्व यांना व्यापणारें अद्वैत म्हणजे केवळ बुद्धीचा विलास असें येथें मानण्यांत येत नसे. जीवनांत हें अद्वैत अनुभवणें म्हणजेच

जीवनाचा महान् उद्देश, असें येथें मानलें जाई. संयम, सेवा, मनन, चिंतन यांनीं आर्यलोक स्वतःचें जीवन इतकें निर्मळ करीत, दृष्टि इतकी विशाल करीत कीं, सारें चराचर त्यांना एकरूपच दिसे. पृथ्वी, प्राणी, प्रकाश, फुलें, फळें त्यांना केवळ जड नसत वाटत. काम झालें कीं फेंकावें अशी नसे त्यांची दृष्टि. संपूर्णतेचें ध्येय मिळावें म्हणून, जीवनांतील अंतिम आदर्श प्राप्त व्हावा म्हणून प्रत्येक वस्तु त्यांना मोलाचीच वाटे. संगीताला साऱ्या सुरांची जरूरी, त्याप्रमाणें सर्वांगपूर्ण जीवन अनुभवण्यासाठीं वस्तुमात्राची आवश्यकता. जीवनाच्या अंतिम रहस्याचा मानवी जीवनाशीं खोल प्राणमय संबंध आहे, असें येथील ऋषींना अंतःस्फूर्तीनें कळून चुकलें होतें. हें रहस्य शोधून त्याच्याशीं मानवानें डोळस संबंध जोडला पाहिजे. हा संबंध भौतिक ज्ञानासाठीं किंवा भौतिक विजयासाठीं म्हणून केवळ जोडायचा असें नाहीं, तर अपार अनिर्वचनीय आनंदानें उचंबळलेल्या हृदयानें जोडायचा. हा संबंध लोभमूलक नसावा, प्रेममय आनंदमय असावा, बाह्य नसून आंतरिक जिव्हाळ्याचा असावा, असें त्यांना वाटे.

हें जगत् जसें दिसतें तसें वास्तविक नसतें, ही गोष्ट भौतिक शास्त्रज्ञहि मानतात. पृथ्वी किंवा पाणी यांच्या रूपानें जे पदार्थ दिसतात, ते वास्तविक पृथ्वी आणि पाणी यांच्या रूपानें परिणत झालेल्या शक्तीचीं रूपें असतात. ही शक्ति पृथ्वी नि पाणी यांच्याच रूपानें कां भासते, याचें उत्तर शास्त्रज्ञ देऊं शकत नाहींत. आध्यात्मिक दृष्टीचा मनुष्यहि पृथ्वी व पाणी यांच्याकडे पाहतो, परंतु निराळ्या दृष्टीनें. पृथ्वी व पाणी यांच्याद्वारा प्रकट होणारी सर्वशक्तिमान् सत्ता आणि त्या सत्तेला ओळखणारी स्वतःमधील अविनाशी सत्ता यांत तो संबंध पाहतो. स्वतःमधील आत्मतत्त्वच बाहेरच्या या वस्तूंनीं नटलें आहे, असें त्याला वाटतें. जी शक्ति माझ्या द्वारें कार्य करीत आहे, तीच बाहेरहि. भौतिक ज्ञानाहून हें ज्ञान निराळें आहे. भौतिक ज्ञानानें मनुष्य बलशाली होईल. अद्वैताच्या ज्ञानानें तो अपूर्व आनंद अनुभवील. भौतिक ज्ञान सत्ता देईल. आत्मिक ज्ञान शान्ति देईल. भौतिक दृष्टीहून अधिक उच्च दृष्टि न घेणाऱ्यास, आध्यात्मिक दृष्टीला या विराट् विश्वांत काय दिसतें तें कधींहि समजणार नाहीं, कल्पनाहि येणार नाहीं. आध्यात्मिक

दृष्टीचा मनुष्य नदींत स्नान करतो, तेव्हां तें पाणी देहालाच नाहीं तर मनालाहि शुद्ध करतें. तें पाणी त्याच्या आत्म्यासहि स्पर्श करतें. जोंपर्यंत मानव सृष्टीशीं अद्वैत अनुभवणार नाहीं तोंवर आपण दुर्गम दुष्पथ अंधारांत येऊन पडलों आहोंत, असेंच त्याला वाटेल. वस्तुमात्रांत असलेलें सनातन आत्मतत्त्व अनुभवूनच मनुष्य मुक्त होत असतो. जीवनाचा संपूर्ण हेतु मनुष्य या अनुभवानेंच समजूं शकतो. सृष्टीशीं मानवाचें ऐक्य आहे. यावर हिंदुधर्मानें भर दिला आहे. उगवत्या सूर्याला आपण अर्घ्य देतों. वाहत्या नदीला प्रणाम करतों. भूमातेला वंदितों. कां ? आपल्यामधील चैतन्य बाह्य-सृष्टीशीं अखंड अद्वैत अनुभवीत असतें.

सृष्टीशीं अद्वैत अनुभवणाऱ्या ऋषींनीं पदार्थांमध्यें असणारी भिन्नता स्वीकारली नव्हती असें नाहीं. ही भिन्नता न स्वीकारूं तर मानवी जीवनच अशक्य होईल. ईश्वराच्या या सृष्टींत मानवप्राणी श्रेष्ठ कां, या विषयाचें भारतीय मत इतरांच्या मताहून निराळें आहे. मनुष्य मानवेतर सृष्टीला जिंकून घेतो म्हणून तो श्रेष्ठ असें नाहीं; तर या चरचराशीं अद्वैत अनुभवण्याची शक्ति त्याच्याजवळ आहे म्हणून तो मोठा. भारतीय तीर्थक्षेत्रें अशा ठिकाणीं आहेत, जेथें सृष्टीचें भव्य सौंदर्य आहे. तेथें गेल्यानें रोजच्या स्वार्थी संसारांतलि संकुचित मन विशाल होतें व अनंताशीं एकता अनुभवूं शकतें. या अनुभवासाठींच जीवमात्राविषयीं दया, सहानुभूति, प्रेम असण्याची आपणांस जरूरी वाटली. भूतमात्राविषयींच्या सहानुभूतीची ऋषिमुनींनीं शिकवण दिली. या अनुभवासाठींच मांसाशन-त्यागाचा जगांतील अद्वितीय प्रयोग येथें आपण केला.

ज्या वेळेस भिंती बांधून मनुष्य स्वतःला विश्वापासून अलग मानतो, ‘ या विश्वांतीलच एक ’ असें स्वतःला न मानतां विश्वाचा दावेदार होऊन एकटा एका बाजूला उभा राहतो, त्या वेळेस मोठी बिकट परिस्थिति उत्पन्न होते. सृष्टीजवळचा संबंध सोडून मानवजातीच्या अलग एकेरी दोरीवरूनच चालण्याचा जेव्हां मनुष्य प्रयत्न करूं लागतो, तेव्हां त्याला फार जपून सर्कस करावी लागते. जीवनांतील गुंतागुंतींनीं तो बेजार होतो आणि परमेश्वराच्या डोक्यावर सारें खापर फोडतो. ‘ ही सृष्टि मला छळण्यासाठीं

ईश्वरानें निर्माण केली' असें तो अट्टाहासानें म्हणतो. आणि सृष्टीला मी जिंकीन अशी ऐट मारतो; आपली पाठ थोपटून घेतो.

सृष्टीशीं असें भीषण वैर मानून राहणें अशक्य आहे. मनुष्यानें स्वतःच्या जीवनाची समग्रता समजून घेतली पाहिजे. या विराट् जीवनांतील स्वतःचें स्थान त्यानें जाणलें पाहिजे. मधाच्या पोळ्यांत राहून कधींहि मध निर्माण करतां येत नसतो. मानवी जीवनाचा मधु-झरा स्वार्थाच्या पलीकडे जाल तेव्हांच दिसेल. स्वतःच्या योगक्षेमासाठीं स्वतःवरच सारा भर देऊन मनुष्य विश्वापासून अलग होऊन उभा राहतो तेव्हां तो शेवटीं अस्वस्थ होतो, संतप्त होतो. वेडा बनून स्वतःचेच तुकडे करूं लागतो, स्वतःलाच फाडफाडून खाऊं लागतो. मानवी जीवनांतील संपूर्णता भिरकावून दिल्यामुळें त्याला गरिबींतील साधेपणा दिसत नाहीं, श्रीमंतींत उदारता दाखवितां येत नाहीं. गरिबी त्याला भेसूर वाटते, श्रीमंती त्याला मदान्ध करते. त्याची तृष्णा विकासाचें साधन न राहतां जीवनाचें मातेरें करतें. भोगवृत्तीला सीमाच उरत नाहीं. संयम, प्रमाणबद्धता यांचा अस्त होतो. मग वासनातृप्ति हेंच एक ध्येय समोर उरतें. विश्वजीवनापासून अलग होऊन जेव्हां मानव जगूं पाहतो, तेव्हां तो दुसऱ्यास प्रेमानें आकर्षूं शकत नाहीं. कांहीं तरी चमत्कार करून, अद्भुत करून तो दुसऱ्यास चकित करूं पाहतो. कलेंत नवीनता आणायला धांवतो. परंतु नवीन नवीन स्वरूपांत प्रकट होणारें जें सनातन सत्य तें मात्र त्याला दिसत नाहीं. साहित्यांतहि मानवाचें संपूर्ण दर्शन होत नाहीं. साधेपणांतील मानवाचा मोठेपणा वाङ्मयांत प्रकट होत नाहीं. मनुष्य म्हणजे मानसशास्त्रीय कोडें, वासनामय प्राणी, एखाद्या अत्युत्कट विकाराचें-भावनेचें मूर्तरूप, अशा प्रकारें तो दाखवला जातो. कृत्रिम प्रकाशाच्या झगमगाटांत मानव उभा दिसतो व भेसूर वाटतो. मानव मानवापुरताच पाहणारा झाला कीं, त्याच्या हृदयांतील थोर भावांचें पोषण होत नाहीं. त्या भावनांना तेथें मूळ धरायला जागाच नाहीं मिळत. मानव मग नेहमीं अतृप्त, अधाशी असतो. तो अद्वैताचा चारा न मिळाल्यामुळें त्याचा उत्साह उरत नाहीं. उत्तेजक कृत्रिम उपायांनीं सुखाचा नि उत्साहाचा क्षणिक डोलारा तो मांडूं बघतो. आपला मोठेपणा आपल्या लहपणांत आहे असें त्याला वाटतें. स्वतःच्या कर्मव्यापारांची किंमत मानसिक शान्ति किती मिळाली, यावरून न

करतां धांवपळ व हालचाल किती केली यावरून तो करतो. जी शान्ति सृष्टीच्या नक्षत्रखचित आकाशांत भरलेली असते, सृष्टीच्या तालबद्ध नृत्यांत नि संगीतांत जी आहे, तिची त्याला कल्पनाच नसते.

आर्य हिंदुस्थानांत आले तसेच युरोपियन अमेरिकेंत गेले. तेथें जंगलांशीं व रेडइंडियनांशीं त्यांना झगडावें लागलें. त्यांना निसर्गाशीं व रेडइंडियनांशीं स्नेहसंबंध कधीं जोडतां नाहीं आला. शेवटपर्यंत युद्धच करावें लागलें. परंतु हिंदुस्थानांत असंस्कृत लोकांचीं वसतिस्थानें आर्यांचीं तपोवनें झालीं. अमेरिकेंत गेलेल्या युरोपियनांवर तेथील निसर्गाचीं तीं हिरवीं मंदिरें, तेथील विशाल नद्या गंभीर परिणाम करूं शकलीं नाहींत. त्या जंगलांपासून नि नद्यांपासून त्यांना धन मिळालें, सत्ता मिळाली. कदाचित् सौंदर्यवृत्तीचेंहि पोषण झालें असेल. एखाद्या कवीला स्फूर्ति मिळाली असेल. परंतु विश्व व मानव यांच्यांतील संगमतीर्थ होण्याचें महनीय पद तिकडील वनराजींना प्राप्त झालें नाहीं. ती भव्य कल्पना त्या लोकांच्या मनास शिवली नाहीं.

अमेरिकेंत जे परिणाम झाले त्याहून निराळे परिणाम झाले पाहिजे होते, असें नाहीं माझें म्हणणें. एकाच प्रकारचा इतिहास सर्वत्र घडेल तर मानवानें प्राप्त संधीचा दुरुपयोग केला असें म्हणावें लागेल. जगांतील नाना लोकांनीं नाना भिन्न भिन्न संस्कृतींचें संवर्धन मानवजातीच्या सेवेसाठीं व वैभवासाठीं करीत राहिलें पाहिजे. बाजारांत विविध उपयोगी पदार्थ असतात, त्याप्रमाणें मानवी बाजारांत विविध संस्कृति मांडण्यांत यायला हव्यात. भिन्न भिन्न परिस्थितींतील लोकांना भिन्न भिन्न गरजा असतात. त्या महत्त्वाच्याहि असतात. एकमेकांनीं एकमेकांची न्यूनता आपल्याजवळचें देऊन दूर करायची. माझ्या म्हणण्याचा हेतु एवढाच कीं, आर्यलोक हिंदुस्थानांत ज्या परिस्थितींत होते तिचा विशिष्ट उपयोग त्यांनीं करून घेतला. त्या परिस्थितींतून त्यांनीं महान् विचार मिळविले; ते आचरणांत यावेत म्हणून थोर राष्ट्रीय प्रयत्नहि केले. आपण आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठीं कमालीचा त्याग केला. अनंत कष्टांना कवटाळलें. जीवनाच्या अथांग समुद्रांत बुडी मारून आपण सत्य-शोधन केलें. ज्यांचा इतिहास आपल्यापेक्षां निराळा आहे, त्यांनाहि आपले आध्यात्मिक शोध उपयोगी पडतील. जीवन सर्वांगसुंदर करण्यासाठीं विविध

जीवनतत्त्वांचें पोषण करणाऱ्या विचारांची नेहमींच जरूरी असणार आणि म्हणूनच मानवी मनाचें खाद्य दशदिशांतून गोळा करून आणावें लागतें.

संस्कृति म्हणजे त्या त्या राष्ट्रानें आपल्या जनतेला विशिष्ट रीतीनें वाढविण्यासाठीं निर्माण केलेला सांचा. प्रत्येक राष्ट्र त्याला जें उत्तमोत्तम वाटलें तदनुसार सर्व स्त्री-पुरुषांचा विकास व्हावा म्हणून नीति-नियम करतें. आचाराची, विचाराची एक विशिष्ट पद्धति निर्मितें. हे नीतिनियम, हें जीवनशास्त्र, हा सांचा म्हणजेच संस्कृति. त्या त्या राष्ट्रांतील सर्व संस्था, सत् व असत् यांविषयींच्या तेथील कल्पना, तेथील स्मृति, सर्वांचा उपयोग त्या त्या संस्कृतीचा विशिष्ट छाप उठावा म्हणून होत असतो. आजची पाश्चिमात्य संस्कृति व्यक्तींची शारीरिक, बौद्धिक व नैतिक वाढ नीट व्हावी म्हणून व्यवस्थित संघटित प्रयत्न करीत आहे. निसर्गावर मनुष्याची सत्ता अधिकाधिक प्रस्थापित व्हावी म्हणून राष्ट्रें आपापल्या सर्व शक्तींचा उपयोग करीत आहेत. सृष्टीपासून जें जें मिळेल त्याचा नीट उपयोग करून घेण्यासाठीं पाश्चिमात्य जिवापाड मेहनत करीत आहेत. स्वतःच्या सिद्धीच्या आड येणाऱ्या सर्व अडचणींचा धुव्वा उडविण्यासाठीं संघटित प्रयत्न करीत आहेत. सृष्टीशीं वा अन्य राष्ट्रांशीं नीट झगडे करतां यावेत म्हणून स्वतःला शिस्त लावून घेत आहेत; प्रचंड सैन्य उभारीत आहेत; शस्त्रास्त्रें वाढत आहेत; यंत्रें, युक्त्या, शोध यांची सारखी वाढ होत आहे. त्यांच्या प्रचंड संघटना वेगानें पुढें जात आहेत. पाश्चिमात्यांचें हें कर्तृत्व आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं. मानवाच्या अमोघ अपार ऐश्वर्याचें हें अभूतपूर्व दर्शन आहे. सर्वत्र मानवाचें साम्राज्य पसरविण्याचें ध्येय त्यांना स्फूर्ति देत आहे.

प्राचीन आर्यावर्तांतील संपूर्णतेचें ध्येय याहून निराळें होतें. पाश्चिमात्य आपल्या ध्येयासाठीं जशी अहोरात्र धडपड करतात, तशीच प्राचीन भारतीयांनींहि स्वतःच्या ध्येयासाठीं केली. भारतीय संस्कृतीनें सत्ता व सामर्थ्य यांना परमोच्च ध्येय म्हणून कधींच पूजिलें नाहीं. हिंदी जनतेचें रक्षण वा भक्षण करण्यासाठीं म्हणून सर्वांनाच कधीं शिपाई बनविलें नाहीं. साम्राज्यें, लष्करी प्रभुत्व यासाठीं हा देश फारसा कधीं हपापला नव्हता आणि म्हणूनच युरोपांत यासाठीं जशा संघटना दिसतात, तशा आपल्याकडे दिसत नाहींत.

भारतवर्षांतील ध्येयासाठीं उत्तमोत्तम माणसांना एकान्तमय जीवन कंठावें लागे. ध्यान, चिंतन यांत त्यांना तन्मय व्हावें लागे. आपल्या पूर्वजांनीं जें सत्यशोधन केलें, मानवजातीला जे बहुमोल ठेवे दिले, त्यासाठीं त्यांना ऐहिक वैभव, ऐहिक सुखविलास दूर सारावे लागत. त्यांना अपार व्यावहारिक नुकसानहि सोसावें लागलें. परंतु असें असलें तरी भारतीयांचेंहि कार्य अपूर्व व लोकोत्तर आहे, भव्य व दिव्य आहे, यांत शंका नाहीं. हें कार्य म्हणजे मानवी हृदयांत अनंताला मिठी मारण्याची जी अनिवार्य तृषा असते, तिचेंच बाह्य आविष्करण होतें. जीवनांत अनंताचा साक्षात्कार करून घेतल्याशिवाय खरी विश्रान्ति नाहीं– हें तें ध्येय होतें.

भारतांत सद्‌गुणी, शहाणे व शूर पुरुष झाले. येथें राजनीतिज्ञ, मुत्सद्दी, सम्राट्, चक्रवर्ती झाले. परंतु येथें आदर्श पुरुष कोणाला मानण्यांत आलें ? ऋषि हा आमचा आदर्श होता. आणि ऋषि म्हणजे काय ?

संप्राप्यैनं ऋषयो ज्ञानतृप्ताः
कृतात्मानो वीतरागाः प्रशान्ताः ।
ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीराः
युक्तात्मानः सर्वमेवाविशन्ति । ( मुंडकोपनिषद् )

" परमात्म्याला मिळवून ज्ञानानें तृप्त झालेले, आत्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य अनुभवल्यामुळें कृतार्थ झालेले, सर्व स्वार्थांपासून मुक्त, जगाच्या सर्व प्रवृत्तींत प्रभुदर्शनच होत असल्यामुळें शान्त राहणारे, विश्वव्यापी प्रभूला सर्वत्र प्राप्त करून घेत असल्यामुळें जे धीर गंभीर असतात व विश्वजीवनाशीं समरस होतात, ते ऋषि. " अशी ही व्याख्या आहे.

या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें विश्वाशीं आपला संबंध अनुभवणें, प्रभूशीं एकरूप होऊन तद्द्वारां चराचराशीं अद्वैत जोडणें, हें या देशांत मानवाचें अंतिम ध्येय मानण्यांत आलें होतें. हें ध्येय प्राप्त करून घेण्यांत मानवी कृतार्थता आहे, असें समजण्यांत येई.

मनुष्य जाळपोळ करूं शकतो, लुटालूट, कत्तली करूं शकतो, व्यापार करूं शकतो, कुबेर होऊं शकतो, अज्ञानाचा शोध लावूं शकतो, कलानिर्मिति

करूं शकतो; परंतु यांतील कोणत्याहि गोष्टीमुळें त्याचा खरा मोठेपणा सिद्ध होत नाहीं. आपल्या आत्म्यांत तो चराचराचा समावेश करूं शकतो म्हणून तो मोठा. ज्या वेळेस मानवी आत्मा शुष्क, निस्सार अशा रूढींत गुरफटून जातो, क्षुद्र कामांतच मग्न होतो, तेव्हां त्याला अनंत क्षितिज मग दिसत नाहीं. मनुष्याचें खरें स्वरूप म्हणजे विश्वव्यापी होणें, सर्वांशीं मिळून जाणें हें आहे. मनुष्य स्वतःचा वा सृष्टीचा दास नाहीं. तो मुळांत प्रेम करणारा आहे. मनुष्याची मुक्ति व पूर्णता प्रेमांत आहे. प्रेम म्हणजे काय? पूर्णपणें एकरूप होणें म्हणजे प्रेम. या सर्व विश्वाशीं एकरूप होण्याची जी शक्ति तिच्यामुळें जीव शिव बनतो. आत्म्याचें हें खरें स्वरूप. ज्या वेळीं मनुष्य इतरांना कोपरखळ्या देऊन, दूर लोटून स्वतःची प्रौढी मिरवूं पाहतो, जेव्हां त्याचा गर्व वाढतो, त्या वेळेस तो परमात्म्यापासून दूर जातो. मानवी जीवनाचें ध्येय ज्यांनीं गांठलें, त्यांचें उपनिषदांत प्रशान्त व युक्तात्म असें वर्णन आहे. सृष्टीशीं व मानवांशीं ते प्रेमानें वागतात आणि म्हणून परमात्म्याशीं जोडले जाऊन ते परम शान्ति अनुभवतात.

ख्रिस्ताच्या उपदेशांतहि ही गोष्ट आहे. जेव्हां ख्रिस्त म्हणतो : " सुईच्या नेढ्यांतून एक वेळ उंट पलीकडे जाईल, परंतु स्वर्गाच्या दारांतून श्रीमंत आंत जाऊं शकणार नाहीं, " त्या वेळेस उपनिषदांतील विचारच जणूं तो मांडतो. ख्रिस्ताच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, आपण स्वार्थी बनतांच इतरांपासून अलग होतों. आपली मालमत्ता आपणांस संकुचित करते. जो स्वतःसाठीं द्रव्यार्जन करतो, त्याचा अहं इतका जाडजूड होतो कीं, आध्यात्मिक जगाच्या दारांतून त्याला आंत जातां येत नाहीं. स्वतःच्या मर्यादित संचयांत तो कोंडला जातो. ' मी ' व ' माझें ' या भिंतींत तो चिणला जातो.

म्हणून उपनिषदें सांगतात कीं, देव पाहिजे असेल तर जगाला प्रेमानें मिठी मारा. तुम्ही पैसे जोडूं पाहतां, परंतु जगाला तोडतां. ईश्वर म्हणजे परिपूर्णता. ती प्राप्त करून घेण्याचा मार्ग पैसा नसून प्रेम हा आहे.

भारतीय तत्त्वज्ञानांतील ब्रह्म म्हणजे जगांत जें जें आहे त्याचा अभाव होय, असें कांहीं पाश्चिमात्य तत्त्वज्ञानी म्हणत असतात. ब्रह्म म्हणजे अमूर्त कल्पना; यांचा अनंत परमात्मा केवळ कल्पनेंतच आढळायचा, असें ते

म्हणतात. आपल्याकडचेहि कांहीं लोक असें बोलतात. परंतु भारतीय विचारांतील ब्रह्म ही प्रत्यक्षावगम वस्तु. ती अनुभवाची वस्तु आहे. भारतीय मनाला ब्रह्मसाक्षात्काराच्या विचारानें अपार स्फूर्ति मिळत आली आहे. ही केवळ कल्पना नव्हती, प्रत्यक्ष आचारांत अनुभवायची ती वस्तु होती. उपनिषदें गर्जतात : " जें कांहीं आहे तें त्यानें व्यापिलें आहे ", " जो देव अग्नींत, पाण्यांत, धन-धान्यांत, वृक्ष-वनस्पतींत भरून राहिला आहे, त्याला प्रणाम ! " असें श्रुति म्हणते. हा ईश्वर हा केवळ अमूर्त, कल्पनिक आहे? सर्व चराचरांत तो पहायचा, एवढेंच नव्हे तर त्याला नमस्कार करायचा. उपनिषदांतलि ईश्वरी भावनेनें वेडा झालेला मनुष्य विश्वाकडे आदरानें बघतो. त्याला सारें चराचर पूज्य वाटतें. या एका प्राणमय सत्यामुळें बाकीचे अनुभव सत्यमय होतात. हें केवळ जाणायचें नाहीं तर त्याला पुजायचें. " नमो नमः "–सर्वत्र आम्ही त्याला भजूं, वंदूं. एक ऋषि तर आनंदानें ओसंडून—

शृण्वन्तु विश्वे अमृतस्यः पुत्राः
आये दिव्यधामानि तस्थुः ।
वेदाहमेनं पुरुषं महान्तं
आदित्यवर्णं तमसः परस्तात् ॥

" हे अमृतस्वरूपी परमेश्वराच्या पुत्रांनो, ऐका. स्वर्गीय दिव्य धामांत राहणाऱ्यांनो, ऐका. अंधाराच्या पलीकडून ज्याची प्रभा फांकत आहे, त्याला–त्या तेजोमय महापुरुषाला मीं जाणलें आहे, ओळखलें आहे ! " अशी गर्जना करतो. या उद्गारांत का संदिग्धता आहे ? अनुभवानें ओले झालेले असे हे उद्‍गार नाहींत ?

उपनिषदांतील शिकवणीच्या प्रत्यक्ष आचारावर बुद्धदेवांनीं जोर दिला. ते म्हणतात : " वस्तु कुठेंहि असो, वर असो, खालीं असो, दूर असो, जवळ असो, दृश्य असो, अदृश्य असो. तूं सर्व वस्तुजातीशीं प्रेमाचा संबंध ठेव. यत्किंचितहि वैरभाव मनांत नको. उभा अस वा चालत अस; बसलेला अस वा झोपलेला अस. सर्व स्थितींत प्रेममय राहणें यालाच ब्रह्मविहार म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नों दि ................

ब्रह्माशीं निशिदिन खेळ." ब्रह्मभावनेनें वेडें व्हायचें म्हणजे काय? ब्रह्माची जाणीव म्हणजे प्रत्येक वस्तूविषयीं सहानुभूति असणें.

यश्चायमस्तिन्नाकाशे
तेजोमयोऽमृतमयः
पुरुषः सर्वानुभूः ।

असें ब्रह्माचें वर्णन आहे. ब्रह्म म्हणजे जीवनाचें जीवन, सर्वांना प्रकाश देणारें तत्त्व. तें बाहेरच भरून राहिलें आहे असें नाहीं, तर तें आपल्यामध्येंहि आहे. "यश्चायमात्मनि"– जें तुझ्या आत्म्यांतहि आहे. एकच चैतन्य आंत-बाहेर सर्वत्र आहे.

विश्वाशीं एकरूप होण्यासाठीं आपली भावना अनंत भावनेशीं एकरूप केली पाहिजे. आपल्या भावनांचें क्षेत्र वाढविणें यांतच मानवाची खरी प्रगति. ज्या मानानें तुमची भावना विशाल, त्या मानानें तुमची उन्नति. मानवी भावना अधिकाधिक विशाल व्हावी म्हणून काव्यें, तत्त्वज्ञानें, कला, शास्त्रें, धर्म यांचे सतत प्रयत्न. तुमची इस्टेट किती, यावरून तुमच्या जीवनाला किंमत नसून, तुमची सहानुभूति किती व्यापक, यावर ती अवलंबून आहे. आपली जाणीव मुक्त करण्यासाठीं, विशाल करण्यासाठीं किंमत द्यायला हवी. स्वार्थाचा होम ही ती किंमत. आत्मज्ञान हवें असेल तर देहार्पण करा. त्यागानेंच वैभव. मरणानेंच जीवन. उपनिषद् सांगतें : "त्यागानें मिळेल. अधाशी नको होऊं."

गीतेचेंहि हेंच सार. निरपेक्ष कर्तव्य कर, गीता सांगते. "कर्मफलत्याग सांगण्याच्या मुळाशीं संसार मिथ्या ही भावना आहे," असा निष्कर्ष कांहीं पाश्चिमात्य पंडित काढतात. परंतु गोष्ट खरोखर उलट आहे. जो मनुष्य स्वार्थी असतो, त्यालाच इतर सारे तुच्छ वाटतात. त्याला स्वतःच्या मानानें इतर जग जणूं मिथ्या वाटतें. सारें जग सत्य आहे, असें अनुभवायचें तर वैयक्तिक वासना, स्वार्थ, यांना सोडावेंच लागेल. आपलीं सामाजिक कर्तव्यें पार पाडण्यासाठीं, इतरांच्या सुखदुःखांत समरस होण्यासाठीं आपणांस हा संयम शिकणें प्राप्त आहे. अधिक उदात्त जीवन मिळवायचें

म्हणजे अधिक त्याग करावयाचा. ऐक्यभावना वाढवीत विश्वैक्य अनुभवणें हें मानवजातीचें ध्येय आहे.

भारतीय ब्रह्माची कल्पना पोकळ, शून्य नाहीं. ऋषि असंदिग्धपणें म्हणतो :

इह चेत् अवेदीत् अथ सत्यमसि
न चेत् इह अवेदीत् न हती विनाष्टिः

या जीवनांत तें जाणून घेणें म्हणजेच खरोखर जगणें; तें न जाणून घेणें म्हणजे मोठी हानि. अशा त्या ब्रह्माला कसें जाणावें ? ' भूतेषु भूतेषु विचिन्त्य '–सृष्टींत सर्वत्र त्याला पाहून. कुटुंब, समाज, राष्ट्र, विश्व, अशा रीतीनें ऐक्यबुद्धीचें क्षेत्र उत्तरोत्तर वाढविण्यांतच आपलें कल्याण आहे. या गोष्टीपासून पराङ्मुख होणें म्हणजे नाशाकडे जाणें होय.

भारतांतील निरभ्र आणि विशाल गगनमंडपाखालीं बसून प्राचीन ऋषि विश्वैक्याचा संदेश देत आहेत, असें तें दृश्य मनासमोर येऊन मानवजातीच्या उज्ज्वल भवितव्याविषयीं माझें मन आशेनें नि आनंदानें फुलतें. ' विश्वैक्य अनुभवा ' असें सांगणारे ऋषि व्यर्थ बडबड नव्हते करीत. आपण माकडाचे वंशज, पशूंतूनच उत्क्रान्त होत आलों, अशी ती बहिर्दृष्टि बडबड नव्हती. कल्पनेनें आपलें प्रतिबिंब सर्वत्र पाहण्याची ती अतिशयोक्ति नव्हती. सृष्टीच्या रंगभूमीवरील छायाप्रकाशांत क्षणभर बघायचें तें नाटक नव्हतें; तर क्षुद्र बंधनें तोडून तें विश्वात्म्याशीं प्रत्यक्षतः एकरूप होणें होतें. तो कल्पनेचा विलास नव्हता, बुद्धीची कसरत नव्हती. स्वतःच्या स्वार्थापासून विचाराची ती स्वतंत्रता होती. जी शक्ति बाहेर निसर्गात हजारों रूपांनीं कर्म करीत आहे, तीच जाणीवरूपानें आपणांमध्येंहि आहे, याचा तो गंभीर अनुभव होता. सृष्टींत सर्वत्र भरुन राहिलेल्या ऐक्याची ती प्रचीति होती. त्यांना खंड कोठें दिसत ना. अखंड आत्मतत्त्व सर्वत्र भरलेलें. सत्याच्या प्रान्तांत मृत्यूमुळें खंड पडत नव्हते. कारण ते मृत्यूसहि मानीत नव्हते. मृत्यु म्हणजे तरी काय ?

जीवन म्हणजे मृत्यु आणि मृत्यु म्हणजे जीवन. जीवन व मरण जणूं समानार्थक शब्द. दृश्य जीवन व अदृश्य जीवन. दोहोंचा सारख्याच आनंदानें ऋषींनीं स्वीकार केला. " नमोऽस्तु आयते, नमोऽस्तु परायते "–

जवळ असलेल्यास नमस्कार, दूर गेलेल्यास नमस्कार. जन्ममरणाच्या वर लाटा उसळतात. खालीं अथांग जीवन आहे. अतूट जीवन. " यदिदं किंच प्राण एजति निःसृतम् "–सारें कांहीं जें आहे तें त्या अमर जीवनांतूनच उसळत बाहेर आलें आहे. जीवन विशाल आहे–" प्राणो विराट् । "

असा हा आपला थोर वारसा आहे. ही संपत्ति, हा वारसा आपली वाट पाहत आहे. चला, ही ठेव आपण आपलीशी करूं. आपला विचार विश्वव्यापी करणें हें ध्येय ऋषींनीं दिलें आहे. तें आपलेंसें करा. हें ध्येय म्हणजे बुद्धिवाद नव्हे. कल्पनेचे केवळ हे तारे नव्हत. याला नैतिक पाया आहे. हें ध्येय कृतींत आणायचें आहे. उपनिषद् म्हणतें : ' सर्वव्यापी स भगवान् । तस्मात् सर्वगतः शिवः ! '–तो परमात्मा सर्वव्यापी आहे, सर्व वस्तूंतील चांगुलपणा म्हणजे तो. सर्व प्राणिमात्रांशीं मनानें, बुद्धीनें, प्रत्यक्ष सेवाकर्मानें एकरूप होणें, सर्वांवर प्रेम करणें, परमात्म्यांत स्वतःला मिसळणें, त्याच्यामध्यें आपण आहोंत याचा अनुभव घेणें म्हणजे खरें मंगल, म्हणजे परम कल्याण. हें उपनिषदांचें सार. " प्राणो विराट् "–जीवन विशाल आहे, अनंत आहे, याचा अनुभव घ्या.

* * *

# आत्म्याची अनुभूति

आत्मा परमात्म्यांत मिळवावा, स्वतःची जाणीव-शक्ति चराचराला व्यापील अशी विशाल करावी, ही प्राचीन भारतीयांची महत्त्वाकांक्षा असे. जर ही जाणीव वाढवायची असा अर्थ असेल तर हें कधींच शक्य नाहीं असें कोणी म्हणतील. परंतु खरें पाहिलें तर जगाचा अनुभव घेणें ही गोष्ट वाटते तशी वेडेपणाची नाहीं. आपलें कार्यक्षेत्र मनुष्य दिवसेंदिवस वाढवीत आहे. नाना प्रकारचे प्रश्न उभे राहत आहेत. ओझें वाढत आहे. परंतु मनुष्य या सर्वांची एखाद्या विशिष्ट पद्धतीनें व्यवस्था लावतो आणि मग बोजा हलका वाटतो. ज्या वेळेस गोंधळ असतो, गुंतागुंत असते, कांहीं चुकतें, तेव्हां कामाचा डोंगर वाढतो. सारें सुव्यवस्थित असलें म्हणजे सोपें वाटतें. आपल्या सर्व खटाटोपांत मेळ हवा, एकसूत्रता हवी. एवढेंच नव्हे तर, या विश्वांतील अनंत, विविध घटनांत परस्परविरुद्ध गोष्टींतहि एक प्रकारची आंतरिक एकता असते व ती शोधून काढण्याचा मनुष्य प्रयत्न करीत असतो. या एकत्वाचा अनुभव घेणें म्हणजेच चराचराचा अनुभव घेणें, हेंच परमोच्च ध्येय. हें एकत्व जाणून घेऊं तर खरें सामर्थ्य लाभेल. ही एकता म्हणजेच परम सत्य. घटना अनेक असतात. परंतु सत्य एकच असतें. मानवी मनाला सत्याचें आकलन होऊं शकतें. झाडावरून फळ खालीं पडलें, पाऊस वरून पडतो, अशीं शेंकडों उदाहरणें डोक्यांत कोंबलीं तरी त्यांना अंत नाहीं. परंतु आकर्षणाचा नियम एकदां लक्षांत आला कीं, मग या शेंकडों गोष्टींची जरूरी नाहीं. अनंत गोष्टींना व्यापून असणारें तत्त्व सांपडणें याहून थोर आनंद दुसरा कोणता ? सत्याच्या प्राप्तीसारखा निर्मळ आनंद दुसरा नाहीं. मानवी मनाचा तो मोक्ष. एखाद्या गल्लींत गेलों तर पुढें रस्ता नसतो, परंतु सत्य आणखी विशाल क्षितिज डोळ्यांसमोर उभें करतें. सत्य अनंताकडे, असीमाकडे नेत असतें. डार्विनसारखा महान् शास्त्रज्ञ जेव्हां प्राणिशास्त्रांतील

साधें सत्य शोधून काढतो, त्या वेळेस तें त्या शास्त्रापुरतेंच मर्यादित न राहतां इतर शेंकडों गोष्टींवर प्रकाश पाडतें. ज्या वस्तूच्या शोधासाठीं दिवा लावला, ती वस्तु तर त्या दिव्यानें दिसेलच, परंतु इतर शेंकडों वस्तूंवरहि तो दिवा आपले किरण फेंकतो. एखादें साधेंच सत्य, परंतु अशा रीतीनें विश्वव्यापी होतें. सत्यशोधनांत जरी सर्व वस्तूंचा विचार असतो, तरी सत्य म्हणजे त्या वस्तूंचा समुच्चय नव्हे. सत्य त्या सर्व वस्तूंना व्यापून पलीकडे जातें. अनंततेचें दर्शन घडवतें.

ही गोष्ट जशी विज्ञानांत तशीच आपल्या अनुभूतींतहि. मनुष्याला अशा एखाद्या सर्वव्यापी मूलभूत सत्याचा साक्षात्कार व्हावा कीं, ज्यामुळें जास्तींत जास्त विशाल विश्वाची त्याला कल्पना येऊं शकेल. उपनिषद् जेव्हां म्हणतें : 'तूं आपल्या आत्म्याला ओळख', तेव्हां तुमच्या हातांत असें सर्वव्यापी तत्त्व देण्याचाच उद्देश असतो. 'आत्म्याला जाणा' म्हणजे प्रत्येक व्यक्ति-मात्रांत असलेलें महान् ऐक्य अनुभवून घ्या.

आत्मदर्शनाला अहंकाराचा अडथळा असतो. अहंकार दूर लोटूं तर विश्वाशीं एकरूप होणारें आपलें आत्मरूप आपणांस दिसूं शकेल.

लहान मुलें क, ख, अशीं एकेक अक्षरें वाचतात. तोंवर त्यांना खरा आनंद वाटत नाहीं. त्या एकेक अक्षराकडे लक्ष देणें कंटाळवाणें असतें. परंतु अक्षरांचे शब्द व शब्दांचीं वाक्यें बनून आपणांस विचार मिळतो तेव्हां आनंद होतो. त्याप्रमाणेंच अहंकाराच्या छोट्या तुरुंगांत आत्मा गुदमरतो. विश्वापासून आपण अलग होतों. आत्म्याचें महत्त्व आपण विसरतों. ऐक्य हें तर आत्म्याचें स्वरूपसर्वस्व. दुसऱ्याशीं एकरूपता अनुभवूनच आत्म्याला स्वतःची सत्यता अनुभवतां येते. जोंपर्यंत सृष्टींतील एकतेचा कायदा मानवाला कळत नाहीं, तोंवर तो संशयग्रस्त व भयभीत असतो. त्याला ही सृष्टि परकी वाटते. परंतु स्वतःची विवेकबुद्धि व सृष्टीचे व्यवहार यांत अविरोध आहे हें त्यानें ओळखलें, ज्या जगांत आपण नांदतों, तें कांहीं परकें नाहीं, तें जग आणि मी एकच आहोंत, ही गोष्ट ज्या क्षणीं त्याला समजली त्या क्षणीं परमानंद झाला. तो आसमंतांत सर्वत्र स्वतःला पाहूं लागला. एखाद्या गोष्टीचें ज्ञान होणें याचा अर्थ त्या गोष्टींत आपलें कांहीं तरी आहे हें

ओळखणें होय. परंतु केवळ ओळखून भागत नाहीं. ज्ञानानें पुरा संबंध येत नाहीं. प्रेमाचा संबंध संपूर्ण, सर्वांगीण असतो. प्रेमामध्यें दुजेपणाची, भिन्नतेची जाणिव आपण विसरतों. स्वतःच्या मर्यादा ओलांडून अमर्याद तत्त्वाची गांठ घेतो. ही प्रेमप्राप्ति हाच मनुष्याचा परमोच्च आनंद. या प्रेमामुळेंच आपण आहोंत त्यापेक्षां किती महान् आहोंत तें त्याला समजून येतें. प्रेमानेंच सर्वात्मकता तो अनुभवूं शकतो.

हें एकतेचें तत्त्व मानवाच्या अनेक व्यवहारांतून सारखें प्रकट होत असतें. साहित्य, कला, शास्त्रें, समाज, राजनीति, धर्म, सर्व क्षेत्रांत हें तत्त्व संबंध जोडीत, आपलें राज्य पसरीत जात असतें. क्षुद्र अहंकार सोडून, मानवजातीचें प्रेम जोडून ज्यांनीं आत्म्याचें खरें स्वरूप प्रकट करून दाखविलें, ते खरे थोर महात्मे. त्यांना आपण ऋषि म्हणतों. ते निंदा, छळ सहन करतात. प्रेमानें मानवजातीची सेवा करीत राहतात. मरण आलें तरी आनंदानें स्वीकारतात. स्वार्थमय जीवन सोडून ते आत्ममय जीवन जगत असतात. मानवजातीची अंतिम सत्यता ते दाखवतात. ते महात्मे मोठ्या मनाचे.

उपनिषदांत एक पुढील उद्गार आहे : ' न वा अरे पुत्रस्य कामाय पुत्रः प्रियो भवति '– पुत्रासाठीं पुत्र प्रिय नाहीं, तर पुत्राच्या ठिकाणीं आपलें आत्मरूप आहे म्हणून तो प्रिय. ज्याच्यावर आपण प्रेम करतों त्याच्या ठिकाणीं आपल्याच आत्म्याचें परमोच्च दर्शन आपणांस होतें. आपल्या प्रियजनांचीं सुखें व दुःखें आपणांस आपलीं वाटतात–एवढेंच नव्हे, तर आणखीहि कांहीं वाटतें. असें कां वाटतें ? तर त्या वेळेस आपण मोठे असतों, आपलें जीवन विशाल होत असतें. जें सत्य सर्व विश्वाला व्यापून राहिलें आहे, त्या सत्याचा स्पर्श आपणांस त्यांच्या ठिकाणीं होतो.

आपलें प्रेम आपल्या प्रियजनांपुरतेंच मर्यादित राहतें. प्रेमाचा प्रवाह थबकतो व आत्म्याचा उत्तरोत्तर महान् साक्षात्कार होत नाहीं. प्रेमाच्या मार्गावरील पहिलें पाऊल आपण टाकतों आणि पहिलें पाऊल टाकण्यांतच सारें कुतूहल असतें. या पहिल्या पावलानें आपणांस कळून येतें कीं, क्षुद्र

अहंकार विसरून सर्वांशीं एकरूप होण्यांत आपला परमोच्च आनंद असतो. या प्रेमानेंच नवजीवन मिळतें, नवसामर्थ्य मिळतें, नवदृष्टि मिळते. ज्या मानानें तुम्ही प्रेम वाढवाल, त्या मानानें तुमचें मन अधिक सुंदर होईल; दृष्टि अधिक विशाल होईल. प्रेम वाढतें न ठेवाल तर हा नवजीवनाचा, नव-सौंदर्याचा झरा सुकून जाईल. मग मैत्री संकुचित होते; कुटुंबें स्वार्थी होतात; दुसऱ्यांचें आगत-स्वागतहि करीत नाहींत. राष्ट्रें स्वतःपुरतें पाहणारीं होतात. जाति दुसऱ्या जातींना पाण्यांत बघतात. प्रज्वलित दिव्यावर दडपण घालण्या-प्रमाणें हें आहे. मग विषारी वायु जमा होतात. ज्योत गुदमरते, विझते.

उपनिषदें सांगतात कीं, आत्मतत्त्वाची ओळख पटली कीं, परमात्म-तत्त्वाची ओळख पटेल. अहंकार दवडून स्वतःच्या शुद्ध आत्म्याची प्राप्ति करून घेणें ही मोक्ष-श्रीकडे जायची पहिली पायरी. आपण परमात्म्याचे अंश आहोंत, ही भावना आपल्या रोमरोमीं भरून राहायला हवी. स्वार्थ जिंकल्याशिवाय, अहंकार दडपल्याशिवाय हें कसें होणार? आपल्या आत्म्याचा जो खरा मोठेपणा त्याला ना मरणानें बाधा, ना कशानें. कवची फोडून बाहेर पडलेल्या पक्ष्याला कळून येतें कीं, ज्या कवचीनें मला कोंडलें होतें, तिच्याशीं खरोखरी माझा कांहींच संबंध नाहीं. तें कवच म्हणजे एक जड वस्तु. ना तेथें वाढ, ना विकास. त्या कवचाला बाहेरच्या विशाल विश्वाची काय कल्पना? तें कवच कितीहि सुंदर, गुळगुळीत असलें तरी तें फोडून बाहेर आलेंच पाहिजे. बाहेरची हवा, प्रकाश यांचा लाभ त्या पक्ष्यानें करून घेतला पाहिजे. संस्कृतमध्यें पक्ष्याला 'द्विज' म्हणजे दोनदां जन्मणारा असा शब्द आहे. मनुष्यालाहि द्विज म्हणतात. ज्ञान मिळवून, विचारानें शुद्ध होऊन जणूं नवीन जन्म मिळवून घ्यावयाचा. द्विजत्व प्राप्त झाल्यावर गरजा साध्या होतात. अंतःकरण निर्मळ होतें. निःस्वार्थ बुद्धीनें व विशाल हृदयानें तो जीवनाच्या जबाबदाऱ्या अंगावर घेतो. स्वार्थमुक्त होऊन विश्वाशीं एकरूप होतो.

मीं मागेंच सांगितलें कीं, भारतांतील ऋषि त्यागाचा जो मार्ग दाखवीत तो कर्मशून्यतेचा नसे. जगाचा त्याग न करतां अधिक सत्यतेनें जग आपलेंसें करून घेण्याचें तें ध्येय होतें. ख्रिस्त म्हणतो : 'जे सौम्य वृत्तीचे आहेत,

त्यांची ही पृथ्वी आहे.' या म्हणण्याचा अर्थ हाच कीं, मनुष्य जेव्हां अहंकार व स्वार्थ सोडतो, तेव्हांच त्याचें खरें वैभव त्याला मिळतें. त्याला स्वतःचें स्थान मिळविण्यासाठीं मग झगडावें लागत नाहीं. त्याच्या अमर आत्म्याचा अमर हक्क प्रस्थापित असतोच.

बुद्धदेव साधुसिंहाला उपदेश करतांना म्हणाले : "मी कर्मांचा त्याग शिकवितों ही गोष्ट खरी, परंतु कोणत्या कर्मांचा? ज्या कर्मांमुळें दुष्टपणा उत्पन्न होईल, त्यांचा त्याग मी शिकवितों. मी शून्याचा उपदेश करतों, ही गोष्ट खरी; परंतु कोणत्या गोष्टी शून्य करायच्या? स्वतःचे अहंकार, दुष्ट विचार, अज्ञान यांना शून्य करा. दया, क्षमा, प्रेम, सत्य यांना नाहीं नष्ट करायचें? यांचें नाहीं निर्वाण करायचें?"

बुद्धानें जें मोक्ष-तत्त्व उपदेशिलें, त्याचा अर्थ हा कीं, अविद्येपासून, अज्ञानापासून मुक्त व्हा. अविद्या म्हणजेच अज्ञान. ज्यामुळें आपण आपलें खरें व्यापक स्वरूप विसरतों तें अज्ञान. त्याच्या पाशांतून मुक्त होणें म्हणजे मोक्ष. या अज्ञानामुळें अहंकाराच्या पिंजऱ्यांत आपण पडतों; गर्वान्ध, विषयान्ध, लोभी, दुष्ट बनतों. मनुष्य झोपतो त्या वेळेस तो जिवंत असतो. परंतु सभोंवतालच्या सृष्टीशीं त्याचा संबंध नसतो, म्हणून तो स्वतःलाहि त्या वेळेस जाणत नाहीं. त्याचप्रमाणें जगांत वावरतांना चराचराशीं एकतेचा अनुभव तुम्हांला जेव्हां येत नसतो, त्या वेळेस तुमची ती आत्म्याच्या बाबतींतील निद्राच असते. अहंकाराच्या निद्रेंतून जागे व्हाल, तेव्हां बोधि प्राप्त होऊन बुद्ध व्हाल.

बंगालमधील एका खेडेगांवांत एका धर्मपंथाचे दोन साधु मला भेटले. मीं म्हटलें, 'तुमच्या धर्मपंथाचें विशिष्टत्व कशांत तें सांगूं शकाल?' एक म्हणाला : 'हें सांगणें कठिण आहे.' दुसरा म्हणाला : 'कठीण नाहीं, सोपें आहे. आपलें खरें स्वरूप आधीं समजून घ्यायचें आणि मग आपल्यामधील परमात्म्याला समजून घ्यावयाचें?' मीं त्याला म्हटलें : 'हा उपदेश सर्व जगाला तुम्ही कां नाहीं करीत?' तो म्हणाला : 'ज्याला तहान असेल तो नदीवर येईल!' मीं म्हटलें : 'परंतु असे कोणी येतात का? तुम्हांला दिसले का?' मृदु स्मित करीत तो म्हणाला : 'आज ना उद्यां त्यांना

आलेंच पाहिजे. ते सारे येतील, येणारच !' त्याच्या उद्गारांत निश्चितता होती. गंभीर शान्ति होती. ते उतावीळपणाचे उद्गार नव्हते.

बंगाली खेड्यांतील त्या साधूचें म्हणणें खरें आहे. अन्नवस्त्राहून जास्त जरूरीच्या व महत्त्वाच्या वस्तु शोधून काढायला मनुष्य बाहेर पडला आहे. मनुष्य स्वतःचें स्वरूप पाहण्यासाठीं बाहेर पडला आहे. मानवी यात्रा अनंत काळापासून याचसाठीं सुरू झाली आहे. जगांत अनेक साम्राज्यें वाढलीं नि गाडलीं गेलीं. आपलीं स्वप्नें मूर्तिमंत करण्यासाठीं मानवानें अनेक चिन्हें निर्माण केलीं. परंतु मुलें पहिलीं खेळणीं फेकतात, नवीन घेऊं बघतात, तसें मानवाचें चाललें आहे. शेंकडों वर्षे श्रम करून तो कांहीं उभारतो आणि पुन्हां तें झुगारून देतो. जणूं त्यांत त्याला राम वाटत नाहीं. युगामागून युगें जात आहेत आणि मानव परिपूर्णतेकडे जात आहे. मनुष्यानें घोडचुका केल्या, कत्तली केल्या, अनंत संहार केले, मुंडक्यांच्या राशी केल्या. रक्ताचे पाट वाहवले. नाना यातना, जुलूम, छळ हें सारें सहन करीत मानवजात पुढें जात आहे. मनुष्यानें उभारलेल्या नानाविध संस्था म्हणजे महावेदी आहेत. प्रत्यहीं तेथें अपार बलिदान होत आहे; परंतु यांतूनच परिपूर्णतेचें दर्शन मानवजात एक दिवस घेईल. जन्ममरणांचीं पावलें टाकीत हे अनंत यात्रेकरू सारखे येत आहेत. उत्तरोत्तर अधिकाधिक एकता अनुभवूं बघत आहेत.

मनुष्याचें दारिद्य अपार आहे. त्याच्या वासना अनंत आहेत. आत्मज्ञान होईपर्यंत तो हपापलेलाच असायचा. ज्याला आत्मदर्शन झालें त्याला स्थिर बिंदु सांपडला. मग त्या मध्यबिंदूभोंवतीं सारें व्यवस्थित गुंफलेलें त्याला दिसतें.

एक काळ असा होता, जेव्हां ही पृथ्वी केवळ वायुमय होती. तिच्या अणूपरिमाणूंमध्यें व्यवस्था नव्हती. तिला तेव्हां नव्हता आकार, नव्हतें सौंदर्य, तेथें नव्हता कांहीं हेतु. तेथें दोनच गोष्टी होत्या : गति नि उष्णता. हळूंहळूं पृथ्वी थंड होऊं लागली. तिला गोल आकार आला. परस्परांपासून दूर असलेल्या अणूपरमाणूंना एकत्र आणणारी शक्ति तिच्यांत आली. ग्रहमालेंत तिला योग्य स्थान मिळालें. रत्नहारांतील पाचूप्रमाणें ती शोभूं लागली. जसें

10866


हें पृथ्वीचें, तसेंच आपल्या आत्म्याचें. जोंपर्यंत आपल्या विकारांची, वासनांची प्रखरता काम करीत असते, तोंपर्यंत निश्चितता नसते. तोंपर्यंत आपणांस यथार्थतेनें कांहीं देतां येत नाहीं वा घेतां येत नाहीं. परंतु संयमानें जेव्हां आपण स्थिर होतों, आत्मबिंदु सांपडतो, परस्परविरुद्ध अशा हृदयाच्या नि बुद्धीच्या शक्ति नीट सामंजस्यानें जेव्हां वागूं लागतात, तेव्हां मग लहान लहान वस्तूंतहि मोठे हेतू दिसूं लागतात; परमेश्वरी सूत्र सर्वत्र दिसूं लागतें. आपल्या आचार-विचारांतहि सुसंबद्धता नि एकतानता येते. क्षणिक भावनांना प्रेमांत परिणत व्हावें लागतें. म्हणून उदनिषदें सांगतात : ' तमेव एकं जानत आत्मानम्, अमृतस्य एष सेतुः — ' त्या एक आत्मस्वरूपाला जाणून घ्या. अमृतपुरुषाकडे घेऊन जाणारा हा सेतु आहे.' आपणांमध्यें असणारें जें हें एकमेवाद्वितीयम् तत्त्व तें शोधून घेणें हें मानवाचें अंतिम साध्य आहे. हें तत्त्व म्हणजेच सत्य, हें तत्त्व म्हणजेच सत्याचा आत्मा. या तत्त्वाच्या किल्लीनेंच आध्यात्मिक जीवनाचा, स्वर्गीय राज्याचा दरवाजा तो उघडतो. मनुष्याच्या वासना अनंत असतात व त्या भरमसाटपणें नाना पदार्थांकडे धांवत असतात. कारण त्या वासनांचें जनन व पूरीकरण त्यांत असतें. त्या त्या पदार्थांसाठीं त्या जन्मतात व ते मिळतांच त्या तृप्त होतात. परंतु मनुष्यामध्यें जें तें एक आहे, त्याला सर्वत्र ऐक्य अनुभवायचें असतें. ज्ञानामध्यें, प्रेमामध्यें, इच्छाशक्तीच्या अनेक कर्मांमध्यें सर्वत्र ऐक्य पाहावयाचें असतें. चिरंतन ऐक्यरूप असणारें जें अनंत तत्त्व तें अनुभवण्यांत त्याचा परमोच्च आनंद असतो. ' एकरूपं बहुधा यः करोति तं आत्मस्थं ये अनुपश्यन्ति धीराः, तेषां सुखं शाश्वतं, नेतरेषाम् '—जो एकच गोष्ट अनेक आकारांनीं प्रकट करतो, असा तो परमात्मा, तो परमपुरुष जे अंतरंगांत पाहतात, त्यांनाच खरें शाश्वत सुख मिळतें; इतरांना नाहीं.

या जगांतील अनेकविध पसाऱ्यांत एकच गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते ती ही कीं, आपल्यामधील तें एक बाहेरच्या सृष्टींतील एकाकडे जाण्यासाठीं धडपडत असतें. त्या एकाचा हा स्वभावच आहे. हाच त्याचा आनंद. स्वतःचा दिवा हातांत नसेल तर त्या बाहेरच्या एकाला गांठणें कठिण आहे. परंतु आपल्या अंतरात्म्यांत बाहेरचा परमात्मा पाहणें ही गोष्ट अनुभवगम्य

आहे. आपण बाह्य वस्तूंना खंडात्मक रीतीनें पाहत नाहीं. वस्तूला संपूर्णपणें पाहतों. आपला आत्माहि परमात्म्याला अखंडतेनें पाहतो.

उपनिषद् म्हणतें—

एष देवो विश्वकर्मा महात्मा
सदा जनानां हृदये संनिविष्टः
हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तो
य एतद् विदुः अमृताः ते भवन्ति ॥

या विश्वाच्या सकल घडामोडींत जो स्वतःला प्रकट करीत असतो, असा हा देव, हा विश्वकर्मा मनुष्याच्या हृदयांत परमात्मरूपानें वास करतो. जे हृदयांत त्याची अनुभूति प्राप्त करून घेतात त्यांना अमृतत्व प्राप्त होतें.

हा परमात्मा विश्वकर्मा आहे. याचा अर्थ हा कीं, सृष्टीच्या अनेकविध शक्तींत व रूपांत तो प्रकट होतो. परंतु अन्तःकरणांत त्याचा जो आविर्भाव होतो तो एकत्वरूपानें होतो. सृष्टींत पृथक्करणानें आपण सत्याचा शोध करतों. परंतु हृदयांत सत्याची अनुभूति एकदम आणि प्रत्यक्ष येते. परमात्म्याला क्रमाक्रमानें मिळवायचें नसतें. तुकड्यातुकड्यांनीं त्याला मिळवायचें नसतें. तो अखंड आहे. हृदयाचें हृदय, अंतरात्म्याचा आंतरतम आत्मा या नात्यानेंच त्याला जाणावयाचें. प्रेमरूपानें, आनंदरूपानेंच त्याची अनुभूति घ्यावयाची. अहंकार टाकून त्याच्यासमोर उभें राहतांच त्याचें आनंदमय नि प्रेममय स्वरूप समजून येईल.

मानवी हृदयांतून खोल निघालेली एक प्रार्थना प्राचीन औपनिषदिक वाङ्मयांत आहे—"आविः आविर्मयेधि"—'हे स्वतःला प्रकट करणाऱ्या, तूं स्वतःला प्रकट कर,' अशी ही प्रार्थना आहे. आपण स्वार्थी असतों म्हणून दुःखी असतों. म्हणून आपल्याजवळ प्रकाश नसतो. स्वतःच्या बेसूर आवाजांत आपण ओरडत असतों. अनंताचें दिव्य संगीत आपल्या हृदय-तंत्रींतून स्रवत नाहीं. असमाधानी सुस्कारे, अपेशी जीवनाचा कंटाळा, भूतकालाबद्दलचा खोटा पश्चात्ताप, भविष्याबद्दलची नसती चिंता, इत्यादींमुळें आपलीं उथळ व क्षुद्र हृदयें संत्रस्त असतात. आपण कोण, याची आपणांला

जाणीव नसते. तो सर्वत्र प्रकट होणारा परमात्मा आपल्या हृदयांत अजून प्रकट झालेला नसतो. आपण दीनवाणें होऊन म्हणतों—

रुद्र यत् ते दक्षिणं मुखं
तेन मां पाहि नित्यम् ।

' हे भीषण रुद्रा, तुझ्या प्रसन्न दृष्टीनें मजकडे पाहा. '

आपला स्वार्थ म्हणजे आत्म्याला गुंडाळणारें कफन आहे. आपला स्वार्थ आत्मदेवाला मारतो, म्हणून आपली प्रार्थना असते—

असतो मा सत् गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय ॥

' असत्याकडून मला सत्याकडे ने, अंधारांतून प्रकाशाकडे ने, मृत्यूंतून अमृतत्वाकडे ने. ' परंतु ही प्रार्थना परिपूर्ण कशी व्हायची? कारण सत्य व असत्य, मृत्यु व अमृतत्व यांत अफाट अंतर आहे. परंतु गंमत अशी आहे कीं, हें अफाट अंतर क्षणांत तोडतां येतें. तो प्रकट होणारा हृदयांत प्रकट होतांच हें तीर व परतीर एकच होतात. सान्त व अनन्त तेथें भेटतात.

विश्वानि देव सवितर्
दुरितानि परा सुव ॥

' हे तेजस्वी तात, माझीं सकल पापें दूर कर.' पाप म्हणजे काय? स्वतःचें अनंत स्वरूप विसरून सान्त वस्तूंशीं जेव्हां जीव रमतो, तेव्हां पाप होतें. क्षुद्रतेनें अनंत आत्म्याचा केलेला तो पराजय असतो. हृदयाशीं कवडी धरून लाल रत्न आपण झुगारून देतों, हें पाप. पाप सत्याला झांकोळून टाकतें. आपण विषयामागें धांवतों, भोगासाठीं लाळ घोटतों. ते भोग का मोठे सुंदर असतात? आपल्या वासनांचा प्रकाश त्यांच्यावर पडून ते रमणीय व स्पृहणीय वाटतात. वस्तुतः त्या वस्तु, ते भोग पै किमतीचे. आपण त्यांना नसतें महत्त्व देतों. तारतम्य राहात नाहीं. या क्षुद्र वस्तूंसाठीं झगडतों, पदच्युत होतों. त्या अनंत परमात्म्याच्या प्रकाशांत सकस वस्तूंचें तारतम्यानें

मोजमाप करायचें, सर्वत्र मेळ निर्माण करायचा, हें आपण विसरूनच जातों. पदोपदीं मग आदळआपट, रडारड, अपयश. ईश्वरापासून आपण दूर आहोंत असें वाटतें. दुःख होतें. आणि कळवून आपण म्हणतों :

देवा ! तूं माझीं सकल पापें दूर कर.
यद् भद्रं तत् आसुव ॥

' जें कल्याणकारक असेल तें आण.'

आपण वैषयिक सुखांत रमतों, तेव्हां स्वतःपुरतें पाहतों. जेव्हां कल्याणमय गोष्टी आपण करतों, त्या वेळेस आपण सर्वांचे असतों. गर्भामध्यें असलेलें मूल आईच्या जीवनाशीं एकजीव असल्यामुळें आपोआप संवर्धिलें जातें. त्याचप्रमाणें आपण मंगलमय कर्में जेव्हां करतों, तेव्हां खालीं, वर, सर्वत्र पसरून राहिलेला परमात्मा, त्याच्याशीं आपण एकरूप होतों. ईश्वराशीं एकरूप होण्याचा दुसरा मार्ग नाहीं. म्हणून म्हटलें आहे : ज्याला सत्याची भूक आहे तो धन्य होय, त्याचें जीवन परिपूर्ण केलें जाईल. सत्य हें आत्म्याचें अन्न. सत्याशिवाय शाश्वताकडे जातां येणार नाहीं. सत्यावांचून विकास नाहीं.

नमः शंभवे ।

' ज्याच्यापासून मंगलाचा प्रवाह, त्याला नमस्कार.'

नमः शंकराय ।

' ज्याच्यापासून आत्म्याचें कल्याण जन्मतें, त्याला नमस्कार. '

नमः शिवाय शिवतराय ।

' जो मंगल आहे, परम मंगल आहे, त्याला नमस्कार.' त्या शंकराशीं, त्या शिवाशीं आपण सर्वतः जोडलेले आहोंत. शान्ति, एकता, आनंद, प्रेम, मांगल्य—सर्व प्रकारच्या या शिवरूपांनीं त्याच्याशीं आपण जोडलेले असतों.

मनुष्य स्वतःच्या परमोच्च विकासासाठीं धडपडत असतो. तदर्थ सारी शक्ति वेंचावी, असें त्याला वाटतें. स्वतःच्या विकासासाठींच तो धनदौलत

मिळवूं इच्छितो. परंतु संचय म्हणजे साक्षात्कार नव्हे. संचयानें आत्मदर्शन नाहीं. आंतरिक प्रकाशानेंच तो दिसेल.

दीलमां दीवो करो ।

'हृदयांतच दिवा हवा.' ईश्वराची हृदयांत भेट होणें म्हणजेच साक्षात्कार. स्वतःचें आत्मरूप पाहणें म्हणजे आत्म्यांतील परमात्मा पाहणें. हें दर्शन नाहीं तोंवर दुःख आहे. परमात्म्याचें स्वरूप प्रकट होणें आहे. ऋषि त्याला 'हे आविः —हें प्रकट होणाऱ्या' अशी हांक मारतो. हा 'आविः' जेव्हां हृदयांत आविर्भूत होतो, प्रकट होतो, तेव्हांच मानव पूर्ण होतो. त्याचा परमोच्च अव्यंग विकास तेव्हांच झाला असें समजावें.

मनुष्याला आपल्या वासनांतून संपूर्णतः बाहेर पडतां येत नाहीं. तो पंख फडफडवतो. परंतु जाळ्यांतून निसटतां येत नाहीं. म्हणून मानव कष्टी असतो. हें खरें दुखणें. हा खरा रोग. स्वतःच्या स्वार्थी संकुचित स्वरूपापलीकडचें विशाल रूप त्याला दिसत नाहीं. म्हणून रडत म्हणतो : 'आविः आविर्मयेधि'— प्रकट होणाऱ्या, माझ्या ठायीं प्रकट हो! क्षुधातृषांपेक्षां आत्मरूपाची ही तहान अंतरंगांत खालीं खोल असते. तिच्या शांतीशिवाय समाधान नाहीं. ही प्रार्थना सकल वस्तुमात्राच्या अंतरंगीं आहे. 'हे प्रकट होणाऱ्या, प्रकट हो' असें अणुरेणु जणुं ओरडत आहेत. सान्त जीवनांत त्या अनन्ताचा साक्षात्कार करून घेणें हा या जीवनाचा—सृष्टीचा हेतु. हा हेतु मानवी जीवनांतच फलद्रूप होतो. तेथें इच्छा इच्छेला भेटते. प्रेरणा प्रेरणेला भेटते.

ब्रह्मांडाधिपतीनें मानवी हृदय मोकळें ठेवलें आहे. तुम्ही बोलावल्याशिवाय तो तेथें येणार नाहीं. मानसिक व शारीरिक यंत्राच्या बाबतींत नियम पाळावे लागतात. कारण तेथें सृष्टीशीं आपण जोडलेले असतों. परंतु अंतरंगांत तुम्ही स्वतंत्र आहांत. तेथें ईश्वराला तुम्ही मज्जाव करूं शकाल. प्रभु तेथें राजाधिराज म्हणून, हुकूमशहा म्हणून येणार नाहीं. तुम्ही बोलावीपर्यंत हृदयाच्या दाराजवळ तो युगानुयुगें वाट पाहत उभा असतो. मानवाच्या अंतरंगांत ईश्वराची सत्ता नाहीं. तेथें प्रेम मिळविण्यासाठीं तर यायचें. तें सत्तेनें कसें जमेल? प्रेमाचा दूत जो सौंदर्य, त्यालाच हृदयाच्या आवारांत

प्रवेश मिळतो. परमेश्वरानें मनुष्याच्या इच्छास्वातंत्र्याच्या प्रान्तांतच बेबंदशाहीला वाव ठेवला आहे. गोष्टी इतक्या थराला येतात कीं, आपण म्हणतों, ' तो परमेश्वर असता तर माझ्या अंतःकरणांत असा धुमाकूळ त्यानें चालू दिला नसता ! ' खरोखरच तो करुणासागर शान्तपणें वाट पाहत दूर उभा असतो. त्याच्या धीमेपणाला सीमा नाहीं. बंद दारें तो जबरदस्तीनें उघडीत नाहीं. क्षुद्र जीवन ओळखून विशाल जीवनाकडे जावयाचें तें स्वेच्छेनें व्हावें. स्वतःचें स्वरूप ओळखून घ्यायचें तें मारून-मुटकून थोडेंच कां हो? प्रेमानेंच तें शक्य होतें. आपली स्वतंत्रता शेवटीं अनंततेला शरण जाते आणि तो प्रेममय प्रेमानें आपण मिळवितों.

जो परमात्म्याशीं समरस झाला, तो मानवजातीचें परम विकसित स्वरूप होय ! मानवजातीच्या वेलीवरील तें रमणीय फूल. मनुष्य आपलें खरें स्वरूप अशांच्या ठायीं पाहतो. मानवी आत्म्याच्या ठिकाणीं तेथें परमात्मा प्रकटलेला दिसतो. सान्त जीवनांत अनंतता फुललेली दिसते. अशा महात्म्याच्या ठिकाणीं परमेश्वराचा पूर्ण साक्षात्कार आपणांस होतो. मानवी इच्छा आणि परमेश्वरी इच्छा यांचा तेथें अविरोध दिसतो. मानवी प्रेम अविनाशी प्रेमांत मिळून गेलेलें दिसतें.

म्हणून या भरतभूमींत परमेश्वरावर प्रेम करण्याऱ्याला लोक डोक्यावर घेतात. कोणाला मिळणार नाहीं, अशी मानसन्मानपूजा त्याला मिळते. पाश्चिमात्यांना याचें हंसूं येतें. मानवाचा असा सत्कार करणें त्यांना कसें तरी वाटतें. परंतु पौरस्त्य दृष्टीला अशा व्यक्तीच्या ठिकाणीं ईश्वरी इच्छा फलद्रूप झालेली दिसते. ईश्वरी आनंद तेथें फुललेला दिसतो. त्या व्यक्तीच्या द्वारां सारी मानवजात जणूं देवाजवळ जाते. मानवजातीचें देवाशीं सख्य जोडलें जातें. ईश्वरी प्रेमानें जळणारें संतांचें जीवन आपल्या सर्वांच्या प्रेमाला उजळा देतें. दैवी प्रेमाचा हा जो अपूर्व नि अपार सोहळा महात्म्यांच्या ठायीं दिसतो, त्याच्याभोंवतीं आपण आपल्या जीवनांतील मोलवान् स्मृति रचतों. तेथें आपण आपले सुखदुःखाचे अनुभव ओततों. त्याच्या ठिकाणीं जें दृश्य दिसतें, त्याचें आपण नाटक बनवतों. परिचित व क्षुद्र अशा वस्तुजातांतून अनंत गूढ शक्तीचा प्रवाह वाहत आहे असें दिसतें.

एक संगीत सर्वत्र आहे असें भासतें. हे तरु, हे तारे, या निळ्या निळ्या टेकड्या, हें आकाश या सर्वांना अर्थ प्राप्त होतो. शब्दांनीं ज्यांचें विवेचन करतां येणार नाहीं, अशा खुणा या वस्तु दाखवतात. मनुष्य जेव्हां क्षुद्र जीवनाचा पडदा फाडून आपल्या आत्म्याला—त्या चिरप्रियकराला समोर बघतो, त्या वेळेस नवीन सृष्टि निर्माण करणाऱ्या परमेश्वरालाच आपण पाहत आहोंत असें वाटतें. ही धन्य स्थिति, ही परमदशा म्हणजे काय? ही दशा वासंतिक प्रभातकाला-सारखी असते. विविध प्रकारच्या सौंदर्यांत पूर्णता व एकता दिसते. चंचलता जाऊन मनुष्य आत्म्याशीं एकरूप होतो, तेव्हां अनंताची त्याला अनुभूति सहज होते. जीवनांतील सारे विरोध मावळतात. सारे संघर्ष शान्त होतात. प्रेम, ज्ञान आणि कर्म यांचें सामरस्य होतें. सुखदुःख एकरूप होऊन दिव्य सौंदर्य प्रकट होतें. त्याग व भोग एकरूप होऊन मांगल्य जन्मतें. सान्त आणि अनन्त यांतील अंतर प्रेमपूर येऊन दूर होतें. क्षणाक्षणाला अमरत्वाचा संदेश मिळतो. तो निराकार परमात्मा फळाच्या रूपानें, फुलाच्या रूपानें प्रतीत होतो. तो अपार व महान् विभु आईप्रमाणें आपणांस जवळ घेत आहे, मित्राप्रमाणें आपणांजवळ बोलत आहे असें वाटतें. मनुष्यांतील आत्मा सर्व व्याधि तोडून हें महान् ऐक्य अनुभवूं शकतो. जोंपर्यंत ही आंतरिक एकता आपणांस लाभत नाहीं, जोंपर्यंत जीवनाची परिपूर्णता समजत नाहीं; तोंपर्यंत हें जीवन म्हणजे नाना संवयींचें एक गांठोडें एवढाच त्याला अर्थ. तोंपर्यंत हें जीवन जड यंत्रवत् वाटेल. जेथें उपभोग घेतां येईल, उपयोग असेल, तेथें जगाचा कब्जा घ्यावा, जेथें धोका वाटेल तेथें रक्षणार्थ उभें राहावें, असें हें जग तुम्हांला वाटेल. परंतु हें जग आपलेंच आहे, आपण त्याच्याशीं एकरूप आहोंत, हा अनुभव येणार नाहीं. आणि हा अनुभव नाहीं तोंवर जीवन शुष्क व नीरसच वाटेल.

* * *

# पापाचा प्रश्न

जगांत पाप कां आहे, असें विचारणें म्हणजे जगांत अपूर्णता कां, असें विचारण्यासारखें आहे. किंबहुना ही सृष्टि उत्पन्नच कां करण्यांत आली, असें विचारण्यासारखें आहे. जगांत पाप असणारच हें गृहीत धरूनच जायला हवें. कारण जग हळूंहळूं पूर्णतेकडे जात आहे. प्रश्न असा विचारायला हवा कीं, जगांतील पाप शाश्वत स्वरूपाचें आहे का? जगांतील दुष्टता जगाच्या अंतापर्यंत राहणार का? नदीला दोहों बाजूंना बंधनांत ठेवणारीं तीरें आहेत. परंतु तीं तीरें म्हणजे का नदी? उलट त्या बंधनांमुळेंच नदी पुढें जाते. बोटीला दोरी बांधून ओढतात. ती दोरी का बंधन? त्या बंधनामुळेंच बोट पुढें नाहीं का येत?

जगाच्या प्रवाहाला मर्यादा आहेत, बंधनें आहेत. परंतु त्यामुळें जग बद्ध न होतां पुढेंच जात आहे. या जगांत दुःखें, अडथळे आहेत यांचें आश्चर्य न वाटतां या जगांत नियमबद्धता आहे, व्यवस्था आहे, सुंदरता आहे, सद्भाव आहे, प्रेम आहे, आनंद आहे, याचें आश्चर्य वाटलें पाहिजे. जें अपूर्ण आहे तेंहि त्या परिपूर्णाचेंच स्वरूप आहे, ही गोष्ट मानवाला अंतर्गाभाऱ्यांत कळलेली आहे. निरानिराळ्या सुरांत संपूर्ण संगीताचें जसें गायकाला दर्शन होतें, तसेंच अपूर्णातहि पूर्णतेचें दर्शन दृष्टि असलेला मनुष्य घेऊं शकतो. जें मर्यादित दिसतें तें त्या मर्यादांनीं कोंडलेलें नाहीं. हा विरोधाभास मानवास समजलेला आहे. जें मर्यादित दिसतें तें क्षणाक्षणाला मर्यादा सोडून पुढें जात आहे. खरें म्हणजे अपूर्णता म्हणजे पूर्णतेचा अभाव नव्हे. सान्तता अनंततेला विरोधी नाहीं. अंशाअंशानें प्रकटणारी पूर्णता म्हणजे अपूर्णता. मर्यादित स्वरूपांत प्रकट होणारी अनन्तता म्हणजे सान्तता.

दुःख आहे म्हणून आपण अपूर्ण आहोंत असें वाटतें. परंतु हें दुःख म्हणजे जीवनांतील सत्यता नव्हे. दुःखाचा हेतु दुःखच नाहीं. शास्त्रांच्या

इतिहासांत अनेक चुका घडलेल्या दिसतात. पुढील शास्त्रज्ञांनीं त्या दूर केल्या. त्या चुका का शाश्वत स्वरूपाच्या ? चूक ही स्वभावतःच विनाशी आहे. चुकीची आज ना उद्यां दुरुस्ती होणारच. सत्य कायम टिकणारें. परंतु असत्य नष्ट होत असतें. बौद्धिक क्षेत्रांत जसें चुकांचें, तसें दुःख, दोष, पाप यांचें जीवनांत स्थान आहे. दुःख, पाप यांना आपण फाजील महत्त्व देतों. तीच सत्यता असें समजतों. जगांतील प्रत्येक मिनिटाला होणाऱ्या मृत्यूचेच आंकडे जमवले तर आपण घाबरून जाऊं. परंतु जीवनाचा प्रवाह अखंड चालू आहे. मृत्यूनें तो अडत नाहीं. जगांत रोग असोत, मरण असो. ही पृथ्वी, हें पाणी, ही हवा, हा प्रकाश सर्वांना सुखवायला नि हंसवायला सिद्ध आहे. विनाशी वस्तूंचें आपण उगीच प्रस्थ माजवतों आणि कपाळाला हात लावून बसतों. मनुष्य जेव्हां जीवनांतील एखाद्या विवक्षित अंगालाच महत्त्व देतो, तेव्हां सत्याचा त्याला विसर पडतो. गुप्त पोलीस सारखे गुन्हे शोधीत असतो. सामाजिक जीवनांत तो गुन्हेगारीलाच अधिक महत्त्व देतो. परंतु हें जें विशाल सामाजिक जीवन, तेथें वाटेल त्या प्रश्नाला वाटेल तेवढी जागा मिळणार नाहीं. एखादा शास्त्रज्ञ उभा राहतो नि म्हणतो, " काय ही भेसूर सृष्टि ! हा त्याला खात आहे, तो ह्याला खात आहे. " अशा रीतीनें आपण एकांगी दृष्टीचे बनतों आणि सत्य गमावतों. आपल्या शरीराच्या प्रत्येक चौरस इंचावर हवेचा केवढा दाब हें लक्षांत आणूं, तर अजून चिरडले कसें गेलों नाहीं, याचें आश्चर्य वाटेल. परंतु हवेच्या या वजनाची बेरीज-वजाबाकी होऊन सुंदर व्यवस्था लागते. आणि हें सारें ओझें आपण लीलेनें उचलीत असतों. हें ओझें उचलीत आहोंत, याचें आपणांस भानहि नसतें. सृष्टींत जीवनार्थ कलह आहे. तर इकडे दुसऱ्याहि अनेक गोष्टी आहेत. मुलांबद्दलचें वात्सल्य, मित्रांबद्दलचें प्रेम, स्वार्थत्याग, कृतज्ञता, बंधुभाव याहि गोष्टी सर्वत्र आहेत. दया, त्याग यांचा जन्म प्रेमांतून होतो. आणि प्रेम हें जीवनाचें सार आहे.

आपण मरणावर दृष्टि सारखी खिळवूं तर जग हें खाटिकखाना दिसेल. परंतु चोवीस तासांत मनांत मृत्यूचा विचार किती वेळ असतो ? मृत्यूचा विचार हा कधीं कधीं पाहुण्यासारखा मनांत येतो. प्रेम हें जीवनाचें अस्तिरूप आहे तर मृत्यु हें जीवनाचें नास्तिरूप आहे. आपण डोळ्यांच्या पापण्या कितीदां तरी मिटतों, इकडे आपलें लक्ष नसतें. आपण बघतों, ही गोष्ट ध्यानांत असते.

आजूबाजूला मृत्यु असला तरी आपलें लक्ष जीवनाकडे असतें. हें महान् जीवन मृत्यूची मातब्बरी राखीत नाहीं. जीवन हंसत खेळत, नाचत गात पुढें जात आहे. जीवनांत हास्य आहे, लास्य आहे, खेळ आहे, गंमत आहे. मनुष्य नवीन बांधतो, प्रेम करतो. मृत्यूच्या नाकावर टिचून हें महान् जीवन उसळत आहे. जीवनांतून मृत्यूला बाजूला काढून त्याच्यावरच फक्त जेव्हां आपण दृष्टि खिळवून बसतों, तेव्हां आपणांस सारें भीषण वाटतें. परंतु मृत्यु हें एक जीवनांग आहे. दुर्बिणींतून एखाद्या सुंदर वस्त्राकडे पाहाल तर मोठमोठीं भोकें सर्वत्र दिसतील. मग तें वस्त्र हातांत धरायला नको. परंतु खरी गोष्ट का तशी आहे ? आकाश कधीं काळे दिसलें तरी तें काळेपण उडणाऱ्या पक्ष्याच्या पंखांना काळें करूं शकणार नाहीं.

मूल जेव्हां नव्यानें चालूं लागतें, तेव्हां शंभरदां पडतें. परंतु एकदां उभें राहातें. त्या मुलाचें लक्ष पडण्याकडे नसतें. उभें राहतांच तें टाळ्या वाजवतें, नाचतें. आपल्या जीवनाचें असेंच आहे. दुःखें, आपत्ति आहेतच. परंतु त्यांमुळें आपण दुर्बल आहोंत, असेंच मनांत समजाल तर साराच ग्रन्थ आटोपला. कार्यक्षेत्रांतील कांहीं विवक्षित गोष्टींवरच भर देऊन बसाल तर अपयशच दिसेल, दुःखेंच दिसतील. परंतु जीवन तुम्हांला विशाल दृष्टि घ्यायला सांगत असतें. म्हणजे मग पलीकडची पूर्णता दिसते, ध्येय दिसतें. तिकडे जायची आशा उत्पन्न होते. श्रद्धा जागी होते. हीं बंधनें सद्यःकालीन आहेत. हीं जातील. आपण अधिक शक्ति लावली पाहिजे. प्रबल इच्छाशक्ति घेऊन उभें राहिलें पाहिजे, असें मग वाटतें. श्रद्धेसमोर संकटें टिकूं शकत नाहींत. श्रद्धा अनंत क्षेत्र दाखविते. श्रद्धा म्हणते नराचा नारायण होईल. जिवाशिवांचें ऐक्य होईल. तुझीं स्वप्नें पुरीं होतील.

अनन्ताकडे दृष्टि देतांच सत्य दिसेल. संकुचित वर्तमानापुरतें पहाल तर सत्य सांपडणार नाहीं. इंद्रियांमुळें शेंकडों, हजारों संवेदना होतात. परंतु आपणांजवळ जें गोळा होतें, त्यांतील काय ठेवावें, काय फेकावें, याचा आपण विचार करतों. व्यापकपणा असल्याशिवाय हा विचार येणार नाहीं. आपलें जीवन अनन्ताकडे, पूर्णतेकडे जात आहे. सत्य आपणांस जें दिसलें, जें मिळालें, त्याच्या पलीकडे नेत असतें आणि शेवटीं अ-सीमाजवळ नेऊन

उभें करतें. पापहि उद्यां पुण्याच्या रूपानें फुलेल. पाप सत्याशीं, पूर्णतेशीं तोंड देऊं शकणार नाहीं. अंधार प्रकाशाशीं झुंजायला येईल तर स्वतःच प्रकाशरूप होईल. खरें म्हणजे माणसाचें वाइटाकडे फार लक्ष नसतें. सतारीच्या तारांतून भेसूरता निर्माण होऊं शकेल. परंतु ही सतार सुरेल संगीतासाठीं आहे, या गोष्टीवर आपण लक्ष देतों, त्याप्रमाणेंच आपण परिपूर्ण होऊं शकूं, अव्यंग होऊं शकूं, या श्रद्धेसमोर जगांतील दुःखें, पापें, विरोध मावळतील. हें जीवन, हा संसार दुःखमयच, असें म्हणणारे असतात. परंतु कांहींनीं अशी एकांगी दृष्टि घेतली तरी जीवन पुढें नेणारें आहे, आशा देणारें आहे. निराशावाद हें दौर्बल्य आहे. कांहींच्या मनाची ती ठेवणच असते. त्यांना आनंदानें राहणें आवडतच नाहीं. सारें तुच्छ, निस्सार आहे, असें म्हणण्यांतच त्यांना आनंद वाटतो. हें जीवन वाईटच असतें तर तसें सिद्ध करायला तत्त्वज्ञान कशाला हवें ? मी वाईट नाहीं, असें हें समोरचें जीवन सांगत आहे. या जीवनाला वाईट म्हणणें म्हणजे समोर जिवंत असणाऱ्या माणसावर मढ्याचा आरोप करण्यासारखें आहे.

अपूर्णता पूर्णतेकडे जात असते. असत्यांतून सत्याकडे जायचें असतें. ज्ञान म्हणजे काय ? चुकांना काडी लागत असते आणि त्यांतून ज्ञानाचा प्रकाश मिळतो. आपणांला अन्तर्बाह्य दुष्टतेशीं झगडत पुढें जायचें आहे. जगण्यासाठीं या शरीररूपी यंत्रांत खाद्यरूपी इंधन घालावें लागतें, त्याप्रमाणें आपलें नैतिक जीवन प्राणमय राहावें म्हणून तेथेंहि कांहीं जळण लागतें. जगांतील कितीहि वाईट गोष्टी तुम्हीं दाखवल्यात तरी मानवजात अंधारांतून प्रकाशाकडे जात आहे, अशी श्रद्धा आपल्या जीवनांत खोल असते. कोणत्याहि काळीं नि कोणत्याहि देशांत मनुष्यानें जर कशाला किंमत दिली असेल तर ती मांगल्याच्या ध्येयाला. मानवी जीवनांत सद्भावाला चिरंजीव स्थान आहे. आपण त्यांचा आदर करतों, त्यांच्यावर प्रेम करतों, ज्यांनीं आपल्या जीवनांत मानवी मोठेपणा प्रकट केला.

सत् कशाला म्हणावें ? नैतिक जीवन म्हणजे काय ? मनुष्य ज्या वेळेस मोठी दृष्टि घेऊन बघतो, आपलें स्वरूप आपण आज आहोंत त्याहून निराळें आहे, तें सुंदर आहे, महान् आहे, असें जेव्हां त्याला वाटतें, तेव्हां त्यानें

नैतिक जीवनाच्या अंगणांत पाऊल टाकलें असें होईल. कारण ज्या ध्येयाप्रत जाऊन पोंचावयाचें असतें, त्याची त्याला अशा वेळेस जाणीव होते. केव्हां एकदां ती धन्यतम स्थिति मिळवून येईन असें त्याला होतें. ती परम दशा म्हणजे आपलें खरें स्वरूप असें वाटून त्याच्या क्षणिक वासना मरतात. त्याची इच्छाशक्ति जागी होते. जीवनाकडे बघण्याची दृष्टि बदलते. तें ध्येय-भूत जीवन व सद्यःकालीन जीवन यांचा झगडा सुरू होतो. क्षणिक सुख व शाश्वत कल्याण यांतील फरक लक्षांत येतो. आपल्या विशाल जीवनास पोषक तें सत् असें ठरतें. जीवनाविषयींची अशी दृष्टि आली म्हणजे सर्व कर्मांत एक प्रकारची सुसंवादिता निर्माण होते. जीवनांत मेळ येऊं लागतो. सर्व शक्तीनें त्या दूर असणाऱ्या ध्येयभूत जीवनाकडे तो निघतो. त्या दूरच्या सत्यमय भविष्यासाठीं तो त्याग करतो. अशा रीतीनें तो मोठा होत जातो, सत्य अनुभवूं लागतो. जगांत स्वार्थहि नीट साधायचा असेल तर नीतिमय राहावें लागतें; केवळ वासनांचें गुलाम होऊन भागत नाहीं.

जीवन खंडमय नसून अखंड आहे, हेतुशून्य नसून हेतुमय आहे, सतत पुढें जाणारें आहे, अशी दृष्टि म्हणजे नैतिक दृष्टि. ही दृष्टि आली म्हणजे आपला आत्मा अनंत काळाला व्यापून राहिला आहे असें समजतें. मग स्वतःपुरतें फक्त पाहणें म्हणजे चूक आहे, ही गोष्ट ध्यानांत येते. आपल्या व्यक्तिगत जीवनाहून विशाल असें एक आपलें जीवन आहे, जें सर्वांशीं संबद्ध आहे, याची थोडीफार तरी जाणीव प्रत्येकाला असते. दुसऱ्यासाठीं स्वतःच्या इच्छा ज्यानें फेकून दिल्या नाहींत, दुसऱ्यासाठीं स्वतःचें सुख ज्यानें भिरकावलें नाहीं, असा एकहि मनुष्य आढळणार नाहीं. मनुष्य हा केवळ अलग जीव नाहीं. त्याचें विश्वात्मक स्वरूप आहे. आपलें हें व्यापक स्वरूप मनुष्य जेव्हां ओळखतो, तेव्हां तो मोठा होतो. सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊं पाहणाऱ्या लोकांनाहि या गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें. कारण त्यांना सामर्थ्य हवें असतें. आणि सत्याची उपेक्षा करून त्याचेंहि चालत नाहीं. सत्याची मदत मिळावी म्हणून स्वार्थालाहि थोडेंफार निःस्वार्थ व्हावें लागतें. दरोडेखोरांच्या टोळीसहि कांहीं नीतिनियम पाळावे लागतात. ते सर्व जगाला लुटतील, परंतु परस्परांस लुटणार नाहींत. अनैतिक हेतूच्या पूर्ततेसाठीं त्यांनाहि कांहीं नैतिक शस्त्रें जवळ ठेवावीं लागतात. पुष्कळ वेळां असें दिसतें कीं,

नैतिक शक्तीमुळेंच वाईट करण्याची शक्ति मिळाली. नैतिक सामर्थ्याच्या जोरावरच आपण दुसऱ्यांस लुबाडतों, गुलाम करतों ! पशूंच्या जीवनांत नीति नाहीं. कारण वर्तमान काळाच्या पलीकडे त्यांची दृष्टि नाहीं. मनुष्याचें जीवन अनैतिक असू शकतें. परंतु अशा जीवनालाहि नीतीचा आधार लागतो. जें अनैतिक आहे तें कमी नैतिक आहे, त्यांतील नीति परिपूर्ण नाहीं, एवढाच अर्थ. जें असत्य असतें तेंहि थोड्या अंशीं सत्य असतें. तसें नसेल तर तें असत्यहि उरणार नाहीं. कांहींच न दिसणें म्हणजे अन्य असणें. परंतु चुकीचें दिसणें याचा अर्थ कांहींच पाहिलें नाहीं असा नव्हे, तर नीट पाहिलें नाहीं, पूर्णतया पाहिलें नाहीं. स्वार्थी मनुष्यालाहि स्वार्थासाठीं इतरांशीं संबंध ठेवावे लागतात. त्यालाहि कांहीं मर्यादा पाळाव्या लागतात. स्वार्थी मनुष्य स्वतःसाठीं का होईना कष्ट सोसतो, हाल काढतो, तोहि दुःख भोगतो. परंतु जाणतो कीं, पुढें सुख येईल. जीवनांत लहान दृष्टीला जी गोष्ट दुःखदायक वाटते, तीच गोष्ट विशाल दृष्टीच्या मनुष्यास अन्तीं लाभदायक वाटते. जें गमावलें असें वाटतें, तें अशा मनुष्यास कमावल्याप्रमाणें वाटतें.

ध्येयासाठीं जगणाऱ्या मनुष्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होत असतो. त्याला तात्पुरतीं सुखें क्षुद्र वाटूं लागतात. सुख हें स्वतःपुरतें असतें. परंतु ज्याला आपण सत् असें म्हणतों, त्याचा संबंध सर्व मानवजातीच्या सर्वकालीन सुखांशीं असतो. सत् असें जीवन जगणें म्हणजे सर्वांसाठीं जगणें. सत्‌ची कल्पना डोळ्यांसमोर ठेवून आपण पाहूं लागलों म्हणजे सुखदुःखांविषयींची आपली कल्पना, आपली दृष्टि पार बदलून जाते. मग सुखें फेकावींत, दुःखें संकटें वरावीं, असें वाटूं लागतें. जीवनाला अधिक मोल आणून देणारा मृत्यूहि स्पृहणीय वाटतो. मानवी जीवनाच्या विशाल दृष्टीनें विचार करूं लागल्यावर, सत्‌च्या दृष्टीनें विचार करूं लागल्यावर सुखदुःखांचा विचार शिवत नाहीं. हुतात्मे ही गोष्ट सिद्ध करीत असतात. तुमच्या-आमच्या जीवनांतहि ही गोष्ट थोड्याफार प्रमाणांत दिसून येतच असते. समुद्रांतून एक घडा भरून नेला तर ओझें वाटतें. परंतु सागरांत बुड्या मारतांना हजारों घागरी पाणी डोक्यावर असूनहि त्याचें ओझें वाटत नाहीं ! ज्या वेळेस आपण स्वार्थाच्या भूमिकेवर उभे असतों, तेव्हां सुखदुःखांचा भरपूर बोजा आपणांस वाटतो. परंतु नैतिक

सा.... ३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ..............
क्रमांक .................... नोंः दिः ..............

भूमिकेवर उभे राहतांच तींच सुखदुःखें आपण सहज उचलतों. मग सुखानें हुरळत नाहीं, दुःखानें होरपळत नाहीं. " सुखदुःखे समे कृत्वा " ही भावना होते. महापुरुष आपत्तींचे डोंगरहि कसे सहन करतो, हें पाहून आपण कौतुक करतों. अपार छळ होत असतांहि तो क्षमामूर्ति राहतो. मानवी जीवनाचा मोठेपणा अशांच्या द्वारां कळून येतो.

अत्यंत सुंदर जीवन म्हणजे अनंत जीवनांतच आपलें यथार्थ जीवन आहे हें ओळखून वागणें होय. संपूर्ण जीवन पाहण्याची नैतिक दृष्टि आपणांजवळ हवी. भगवान् बुद्ध हीच विशाल नैतिक दृष्टि घ्या असें सांगतात. नैतिक शक्ति पराकाष्ठेची करायला ते सांगतात. क्षुद्र स्वार्थ नका पाहूं, असें परोपरीनें त्यांनीं सांगितलें. ख्रिस्ताच्या उपदेशाचें हेंच सार. विश्वात्मक जीवन जेव्हां आपणांस प्राप्त होईल, तेव्हांच सुखदुःखांच्या द्वंद्वांतून आपण मुक्त होऊं. स्वार्थरहित हृदय अपार आनंदानें भरून येतें. हा आनंद अनन्त प्रेमापासून जन्मलेला असतो. आणि ही स्थिति कर्मशून्यतेची नसते. प्रेम कर्मप्रवृत्त करतें. तुमचें कर्म वाढतें, उदात्त होतें. तुमच्या कर्मांचा हेतु अतःपर स्वार्थ हा नसून 'लोककल्याण' हा असतो. या विश्वांतील अनंत कर्मांशीं एकरूप होणें, सहकार्य करणें म्हणजेच गीतेचा कर्मयोग. दुःखाच्या मगरमिठींतून कसें मुक्त व्हावें, याचा विचार बुद्धदेव सारखा करीत होते. चिंतन करतां करतां हें ज्ञान त्यांना मिळालें कीं, व्यक्ति स्वतःला समष्टींत जेव्हां मिसळते, त्या वेळेस दुःखापासून सुटका.

माझा एक विद्यार्थी एकदां वातचक्रांत सांपडला. धुळीचे लोट उठले. तो विद्यार्थी मला म्हणाला, " तें वादळ माझा उपमर्द करीत होतें. मी म्हणजे जणूं मूठभर माती. स्वतंत्र इच्छाशक्ति असलेला मी एक जीव आहें, याची त्या वादळाला पर्वाच नव्हती ! "

मीं त्याला म्हटलें, " सृष्टि जर प्रत्येक व्यक्तीच्या इच्छांचा विचार करूं लागेल तर तिचें कार्यच थांबेल. तुम्हां सर्वांनाच मग अपार आपत्ति भोगाव्या लागतील. "

तरीहि तो ऐकेना. त्याचें म्हणणें असें कीं, " माझें अस्तित्व नाकारून चालणार नाहीं. मला का महत्त्व नाहीं ? माझ्यांतील अहं हा का कःपदार्थ ? "

नैतिक जीवनाच्या अंगणांत पाऊल टाकलें असें होईल. कारण ज्या ध्येयाप्रत जाऊन पोंचावयाचें असतें, त्याची त्याला अशा वेळेस जाणीव होते. केव्हां एकदां ती धन्यतम स्थिति मिळवून येईन असें त्याला होतें. ती परम दशा म्हणजे आपलें खरें स्वरूप असें वाटून त्याच्या क्षणिक वासना मरतात. त्याची इच्छाशक्ति जागी होते. जीवनाकडे बघण्याची दृष्टि बदलते. तें ध्येय-भूत जीवन व सद्यःकालीन जीवन यांचा झगडा सुरू होतो. क्षणिक सुख व शाश्वत कल्याण यांतील फरक लक्षांत येतो. आपल्या विशाल जीवनास पोषक तें सत् असें ठरतें. जीवनाविषयींची अशी दृष्टि आली म्हणजे सर्व कर्मांत एक प्रकारची सुसंवादिता निर्माण होते. जीवनांत मेळ येऊं लागतो. सर्व शक्तीनें त्या दूर असणाऱ्या ध्येयभूत जीवनाकडे तो निघतो. त्या दूरच्या सत्यमय भविष्यासाठीं तो त्याग करतो. अशा रीतीनें तो मोठा होत जातो, सत्य अनुभवूं लागतो. जगांत स्वार्थहि नीट साधायचा असेल तर नीतिमय राहावें लागतें; केवळ वासनांचें गुलाम होऊन भागत नाहीं.

जीवन खंडमय नसून अखंड आहे, हेतुशून्य नसून हेतुमय आहे, सतत पुढें जाणारें आहे, अशी दृष्टि म्हणजे नैतिक दृष्टि. ही दृष्टि आली म्हणजे आपला आत्मा अनंत काळाला व्यापून राहिला आहे असें समजतें. मग स्वतःपुरतें फक्त पाहणें म्हणजे चूक आहे, ही गोष्ट ध्यानांत येते. आपल्या व्यक्तिगत जीवनाहून विशाल असें एक आपलें जीवन आहे, जें सर्वांशीं संबद्ध आहे, याची थोडीफार तरी जाणीव प्रत्येकाला असते. दुसऱ्यासाठीं स्वतःच्या इच्छा ज्यानें फेकून दिल्या नाहींत, दुसऱ्यासाठीं स्वतःचें सुख ज्यानें भिरकावलें नाहीं, असा एकहि मनुष्य आढळणार नाहीं. मनुष्य हा केवळ अलग जीव नाहीं. त्याचें विश्वात्मक स्वरूप आहे. आपलें हें व्यापक स्वरूप मनुष्य जेव्हां ओळखतो, तेव्हां तो मोठा होतो. सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊं पाहणाऱ्या लोकांनाहि या गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें. कारण त्यांना सामर्थ्य हवें असतें. आणि सत्याची उपेक्षा करून त्याचेंहि चालत नाहीं. सत्याची मदत मिळावी म्हणून स्वार्थालाहि थोडेंफार निःस्वार्थ व्हावें लागतें. दरोडेखोरांच्या टोळीसहि कांहीं नीतिनियम पाळावे लागतात. ते सर्व जगाला लुटतील, परंतु परस्परांस लुटणार नाहींत. अनैतिक हेतूच्या पूर्ततेसाठीं त्यांनाहि कांहीं नैतिक शस्त्रें जवळ ठेवावीं लागतात. पुष्कळ वेळां असें दिसतें कीं,

नैतिक शक्तीमुळेंच वाईट करण्याची शक्ति मिळाली. नैतिक सामर्थ्याच्या जोरावरच आपण दुसऱ्यांस लुबाडतों, गुलाम करतों ! पशूंच्या जीवनांत नीति नाहीं. कारण वर्तमान काळाच्या पलीकडे त्यांची दृष्टि नाहीं. मनुष्याचें जीवन अनैतिक असू शकतें. परंतु अशा जीवनालाहि नीतीचा आधार लागतो. जें अनैतिक आहे तें कमी नैतिक आहे, त्यांतील नीति परिपूर्ण नाहीं, एवढाच अर्थ. जें असत्य असतें तेंहि थोड्या अंशीं सत्य असतें. तसें नसेल तर तें असत्यहि उरणार नाहीं. कांहींच न दिसणें म्हणजे अन्य असणें. परंतु चुकीचें दिसणें याचा अर्थ कांहींच पाहिलें नाहीं असा नव्हे, तर नीट पाहिलें नाहीं, पूर्णतया पाहिलें नाहीं. स्वार्थी मनुष्यालाहि स्वार्थासाठीं इतरांशीं संबंध ठेवावे लागतात. त्यालाहि कांहीं मर्यादा पाळाव्या लागतात. स्वार्थी मनुष्य स्वतःसाठीं का होईना कष्ट सोसतो, हाल काढतो, तोहि दुःख भोगतो. परंतु जाणतो कीं, पुढें सुख येईल. जीवनांत लहान दृष्टीला जी गोष्ट दुःखदायक वाटते, तीच गोष्ट विशाल दृष्टीच्या मनुष्यास अन्तीं लाभदायक वाटते. जें गमावलें असें वाटतें, तें अशा मनुष्यास कमावल्याप्रमाणें वाटतें.

ध्येयासाठीं जगणाऱ्या मनुष्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होत असतो. त्याला तात्पुरतीं सुखें क्षुद्र वाटूं लागतात. सुख हें स्वतःपुरतें असतें. परंतु ज्याला आपण सत् असें म्हणतों, त्याचा संबंध सर्व मानवजातीच्या सर्वकालीन सुखांशीं असतो. सत् असें जीवन जगणें म्हणजे सर्वांसाठीं जगणें. सत्‌ची कल्पना डोळ्यांसमोर ठेवून आपण पाहूं लागलों म्हणजे सुखदुःखांविषयींची आपली कल्पना, आपली दृष्टि पार बदलून जाते. मग सुखें फेकावींत, दुःखें संकटें वरावीं, असें वाटूं लागतें. जीवनाला अधिक मोल आणून देणारा मृत्यूहि स्पृहणीय वाटतो. मानवी जीवनाच्या विशाल दृष्टीनें विचार करूं लागल्यावर, सत्‌च्या दृष्टीनें विचार करूं लागल्यावर सुखदुःखांचा विचार शिवत नाहीं. हुतात्मे ही गोष्ट सिद्ध करीत असतात. तुमच्या-आमच्या जीवनांतहि ही गोष्ट थोड्याफार प्रमाणांत दिसून येतच असते. समुद्रांतून एक घडा भरून नेला तर ओझें वाटतें. परंतु सागरांत बुड्या मारतांना हजारों घागरी पाणी डोक्यावर असूनहि त्याचें ओझें वाटत नाहीं ! ज्या वेळेस आपण स्वार्थाच्या भूमिकेवर उभे असतों, तेव्हां सुखदुःखांचा भरपूर बोजा आपणांस वाटतो. परंतु नैतिक



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ........................
क्रमांक ........................ नोंः दिः ........................

भूमिकेवर उभे राहतांच तींच सुखदुःखें आपण सहज उचलतों. मग सुखानें हुरळत नाहीं, दुःखानें होरपळत नाहीं. " सुखदुःखे समे कृत्वा " ही भावना होते. महापुरुष आपत्तींचे डोंगरहि कसे सहन करतो, हें पाहून आपण कौतुक करतों. अपार छळ होत असतांहि तो क्षमामूर्ति राहतो. मानवी जीवनाचा मोठेपणा अशांच्या द्वारां कळून येतो.

अत्यंत सुंदर जीवन म्हणजे अनंत जीवनांतच आपलें यथार्थ जीवन आहे हें ओळखून वागणें होय. संपूर्ण जीवन पाहण्याची नैतिक दृष्टि आपणांजवळ हवी. भगवान् बुद्ध हीच विशाल नैतिक दृष्टि द्या असें सांगतात. नैतिक शक्ति पराकाष्ठेची करायला ते सागतात. क्षुद्र स्वार्थ नका पाहूं, असें परोपरीनें त्यांनीं सांगितलें. ख्रिस्ताच्या उपदेशाचें हेंच सार. विश्वात्मक जीवन जेव्हां आपणांस प्राप्त होईल, तेव्हांच सुखदुःखांच्या द्वंद्वांतून आपण मुक्त होऊं. स्वार्थरहित हृदय अपार आनंदानें भरून येतें. हा आनंद अनन्त प्रेमापासून जन्मलेला असतो. आणि ही स्थिति कर्मशून्यतेची नसते. प्रेम कर्मप्रवृत्त करतें. तुमचें कर्म वाढतें, उदात्त होतें. तुमच्या कर्माचा हेतु अतःपर स्वार्थ हा नसून 'लोककल्याण' हा असतो. या विश्वांतील अनंत कर्मांशीं एकरूप होणें, सहकार्य करणें म्हणजेच गीतेचा कर्मयोग. दुःखाच्या मगरमिठींतून कसें मुक्त व्हावें, याचा विचार बुद्धदेव सारखा करीत होते. चिंतन करतां करतां हें ज्ञान त्यांना मिळालें कीं, व्यक्ति स्वतःला समष्टींत जेव्हां मिसळते, त्या वेळेस दुःखापासून सुटका.

माझा एक विद्यार्थी एकदां वातचक्रांत सांपडला. धुळीचे लोट उठले. तो विद्यार्थी मला म्हणाला, " तें वादळ माझा उपमर्द करीत होतें. मी म्हणजे जणूं मूठभर माती. स्वतंत्र इच्छाशक्ति असलेला मी एक जीव आहें, याची त्या वादळाला पर्वाच नव्हती ! "

मीं त्याला म्हटलें, " सृष्टि जर प्रत्येक व्यक्तीच्या इच्छांचा विचार करूं लागेल तर तिचें कार्यच थांबेल. तुम्हां सर्वांनाच मग अपार आपत्ति भोगाव्या लागतील. "

तरीहि तो ऐकेना. त्याचें म्हणणें असें कीं, " माझें अस्तित्व नाकारून चालणार नाहीं. मला का महत्त्व नाहीं ? माझ्यांतील अहं हा का कःपदार्थ ? "

मीं त्याला म्हटलें, " तुला जें मी मी म्हणून वाटतें, आणि तुझ्या मीहून अलग असें जें दुसरें विश्व तुला वाटतें, त्याच्याशीं तुझ्या मीचा संबंध आहे. आणि ह्या दोघांना व्यापून पुन्हा तिसरें तत्त्व असतें. त्या तिसऱ्या तत्त्वाचा तुझ्या मीशीं किंवा मीहून अलग विश्वाशीं सारखाच संबंध असला पाहिजे. "

मी तीच गोष्ट पुन्हा येथें सांगत आहें. आपल्या व्यक्तिगत जीवनाला विश्वात्मक जीवनाची तहान असते. डोळे स्वतःलाच पाहतील तर त्यांना अर्थ नाहीं. शरीर स्वतःलाच खाईल तर तें जगेल कसें ?

जोरदार प्रतिभाशक्ति सत्याला मिठी मारणारी असते. त्याप्रमाणें सामर्थ्य-संपन्न व्यक्ति विश्वात्मकतेकडे जात असते. व्यक्तीचा मोठेपणा व्यक्तीमध्यें काय आहे यावर आहे. भांड्याचें महत्त्व त्याच्या आकारावर नसून त्यांतील पदार्थांवर आहे. सरोवराची खोली केवळ खळग्यावरून आजमावयाची नसून त्यांतील पाण्याच्या खोलीवरून अजमावयाची असतें.

जर आपण सत्यासाठीं तहानलेले असूं, स्वतःच्या वासना नि स्वतःचा बडेजाव यांत तुम्हांला सुख नसेल, तर तुम्हांला विश्वाच्या इच्छेशीं मिसळून वागावें लागेल. चालणारें मूल पडलें तर त्याला लागणारच. त्यासाठीं पृथ्वी मृदु नाहीं होणार. पृथ्वीच्या टणकपणामुळें मुलाला लागलें तर त्याच टणक-पणामुळें त्याला उभेंहि राहणें शक्य झालें. एकदां माझी नांव नदीच्या पुला-खालून जात असतां डोलकाठी पुलांत अडकली. डोलकाठी दोन इंच एकदम कमी झाली असती, किंवा पूल दोन इंच वर जाता, किंवा नदी दोन इंच दबती, तर माझें सारें नीट जमलें असतें. परंतु ती डोलकाठी, तो पूल, ती नदी यांनीं माझ्या 'अहं'चा विचारच केला नाहीं. परंतु नदी, डोलकाठी, पूल यांचा त्यांच्या अभंग स्वरूपामुळेंच आपण उपयोग करूं शकतों. मोठा पूर आला तर त्या पुलावरून मी निर्धास्तपणें जातों. वस्तु या अशा आहेत. त्यांच्याजवळ आपणांस वागायचें आहे. त्यांचें ज्ञान करून घ्यावें. आपली इच्छा म्हणजे विश्वाचा कायदा नव्हे. वस्तूचें ज्ञान आनंददायक असतें. कारण त्या त्या वस्तूचें स्वरूप कळल्यामुळेंच आपण त्यांच्याशीं संबंध जोडतों, त्या आपण आपल्याशा करून घेतों व आपण स्वतःला मोठे करतों.

या जगांत पदोपदीं दुसऱ्याचा विचार करावा लागतो. मेल्यावरच आपण एकटे असतों. कवि असतो, तो आपली कल्पना सर्वांना आनंद देणारी करतो. सर्वांना डोलवील अशी भाषा योजतो. भाषेचे नियम तो जाणतो. त्या नियमांचें पालन करूनच तो मोठा होतो.

मनुष्याचें व्यक्तित्व म्हणजे अंतिम सत्य नव्हे. मनुष्यामध्यें असें कांहीं आहे जें विश्वात्मक आहे. जेथें फक्त तुमचाच विचार तुम्हांला करावा लागेल असें जग तुम्हांला दिलें, तर तें तुम्हांला आवडणार नाहीं. तुरुंगांतील तो एकांतवास वाटेल. सजीव-निर्जीव सृष्टीशीं आत्मिक संबंध जोडण्यांत मानवाचा विशुद्ध आनंद आहे. सर्वांना सामान्य, सर्वांना व्यापणारें असें जर तत्त्व नसेल तर हें अशक्य आहे. हें सर्वव्यापी तत्त्व ओळखणें हें आपलें परम कर्तव्य. तें ओळखून नि अनुभवून आपण मोठे होतों. आपल्या वैयक्तिक वासना विश्वात्मक सत्यतेच्या विरुद्ध आहेत तोंवर दुःख आहे.

एक काळ असा होता कीं, मानव प्राणी देवाजवळ विशेष सवलती मागे. सृष्टीचे नियम आपल्या सुखाच्या आड येऊं नयेत, अशी आपण इच्छा करीत असूं. परंतु कायदा झुगारून चालणार नाहीं, हें ज्ञान आज आपणांस झालें आहे. या ज्ञानानें आपण अधिकच बलवान झालों आहोंत. कारण हा कायदा निराळा नाहीं. तो आपलाच आहे. विश्वव्यापी कायद्यामध्यें जी शक्ति आहे, तीच आपल्यामध्येंहि आहे. एकच शक्ति अन्तर्बाह्य भरून आहे. आपण संकुचित असूं तर ही शक्ति आपणांस भिवविते. आपण मोठ्या दृष्टीनें वागूं तर ही विश्वशक्ति आपणांस मदतच करते. सृष्टीच्या नियमांचें अधिकाधिक ज्ञान होईल तसतशी आपली शक्ति वाढतच जाईल. आपणांस जणूं विश्वात्मक शरीर मिळतें. विजेची शक्ति, बाष्पशक्ति, म्हणजे जणूं आपलेच हातपाय, आपलेच कानडोळे. शरीरांतील सर्व अवयवांशीं संबंध असल्यामुळें हें सारें शरीर जसें आपणांस आपलें वाटतें, त्याप्रमाणें विश्वाचें स्वरूप समजूं लागल्यावर सारें विश्व आपलें वाटेल. आजच्या शास्त्रीय युगांत जगाशीं एकरूप होण्याचा हक्क प्राप्त व्हावा म्हणून धडपडूं या. खरोखर आपल्या शक्तीस सीमा नाहीं. कारण विश्वव्यापी कायद्याची विश्वात्मक शक्ति ती आपलीच आहे. रोग व मृत्यु यांच्यावर आपण सत्ता मिळवीत

चाललों आहोंत. शास्त्रीय ज्ञानाच्या साह्यानें बाह्य रीत्या तरी सृष्टीशीं आपण संबंध जोडीत आहोंत, मोठे होत आहोंत. जसजशी प्रगति होईल, तसतसें दुःख-दैन्य कमी होईल, असा विश्वास वाटत आहे. व्यक्तिगत जीवन व बाहेरचें विराट् जीवन यांचा मेळ घालतां आला म्हणजे सारें ठीक जमतें.

आपल्या आध्यात्मिक जीवनांत असेंच आहे. विश्वात्मक पुरुषाच्या जीवनाशीं, त्या सत्तेशीं जेव्हां आपण जमवून घेत नाहीं, बंड करतों, तेव्हां नैतिक दृष्ट्या आपण अधःपतित होतों. अशा परिस्थितींत मिळविलेले विजयहि शेवटीं पराजयच ठरतात. आपल्या वासना पूर्ण होण्यानेंच आपण अधिक दरिद्री होतों. आपणांस विशेष सवलती मिळाव्यात, आपला फायदा व्हावा, असें वाटतें. परंतु जें सर्वांसाठीं नाहीं, त्याचा जें सर्वांसाठीं आहे त्याच्याशीं सदैव झगडा राहणार. सत् आणि असत्, दैवी आणि आसुरी वृत्तींचा मेळ कसा मिळणार ? स्वार्थी मनुष्य तटबंदी करून राहतो. मग युद्धें, यादवी ! असें वागून पुन्हा आपणच कुरकुर करतों कीं, या जगांत सुख नाहीं ! बाबा रे, तुझ्या सुखाच्या आड सृष्टि येत नसून तूंच येत आहेस. तो विश्वात्मक भाव जवळ कर म्हणजे सुखाला तोटा नाहीं. मग आनंदें सागर हेलावतील. परंतु क्षुद्र व्यक्तित्वाला हें पटत नाहीं. स्वार्थामुळें ह्या जगांत गुंतागुंती नि झगडे. स्वार्थामुळें समाज विस्कळित होतो. सर्व दुःखांच्या मुळाशीं हा स्वार्थ आहे. शेवटीं समाजांत व्यवस्था राहावी म्हणून शासनसंस्था उभ्या राहतात. त्या हुकूमशाही पद्धतीनें सर्वांना दडपून शान्तीचा देखावा उभा करतात. स्वार्थामुळें या अशा शासनसंस्था ठेवणें भाग पडतें. पदोपदीं हा मानव्याचा अपमान आहे.

खरें सामर्थ्य मिळविण्यासाठीं विश्वव्यापी कायदे पाळले पाहिजेत. ते आपलेच आहेत, हेंहि ओळखलें पाहिजे. सुखी व्हायचें असेल तर व्यक्तिगत इच्छेला विश्वात्मक इच्छेशीं मिळवून घ्यावें लागेल. ती इच्छाहि आपलीच आहे. ज्या वेळेस आपणांमधील सान्त अंश अनन्ताशीं मेळ घालतो, त्या वेळेस दुःखहि सामर्थ्यदायक वाटतें, आशीर्वादरूप वाटतें. आपल्या आनंदाची खरी किंमत ओळखण्याचें तें एक माप आहे.

जीवनांत मुख्य धडा शिकायचा तो हा कीं, जीवनांत दुःख असलें तरी त्यापासून मला मांगल्य निर्मितां येईल. दुःखाला आनंदमय करण्याची शक्ति आपल्यांत आहे, हें शिकायचें आहे. दुःख सोसायला मुळींच तयार नाहीं, असा एकहि मनुष्य आढळणार नाहीं. या हक्कामुळेंच आपण मनुष्य आहोंत. एकमेकांसाठीं आपण दुःख सोसतों आणि आनंदानें. एके दिवशीं एक गरीब माता मला म्हणाली, “ कांहीं दिवस मोठा मुलगा एका श्रीमंत आप्ताकडे जाणार आहे. ” परंतु तें सांगतांना तिला दुःख होत होतें. मुलाला दूर पाठवण्यानें तिचा भार कमी नव्हता होत ? होय, होत होता. परंतु तिच्या मातृ-हृदयाला मुलाचा भार उचलण्यांतील दुःखच आनंदरूप होतें. तें दुःख भोगण्याचा तिला हक्क होता. मुलावरील परमप्रेमानें तो तिला प्राप्त झाला होता. दगदग न पडणें म्हणजे मोक्ष नव्हे. दुःखालाच आनंदरूप करण्यांत मुक्ति आहे. असें केव्हां करतां येईल ? व्यक्तिगत जीवन म्हणजेच सर्वस्व नव्हे, असें पक्कें ओळखूं तेव्हां. आपल्यामध्यें वास करणारा विश्वात्मा .आपत्तीला, मरणाला जुमानीत नाहीं. दुःख म्हणजे आनंदाची दुसरी बाजू, असें जणुं तो मानतो. तो विश्वात्मा आपणांत आहे, या गोष्टीचा अनुभव आला म्हणजे सारीं दुःखें शिवस्वरूप वाटतील. विपत्ति हीच अपूर्ण आणि मर्त्य मानवाची खरी संपत्ति. पूर्णाबरोबर आसन मांडून बसायला अपूर्णाला जर कोणीं लायक बनवलें असेल तर दुःखानें. या जीवनांत जें जें मोलवान आहे तें मिळवायला खण-खणीत किंमत द्यावी लागेल. शक्ति, ज्ञान, प्रेम कांहींहि मिळवायचें असो-त्यासाठीं श्रम, कष्ट यांची किंमत मोजायला हवी. दुःखांतूनच आनंद फुलतो, परिपूर्णता हंसत वर येते. ज्या मनुष्याला दुःखाचा तिटकारा, त्याचा उद्धार नाहीं. तपाशिवाय तेज नाहीं. आगींत घालून घेतल्याशिवाय कळा नाहीं. स्वार्थासाठीं दुःख भोगणें तें दुष्ट असतें. तें मग पुढें सूड घेतें. त्या माणसाला खोल दरींत तें लोटतें. परंतु परिपूर्णतेचा ध्यास लागून जें दुःख आपण भोगतों तें तारक असतें. तें दुःख अनन्ताच्या आसनासमोर तुम्हांला नेतें. दुःख-देवतेच्या तोंडावर मग काळा बुरखा तुम्हांला दिसणार नाहीं, तर तेथें परमानंद फुललेला दिसेल.

* * *

# व्यक्तीचा प्रश्न

जीवनाच्या एका टोकाला मी चराचराशीं, अणूरेणूशीं जोडलेला आहें. आणि त्यामुळें मला विश्वव्यापी कायद्याची सत्ता मानावी लागते. माझ्या अस्तित्वाचा खोल असा पाया तेथेंच घातला जातो. विश्वानें आपल्या विराट् मिठींत मला धरून ठेवलें आहे. सर्व वस्तूंशीं सहकार्य करण्यांत माझी पूर्णता आहे. त्यांतच माझें सामर्थ्य आहे.

जीवनाच्या दुसऱ्या टोकाला सर्वांहून अलग, पृथक् असाहि मी आहें. तेथें मी एकाकी एकटा असा उभा आहें. सर्वांपासून स्वतंत्र, अपूर्व, निस्तुल असा मी तेथें असतों. माझ्यासारखा मीच. या विश्वाचें सारें वजन माझ्यावर घातलेंत तरी मी चिरडला जाणार नाहीं. मी तो मीच राहणार. माझें व्यक्तित्व मी उचलून धरीन.

माझें हें व्यक्तित्व लहान असलें तरी तें महान् आहे. आपण इतरांपेक्षां विशिष्ट गुणधर्मांनें संपन्न आहोंत, याचा या व्यक्तित्वाला अभिमान वाटत आहे. आपलें विशिष्ट व्यक्तित्व नष्ट झालें तर आपण दिवाळखोर ठरूं. जीवनाला मग अर्थ काय ? जरी हें जीवन मग बाह्यतः जसेंच्या तसें दिसलें तरी निर्मितीचा आनंद तेथें कोठून असणार ? आपलें व्यक्तित्व नष्ट झाल्यानें आपण निःसत्त्व होऊंच, परंतु जगाचेंहि त्यामुळें नुकसान आहे. जग एका मोलवान् वस्तूला त्यामुळें गमावून बसतें. आपल्या या विशिष्ट व्यक्तित्वा-मुळेंच आपण या विश्वाला अधिक यथार्थपणें आपलेंसें करून घेतों. आमच्या विशिष्टत्वाला आपण पारखे होऊन पडून राहूं, तर विश्वाला तरी आपण ओढून कसें घेऊं ? जें विश्वात्मक आहे तें विशिष्टाच्या द्वारांच परमोच्च विकास करून घेत असतें. आपणांला आपलें व्यक्तित्व हिरावलें जाऊं नये असें वाटत असतें, याचें तरी कारण काय ? आपणांमधून प्रकट होणाऱ्या त्या

विश्वात्म्याचीच ती इच्छा असते. आपणांमध्यें जो अनन्ताचा आनंद आहे, त्यामुळेंच आपणांस आपला आनंद मिळत असतो.

आपल्या या वैशिष्ट्यासाठीं मनुष्य मरायला तयार होतो. तो आपत्तींना तोंड देईल, चुका करील, धडपडेल. आपलें व्यक्तित्व व्यक्तीला अत्यंत प्रिय असतें. या चराचराहून आपण निराळे आहोंत, विशिष्ट गुणधर्मांनें संपन्न आहोंत, हें तरी व्यक्तीला कसें कळतें? ज्ञानाचें फळ चाखल्यानेंच ही जाणीव होत असते. आपल्या विशिष्टपणाच्या अहंकारानेंच मानवानें जगांत घोर कृत्यें केलीं आहेत; पाप, अनाचार माजवले आहेत. तरीहि हें विशिष्टत्व टाकावें, असें त्याला वाटत नाहीं. आपलें विशिष्टत्व गमावून सृष्टीच्या पोटांत खुशाल घोरत पडण्यापेक्षां हीं पापेंहि त्याला प्रिय वाटतात.

आपलें स्वतंत्र व्यक्तित्व अबाधित राहावें, यासाठीं मनुष्य अपार किंमत देतो. आणि ज्या मानानें कष्ट सोसूं, मोल देऊं, त्या मानानें व्यक्तित्वालाहि तेज चढत असतें. व्यक्तित्वाची किंमत अजमावयाला तुम्हीं किती कष्ट, संकटें सोसलींत, हें ज्याप्रमाणें बघायचें, त्याचप्रमाणें तुम्हीं मिळवलें काय इतकें करून, तेंहि बघायला हवें. स्वतःचें व्यक्तित्व म्हणजे कष्ट व त्याग एवढेंच असेल, लाभ कांहींच नसेल, तर आपणांस आपल्या व्यक्तित्वाचें महत्त्व वाटणार नाहीं. त्यागानें कांहीं मिळत नसेल तर आत्मनाश हेंच मानव-जातीचें परम ध्येय ठरायचें!

आपत्ति नि कष्ट भोगून कांहीं परिपूर्णता प्राप्त होणार असेल तरच व्यक्तित्वाला अर्थ. ज्यांनीं अनंत आपत्ति सोसून स्वतःच्या व्यक्तित्वाचा विकास करून घेतला, त्यांनीं ही गोष्ट स्पष्ट करून दाखविली आहे. व्यक्तित्व मरूं नये, त्याचा विकास व्हावा, म्हणून त्यांनीं जबाबदाऱ्या आनंदानें शिरावर घेतल्या व एक ब्रहि न काढतां हाल सोसले, अपार त्याग केले!

एकदां मला एकानें सभेमध्यें प्रश्न विचारला, "हिंदुस्थानांत आत्मनाश, स्वतःला शून्य करणें, हेंच नाहीं का ध्येय सांगितलेलें?"

एक गोष्ट आपण विसरतां कामा नये कीं, मनुष्य जेव्हां एखादा विचार प्रकट करतो, तेव्हां त्यानें उच्चारलेले केवळ शब्दच पाहून चालत नाहीं. सामान्य

वस्तूंच्या बाबतींत केवळ शब्दार्थ पाहून भागेल, परंतु महनीय कल्पना केवळ बाह्य शब्द पाहून समजणार नाहींत. उच्चारलेले शब्द म्हणजे मनांतील विचारांच्या खुणा. विचारांचें संपूर्ण स्वरूप या तोंडी खुणांनीं प्रकट करतां येत नाहीं. शब्द उच्चारणाऱ्या व्यक्तीच्या जीवनावरून त्यांचा अर्थ बघावा लागतो. कोश घेऊन शब्दांचा अर्थ बघूं पाहाल तर अर्थाच्या अंगणांत पोंचाल; अर्थाच्या गाभाऱ्यांत, अंतरंगांत प्रवेश हवा असेल तर ते शब्द उच्चारणाऱ्या व्यक्तीच्या जीवनांत शिरा. ऋषिमुनींच्या शब्दांची नेहमीं ओढाताण चालते. याचें कारण हेंच कीं, आपण केवळ शब्द बघतों. शब्दवेल्हाळ लोक शब्द-पांडित्यांतच गुंगतात. तें जाळें बघत राहतात; जाळ्यानें कांहीं पकडायचें आहे, मिळवायचें आहे, हें विसरतात. आपण शब्दांतील कल्पना जीवनांत अनुभवून बघायला तयार नसतों.

बुद्धधर्म किंवा हिंदुस्थानांतील इतर धर्म यांनींच स्वार्थत्यागाचें, स्वत्व विसरण्याचें तत्त्व सांगितलें असें नाहीं, तर ख्रिस्तधर्मांतहि ही गोष्ट उत्कटतेनें उपदेशिलेली दिसेल. मरणानेंच या अनित्य जीवनांतून सुटका, असें ख्रिस्त म्हणतो. मरणानें जीवन मिळेल, क्रॉसनें मोक्ष मिळेल, असें ख्रिस्ती धर्म नाहीं का सांगत ? ख्रिस्तांचा क्रॉस, बुद्धांचें निर्वाण—दोन्हींचा अर्थ एकच. एकाच अर्थाच्या या खुणा, हीं प्रतीकें.

अविद्येपासून सुटका म्हणजे मोक्ष, हें भारतीय संस्कृतीचें सार आहे. जें सत्य आहे त्याचा नाश करून मोक्ष नाहीं मिळत. कारण जें सत्यार्थानें आहे तें नाहींसें करतांच येणार नाहीं. सत्यदर्शनाला जें जें विरोधी तें दूर केल्यानें मोक्ष मिळतो. डोळ्यांची पापणी उघडणें म्हणजे डोळ्यांचा नाश नव्हे.

आपलें व्यक्तित्व तेवढेंच खरें, असें मानणें ही मोठी चूक होत असते. 'आपणांपुरतें आपण' असें मग आपण मानतों. स्वार्थ हेंच मग जीवित-कार्य होऊन बसतें. रस्त्यांतील धुळीलाच उराशीं धरून बसणारा ज्याप्रमाणें कधींच मुक्कामावर पोंचूं शकणार नाहीं, तसें आपलें होतें. आपल्या आत्म्याचा स्वभाव पुढें जाण्याचा, उत्तरोत्तर विशाल होत जाण्याचा असतो. केवळ स्वतःलाच धरून बसूं तर जें महान् वस्त्र आपणांस विणावयाचें आहे,

तें विणतां येणार नाहीं. आत्मसूत्र आणि विश्वसूत्र यांमिळून वस्त्र होईल. आपल्याच सुखोपभोगांची काळजीपूर्वक योजना करणें म्हणजे चूल पेटवणें होय. परंतु भाकरी भाजायला पीठ त्यामुळें मिळणार नाहीं.

जी भाषा आपणांस समजत नाहीं, तिच्यांतील अक्षरें मानगुटीस बसतात. तीं थांबतात, अडवतात, परंतु बोलत नाहींत. शब्दांच्या जंजाळांतून सुटायचें असेल तर अविद्येपासून, अज्ञानापासून झडझडून दूर झालें पाहिजे. मग शब्दांतील भावार्थ सांपडेल. ज्या वेळेस पूर्ण ज्ञान होतें, त्या वेळेस प्रत्येक शब्द योग्य ठिकाणींच आहे असें कळून येतें. मग ते शब्द जखडून न ठेवतां पुढें नेतात; विचाराचें, सत्याचें दर्शन घडवतात; मुक्त करतात.

अविद्येमुळें, अज्ञानामुळें 'आपण आपल्यापुरते' असें आपणांस वाटतें. वास्तविक स्वतःच्या मर्यादा ओलांडून आपणांस पुढें जायचें असतें. म्हणून ऋषि येऊन सांगत : "अविद्येपासून मुक्त व्हा. आत्मरूप समजून घ्या, अहंकारांतच नका गुरफटून जाऊं."

ज्या वेळेस आपणांस आपलें अत्यंत सत्यमय असें स्वरूप सांपडतें, त्याच वेळेस खरी स्वतंत्रता लाभते. कलेचें ध्येय सांपडल्यावरच कलावानास कलाक्षेत्रांतील स्वातंत्र्य लाभतें. मग तो उगीच अनुकरण करीत बसणार नाहीं, लोकांना काय आवडतें याची पर्वा करणार नाहीं. धर्माचें काम व्यक्तीच्या स्वधर्माचें विकसन हें आहे, तो विशिष्ट धर्म मारणें हें नाहीं.

धर्म शब्दाचा अर्थ फार खोल आहे. धर्म म्हणजे वस्तूचें वा व्यक्तीचें अत्यंत अंतरंगांतील स्वरूप. आपल्यामधून जो हेतु प्रकट व्हावयाचा आहे तो हेतु म्हणजे आपला धर्म. ज्या वेळेस अन्याय्य गोष्ट घडते, त्या वेळेस आपण म्हणतों, अधर्म झाला. म्हणजेच आपलें जें खरें स्वरूप तद्विरुद्ध कांहींतरी घडलें, असें आपणांस वाटतें.

हा धर्म म्हणजेच आपणांतील सत्य. हा धर्म अप्रकट असतो. तो प्रकट करायचा असतो. बीजांतून वृक्ष वर येणें हा त्या बीजाचा धर्म. अनंकुरित स्थितींत, कवचांत पडून राहणें हा बीजाचा धर्म नव्हे. बीज फोडलें तर तेथें वृक्ष दिसणार नाहीं. त्याचें स्वरूप, त्याचा स्वधर्म तेथें दिसणार नाहीं. परंतु

अडथळ्यांशीं झगडत जेव्हां तें अंकुरूं लागतें, वाढतें, तेव्हां त्याचें खरें स्वरूप प्रकट झालें, असें आपण म्हणतों. मानवजातीच्या इतिहासांत, आपणांत काय आहे तें कांहींनीं दाखवलें आहे. महात्म्यांच्या जीवनांतून महान् सत्य प्रकट झालेलें आपण पाहिलें आहे. त्यावरूनच आपण निश्चयपूर्वक म्हणूं शकतों कीं, जीं जीवनें आपणांस भिकार वाटतात तीं तशींच राहणार नाहींत. त्यांचींहि कवचें गळून पडतील व आंतील सुंदरता प्रकट होईल. हें निष्फळ दिसणारें जीवनहि फुलेल फळेल, गगनाला भिडेल.

बीजाचा मोक्ष स्वतःचें विकसित स्वरूप मिळविण्यांत आहे. बीजरूपानें राहणें म्हणजे कोंडवाड्यांत पडणें. कवच फोडून बीज वाढतें. तें कवच फोडणें म्हणजे का मरण? ज्या त्यागानें परिपूर्णता प्राप्त होते, विकास लाभतो, त्या त्यागाला मरण, निर्वाण, शून्य, असें म्हणतां येणार नाहीं. बंधनें फेकून तें मोक्ष मिळवणें होय.

परमोच्च मोक्षाचा अर्थ समजला कीं, स्वतःच्या स्वधर्माचा, स्वतःच्या जीवनहेतूचाहि बोध होतो. आरंभीं सर्वांवर आपली सत्ता असणें, सारे सुखभोग मिळणें म्हणजे आपला मोक्ष, असें आपणांस वाटतें. परंतु खरें स्वातंत्र्य तें हें नव्हे, असें इतिहास सांगत आहे. ज्यांनीं मोक्षधर्म प्रकट केला, त्यांनीं त्यागाचा मार्ग घेतला. त्यागानेंच मोक्ष-वैभव, असें त्यांनीं सांगितलें. हुतात्मे, महात्मे यांचीं महान् जीवनें हाच अर्थ सांगत आहेत. मनुष्यांत जो महान् अंश आहे तो विश्वाला मिठी मारूं पाहतो. त्यासाठीं तो सर्वस्वाचा त्याग करतो. सर्वस्वाचा होम करून सर्वस्व मिळवतो.

आपल्याला आपलीं दोन रूपें दिसत असतात : एक स्वतःचा बडेजाव मिरवणारें, स्वतःपुरतें पाहणारें स्वरूप, आणि दुसरें स्वतःपलीकडे जाऊन फुलाप्रमाणें फुलत फुलत स्वतांतील महान् अर्थ प्रकट करणारें स्वरूप. पहिलें स्वरूप स्वार्थावर, संचयावर उभें राहतें, तर दुसरें त्यागावर उभें असतें. दिवा जर तेल खर्च करणार नाहीं, तर दिवा सर्व पदार्थांपासून दूर राहील. दिवा जेव्हां पेटेल, तेव्हांच त्याच्या जीवनांतील अर्थ प्रकट होईल. तो आसमंतांतल्या वस्तुमात्राशीं जोडला जाईल. आपली ज्योत पाजळत राहावी म्हणून तो तेलाचा सांठा दिवा संपवून टाकतो.

या दिव्याप्रमाणें आपलें स्वरूप आहे. संचय करूं, स्वार्थी बनूं, तर स्वतः-मधील उदात्तता, सुंदरता प्रकट होणार नाहीं. आपण अंधारांत राहूं. आपल्या जीवनाच्या खऱ्या हेतूविरुद्ध वागूं. परंतु प्रकाश सांपडतांच तो उंच धरून पुढें जाऊं. सेवेनें तो प्रकाश वाढवूं. बुद्धांच्या निर्वाणाचा हा अर्थ. तेल खर्च कर, असें त्यांनीं दिव्याला सांगितलें. बुद्धांनीं सांगितलेला त्याग हेतुशून्य कसा असेल ? उद्देशहीन त्याग तामस आहे. दिव्यानें प्रकाशासाठीं तेल खर्चायचें. स्वतःमधील सुप्त हेतु प्रकट व्हावा म्हणून तेलाला तिलांजलि, तेलाचें हवन. यालाच मोक्ष म्हणतात.

बुद्धांचें निर्वाण प्रेमानें मिळवायचें असतें. निर्वाण म्हणजे प्रेमाचा परमोत्कर्ष. केवळ निरपेक्ष प्रेम. प्रेम हें प्रेमासाठींच करायचें असतें. बाकी इतर गोष्टींत आपण " कां ? " असा प्रश्न विचारूं शकतों. परंतु मी प्रेम करतों असें जेव्हां आपण म्हणतों, तेथें " कां ? " याला जागा नाहीं.

स्वार्थी मनुष्यालाहि त्याग करावा लागतो. परंतु तो सक्तीनें करतो. फळ पिकलेलें नसतें तेव्हां झाडाला दुखवून तें तोडावें लागतें. परंतु पिकलेलें फळ झाड आपण होऊन देतें. मनुष्य प्रेम करतो तेव्हां देणें हा त्याचा आनंद असतो. स्वार्थानें केलेला त्याग बोजारूप वाटतो. प्रेमानें केलेला त्याग मोक्षरूप वाटतो. स्वार्थी माणसाला सर्व वस्तु चिकटून बसलेल्या असतात. त्या काढून देणें जणूं कातडी काढावी असें त्याला वाटतें. परंतु प्रेमाची अशी कांहीं शक्ति असते कीं, साऱ्या वस्तु जणूं सुटतात. मग त्यांचा त्याग करणें जड नाहीं वाटत. उलट तसें करण्यांतच कृतार्थता असें वाटतें.

प्रेमांतच मोक्ष. प्रेमास्तव सोसलेलें दुःखहि आनंदरूप असतें. प्रेमास्तव आपण जें कर्म करतों तें बोजारूप न वाटतां मोक्ष वाटतें. गीतेमधील कर्मयोगाचा हाच अर्थ.

गीता सांगते, ' कर्म करा. कर्मानेंच तुमचा स्वधर्म प्रकट होतो. ' परंतु जोंपर्यंत कर्म मोकळेपणानें होणार नाहीं, तोंपर्यंत तुमचा खरा धर्म, तुमचें खरें रूप प्रकट नाहीं होणार. भीतीनें वा सक्तीनें केलेलें कर्म तुमचें रूप कसें प्रकटील ? आईचें स्वरूप मुलाची सेवा करण्यांत. कर्मापासून दूर राहण्यांत मोक्ष नाहीं. कर्मानेंच मुक्ति, परंतु तें कर्म प्रेमानें केलेलें असेल तर.

तो विश्वंभरहि सृष्टीच्या कामांत प्रकट होत असतो. उपनिषद् सांगतें कीं, ज्ञान, बल व क्रिया हें ईश्वराचें स्वाभाविक स्वरूप आहे– "स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च।" ईश्वरावर हें कोणीं लादलें नसून तें सारें करण्यांत त्याचा आनंद आहे. त्या अनंत कर्मद्वारां तो स्वतःला अनुभवतो. अन्यत्रहि उपनिषदांत ही गोष्ट सांगितलेली आहे.

"आनन्दात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते। आनन्देन जातानि जीवन्ति, आनन्दं प्रयन्ति, अभिसंविशन्ति।"–ही सारी सृष्टि आनंदांतून जन्मली आनंदानें पाळली जाते, आनंदाकडे तिची गति आहे, आनंदांत ती शिरत आहे. ईश्वरानें त्याला गरज होती म्हणून नाहीं सृष्टि निर्मिली. तर त्याच्या आनंदांतून, प्रेमांतून हें विश्व जन्मलें. या सृष्टींत त्यानें स्वतःला ओतलें, प्रकटिलें.

एखाद्या कल्पनेनें वेडा झालेला चित्रकार ती कल्पना व्यक्त करतो. आणि तें चित्र दूर धरून बघतो. तें चित्र दूर धरूनच त्याच्याशीं तो अधिक एकरूप होतो. आपण आपल्यापासून आनंदानें दूर होतों, नाना रूपें स्वतःला देतों. परंतु त्यामुळें आपण आपले अधिकच होत असतों. पिता मुलामध्यें स्वतःचें रूप पाहतो. परंतु पुत्ररूपानें तें अलग होणें तिरस्कारजन्य नसून तें प्रेममय असतें. प्रेमामध्यें वियोग वरपांगी असतो. तेंहि ऐक्याचेंच रूप.

ईश्वरापासून, इतर सकल चराचरापासून अलग राहणें हा जीवनहेतु नसून एक होणें हा आहे. निराळें राहणें म्हणजे माया. कारण ती गोष्ट खरी नाहीं. निराळें असणें जर सत्यरूप असेल, तर तें किती भयंकर होईल! आपण मग सर्वांपासून दूर होत होत अशा थराला पोंचतों कीं, तेथें घेरीच येईल. आपण मग सर्वांना कःपदार्थ समजून वाटेल तसे वागतों. साऱ्या जगाला लुटायला तयार होतों. स्वतःला क्षणभर नटवण्यासाठीं या विश्व-मयूराचीं सारीं पिसें उपटून घ्यायला आपण मागेंपुढें पाहत नाहीं. परंतु हें आपलें खरें स्वरूप नाहीं. हें धुकें आहे, सूर्यप्रकाश नाहीं.

अडाणी मनुष्य चेकनें पैसे मिळालेले बघतो. त्याला वाटतें कीं, कागदाचे चिटोरे जमवले म्हणजे पैसे मिळतील. तो कागदाच्या राशी जमवतो, लपवतो, मांडतो. परंतु पैसे मिळत नाहींत. तो कंटाळून त्या कपट्यांना काडी लावतो. बँकनोट वटल्याशिवाय किंमत नाहीं. नोट नुसती अलग ठेवाल तर

काय किंमत ? ती पै किमतीची आहे. ती वटवून आणावी लागते. तुम्हीहि नुसते अलग नका पडून राहूं. विश्वात्म्यापासून अलग राहाल तर पै किमतीचे ठराल. परंतु मीच सत्य ही अविद्या दूर केलीत तर तो आत्मदेव अनन्त ठेवा घेऊन भेटीला येईल. तो परमात्मा आनंदानें अनन्त रूपांनीं स्वतःला देत असतो. "आनन्दरूपं अमृतं यत् विभाति।"–ईश्वरापासून निराळ्या असलेल्या आकारांना किंमत त्याच्या आनंदानें दिलेली आहे. हे आकार जेव्हां त्या आनंदरूपांत पुन्हा मिळवाल, बँकेंत नोट वटवाल, तेव्हांच या वस्तूंची, या आकारांची खरी किंमत कळेल. सर्व वस्तु ईश्वरी आनंदांत, त्या दिव्य प्रेमांत ओता नि मग त्यांची किंमत द्या.

जेव्हां गरजेसाठीं आपण कांहीं करतों तेव्हांचें तें करणें तात्पुरतें असतें. ती व्यवस्था गरज संपतांच मागें पडते, धुळीला मिळते. परंतु कोणतेंहि काम जेव्हां आपण प्रेमानें करतों, तेव्हां त्या कामाला एक प्रकारची अमरता येते. मनुष्यांतील अमरता त्याच्या कार्यासहि अमरता देते.

ईश्वराच्या आनंदापासून आपण जन्मलों असल्यामुळें आपण अमर आहोंत. कारण त्याचा आनंद अमर आहे. आपल्यांतील अमृतत्वामुळेंच आपण मरण आलें तरी पर्वा करीत नाहीं. जन्म आणि मृत्यु दोहोंचा आपल्या ठायीं सुसंवाद आहे. मानवी जीवन हें बाह्य दृष्टया समर्याद दिसलें तरी हेतु-दृष्टया तें अमर्याद आहे. अनंताच्या साक्षात्कारासाठीं मृत्यूच्या दारांतून आपण गेलें पाहिजे. जीवनाचें द्विविध रूप आहे : एक दिखाऊ रूप व दुसरें यथार्थ रूप. मृत्यु हें दिखाऊ रूप. मृत्यूला सत्यता नाहीं. जीवनाबरोबर छाये-प्रमाणें तें असतें. जन्ममृत्यूच्या अनंत स्थित्यंतरांतून आपण स्वतःचा विकास करून घेत जात असतों. जेव्हां आपण स्वतःची वाढ करूं इच्छीत नाहीं, पदोपदीं मरावें, वाढावें, असें इच्छीत नाहीं, मरण टाळूं पाहतों, तेव्हांच खरोखर आपण मरतों ! परंतु आत्मविकासार्थ येणारें मरण मरणच नव्हे. ऋषि म्हणतो, "मरा, मरणाला कवटाळा." मरण म्हणजे आत्मनाश नव्हे. प्रभात येणार म्हणून हें दीप मालवणें आहे. दिवा विझला, पण सूर्य आला.

आपल्याला आपल्या इच्छेमध्यें मेळ घालायला शिकलें पाहिजे. आपल्या सुखोपभोगांच्या इच्छांबाबत आपण जागरूक असतों. खावें, प्यावें, मौज

करावी, असें आपणांस वाटतें. परंतु या इच्छा विशिष्ट इंद्रियांच्या असतात. जिभेला आवडतें तें पोटाला आवडेल असें नाहीं. जिव्हालौल्य जिभेचाच विचार करील, पोटाचा नाहीं करणार. आपणांमध्यें दुसऱ्या अशा कांहीं इच्छा असतात, ज्या विशिष्ट इंद्रियांच्या नसून सर्व शरीरार्थ असतात. उदाहरणार्थ आरोग्याची इच्छा. ही इच्छा सदैव कार्य करीतच असते; दुरुस्ती करीतच असते. आरोग्याची इच्छा क्षणिक वासनेचा विचार न करतां दूर-वरचा विचार करते. ती शरीरांतील सर्व अवयवांचा विचार करते; मागचा-पुढचा विचार करते. शहाणा मनुष्य आरोग्याच्या इच्छेला महत्त्व देऊन इतर शारीरिक इच्छांचा या व्यापक इच्छेशीं मेळ घालतो.

जसें हें आपलें शरीर, तसें आपणांस दुसरें एक शरीर आहे. हें म्हणजे सामाजिक शरीर. समाज-शरीराचे आपण अवयव आहोंत. शरीरगत इच्छांत ज्याप्रमाणें झगडे असतात व आपणांस मेळ घालावा लागतो, त्याप्रमाणें समाजशरीरांतहि झगडे उत्पन्न होतात. शरीरांत ज्याप्रमाणें सर्व शरीराचें हित पाहणारीहि इच्छा असते, त्याप्रमाणेंच आपल्यांत सामाजिक तत्त्व असतें. तें सर्व समाजाच्या कल्याणाची इच्छा करतें. ही इच्छा आपणांस अनंताकडे नेत असते. विचारी मनुष्य स्वतःच्या इच्छा व समाजाच्या कल्याणाची इच्छा यांत विरोध उत्पन्न होऊं देत नाहीं, आणि आपल्या महान् स्वरूपाचा अनुभव घेतो. जेव्हां आपण स्वतःपुरतें पाहतों तेव्हां इतरांपेक्षां पुढें जावें, कीर्ति मिळावी म्हणून आपण वाटेल तें करायला मागें-पुढें पाहत नाहीं. परंतु आपल्यांतील अनंतत्वाची जाणीव जेव्हां आपणांस होते, तेव्हां आपण स्वतःचें सुख नि सत्ता न बघतां सर्वांच्या कल्याणाशीं मेळ घालून पूर्णतेकडे पावलें टाकतों. शरीराचा मोक्ष आरोग्यसंपन्न होण्यांत आहे. आपल्या सामाजिक जीवनाचा मोक्ष सामाजिक मंगल निर्माण करण्यांत आहे, प्रेमरूप होण्यांत आहे. स्वार्थ मालवून प्रेम मिळवणें यालाच बुद्ध निर्वाण म्हणतात. निर्वाणानें आपण शून्याकडे नाहीं जात, तर दिव्य प्रकाशाकडे जातों. यालाच 'बोधि' म्हणजे खरी जागृति असें म्हणतात. आपल्यांतील आनंद प्रेमरूपानें प्रकट करणें म्हणजे बोधि, म्हणजे निर्वाण, म्हणजे मोक्ष. आपल्यांतील पृथक् व्यक्तित्वाला सर्वांशीं मिळून असणाऱ्या आत्मतत्त्वाकडे यायचें आहे. परंतु सक्तीनें सृष्टीशीं एकरूप होतां येणार

नाहीं. तुम्हीं आधीं अलग राहून पहाल, मग पस्तावून प्रेमरूप व्हाल. स्वच्छाचारानें, स्वार्थीपणानें परमोच्च ध्येयापासून तुम्हांस तुटल्यासारखें वाटेल. आपलें जीवन हेतुशून्य वाटूं लागेल. आपल्या इच्छास्वातंत्र्याला विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वतंत्रता आहे. आपल्या इच्छेला कायमचें अनिर्बंध राहतां येणार नाहीं. कारण पाप हें सान्त आहे. त्याला आज ना उद्यां शेवट येईलच. बंडखोरपण चिरंजीव असूं शकत नाहीं. आपणांस इच्छा-स्वातंत्र्य यासाठीं दिलेलें आहे कीं, इकडे तिकडे भटकून शेवटीं प्रेम व सद्भाव यांचा तिनें रस्ता धरावा. प्रेम व सत् हीं चिरंजीव तत्त्वें आहेत. जें अनन्त नि अविनाशी आहे, त्यांतच आपणांस पूर्ण स्वातंत्र्याचा साक्षात्कार करून घेतां येईल. जेथें भ्रम आहे, संकुचितता आहे, तेथें कोठलें स्वातंत्र्य ? आत्महत्या करून जगतां येत नसतें. स्वतःला बांधून अनंत स्वातंत्र्य कसें मिळणार ? क्षुद्रतेशीं स्वतःला जखडून घेणें म्हणजे स्वातंत्र्याचा खून होय.

निरंकुश अनिर्बंध इच्छा म्हणजे खोटें स्वातंत्र्य. प्रेम ही खरी स्वतंत्रता. सत्याला झुगारून आपण स्वार्थामुळें स्वेच्छेची पूजा करूं लागतों, तेव्हां स्वतःवर आपत्ति ओढून घेतों. सर्वत्र हीं दोन रूपें आहेत : मायिक आणि सत्यमय. शब्द हे मायिक, क्षणिक; आंतील अर्थरूपानें ते सत्य नि अमर असतात. आपण स्वतःपुरतें पाहतों तेव्हां आपण मायिक असतों. जेव्हां चराचराशीं एकरूप होऊन वागतों तेव्हां सत्यमय असतों. ख्रिस्त जेव्हां म्हणतो, " अब्राहाम होता त्याच्यापूर्वींहि मी होतों, " त्यांतील हाच अर्थ. " मी आहें " यामधून तो " दिक्कालातीत मी " बोलत असतो. वैयक्तिक मीला अनन्त मीचें स्वरूप समजल्यावरच तो मुक्त होतो.

आपणच ईश्वरापासून मायेमुळें निराळे दिसतों असें नाहीं, तर ही सृष्टिहि ईश्वरापासून निराळी, असें भासतें. यालाहि आपले ऋषि मायाच म्हणत. कारण मुळांत असा अलगपणा नाहीं. सृष्टि ईश्वराच्या अनंततेला कशी मर्यादा घालणार ? ईश्वरानेंच स्वतःच्या इच्छेला आनंदानें बंधनें घालून घेतलीं आहेत. बुद्धिबळें खेळणारा वाटेल तशीं बुद्धिबळें हलवूं शकत नाहीं. आपण होऊन खेळासाठीं तीं बंधनें घातलेलीं असतात. तसें न करूं तर साराच खेळ खलास होईल. ईश्वर जर पदोपदीं सर्वशक्तिमान् म्हणून पुढें येईल तर सारी

सृष्टि समाप्त होईल. शक्तीलाहि स्वतःची शक्ति राहावी म्हणून मर्यादा घालून घ्यावी लागते. पाण्यानें पाणीच राहिलें पाहिजे. पृथ्वीनें पृथ्वी-ईश्वरानेंच असें केलें आहे. खेळणाऱ्यापासून खेळ निराळा असला म्हणजे आनंद असतो.

कायद्याच्या बंधनांनीं सृष्टि जशी ईश्वरापासून अलग केलेली आहे, त्याप्रमाणें आपणहि स्वतःच्या अहंच्या मर्यादांनीं ईश्वरापासून दूर झालों आहोंत. ईश्वरानें स्वेच्छेनें स्वतःच्या इच्छेस मर्यादा घालून तुम्हां–आम्हांस कांहीं स्वातंत्र्य दिलें आहे. पिता मुलाला कांहीं कर्मस्वातंत्र्य देतो व त्यांत ढवळाढवळ करीत नाहीं. तसेंच तो जगज्जनक करतो. दोन स्वतंत्र इच्छा प्रेमानें एकत्र येऊं शकतील. जी इच्छा प्रेमामुळें अलग आहे, तिला दुसऱ्या स्वतंत्र इच्छेशीं समरस झाल्याशिवाय कुठला आनंद ? स्वार्थी माणसाला दुसऱ्याची स्वतंत्रता आवडत नसते. कारण स्वार्थ स्वतःच मुळीं स्वतंत्र नसतो. स्वार्थ, सत्ता परतंत्र असतात. सुलतान एका अर्थानें आपल्या गुलामावर अवलंबून असतो आणि म्हणून तर त्यांना ताब्यांत ठेवायची खबरदारी घेतो. प्रेमाचा परमविकास दोन स्वतंत्र इच्छा परस्परांत मिळण्यांत आहे. ईश्वरानें प्रेमानेंच तुम्हां-आम्हांला स्वतःपासून निराळें केलें आहे. या प्रेमानेंच पुन्हां आपण एकत्र मिळूं. आपण कायमचे अलग राहूं शकणार नाहीं. आपण मरतों, पुन्हां त्या अनन्त जीवनाशीं एकरूप होतों, पुन्हां अलग होतों, पुन्हां एकरूप होतों. क्षणाक्षणाला हा द्विविध अनुभव हवा. अनंततेचा स्पर्श हवा. अलगपणाचाहि. अशा रीतीनेंच जीवनांत ताजेपणा राहतो.

जीवनमरणाचा हा खेळ सर्वत्र दिसून येतो. जुन्याचें सदैव नवीन होत असतें. येणारा दिवस जुनाच असतो, परंतु नवीन वाटतो. अक्षय अनंततेचा ठेवा सोन्याच्या परडींत घेऊन तो येतो. ते अनंततेचे कण सर्वत्र विखरून साऱ्या सृष्टीला तो सतेज, ताजी करतो. सृष्टीच्या अंतरंगीं अनन्त तारुण्य आहे. मृत्यु व विनाश तात्पुरत्या छाया. सत्यच सदैव ताजें चमकत राहील.

अनंततेंतून येणारा प्रत्येक दिवस अमरतेचा संदेश घेऊन येतो. तो दिवस सांगतो, " मरण रोज मरत असते. मरण चिरकालीन नाहीं. प्रक्षुब्ध लाटांनीं

घाबरूं नका. खालीं अथांग शांत सागर आहे. रात्रीचा पडदा दूर होईल. सत्याचा निष्कलंक प्रकाश सदैव ताजा टवटवीत मिळत राहील. ''

जो सर्वांच्यापूर्वीं होता तो तसाच आजहि आहे. सृष्टीच्या संगीतांतील प्रत्येक तान त्याच्या ध्वनीमुळें ताजी वाटते. तोच गात आहे. प्रत्येक क्षणा-क्षणाला स्वामीच्या हृदयांतून गीतताना बाहेर येत आहेत. ज्याप्रमाणें एखादा विचार सर्व काव्याला व्यापून असतो, त्याप्रमाणें त्या प्रभूचें संगीत सर्व विश्वाला व्यापून आहे. त्याचे कधीं खंड नाहीं पडत. म्हणून सर्वत्र विविधता आहे. अपार रूपें, अपार ताना. नित्य नवीन. कोठून येतात कळत नाहीं. परंतु येतात ही गोष्ट खरी. आणि जसें सृष्टीच्या आरंभीं तसेंच आज. जें सुरू झालें आहे तें संपणार नाहीं. हें विश्व सदैव जुनें आहे, सदैव नवें आहे.

प्रत्येक क्षणाला आपण नवजन्म घेतला पाहिजे. आपणांस वृद्ध करणारीं सारीं बंधनें आपण तोडलीं पाहिजेत. जीवन म्हणजे अमर यौवन. जीवनाला वार्धक्याचा तिटकारा आहे. वार्धक्य जीवनाचें नाहींच मुळीं, तें छायामय आहे.

नदी दुथडी आपटते, परंतु त्या तीरांनीं तिची गति कुंठित न होतां ती जोरानें पुढें जाते. प्रत्येक क्षणीं मोठी होत ती समुद्राला जाऊन मिळते. कविता छंदाच्या बंधनांनीं बद्ध न होतां पुढेंच जात असते. एका बाजूनें आपल्या व्यक्तित्वाच्या भिंती आपणांस मर्यादा घालतात, तर दुसऱ्या बाजूनें त्या अनंताकडे नेतात. ज्या वेळेस हीं बंधनेंच आपण केवळ सत्य म्हणून मानतों तेव्हां घोटाळतों; दुःख, निराशा पदरीं बांधतों.

जेव्हां आपण स्वतःचा सवता सुभा करूं इच्छितों, पूर्णाला झुगारून आपल्या लहानशा जीवनालाच पूर्ण मानून स्वार्थी बनतों, तेव्हां जगांत अशान्ति, बंडें, कत्तली दिसतात. परंतु अहंकारी व्यक्ति स्वतःसाठीं म्हणून जगाचा प्रवाह अडवायला जरी उभी राहिली तरी अखेर हा प्रवाहच तिला वाहवील. राजा कितीहि बलवान् असला तरी अनंत शक्ति प्रसवणाऱ्या ऐक्याविरुद्ध त्याला बंड करतां येणार नाहीं. जर तो मूर्खपणानें सर्वांच्या एकजुटीविरुद्ध वागेल तर जमीनदोस्त होईल. म्हणून म्हटलें आहे—

" अधर्मेणैधते तावत् ततो भद्राणि पश्यति ।
ततः सपत्नान् जयति, समूलस्तु विनश्यति ॥ ".

" अधर्मानें भरभराट होते, हवें तें मिळतें, शत्रूंवर विजय मिळतो, परंतु अखेर सर्वनाश होतो." जर आपणांस आपलें व्यक्तित्व महान् करायचें असेल, तर विश्वात्मतेंत व्यक्तिमत्त्वाचीं मुळें खोल जायला हवींत.

विश्वात्म्याशीं एक होणें हेंच जीवाचें ध्येय. प्रेमानें व नम्रतेनें शिर नमवून जेथें मोठें आणि छोटें मिळतें तेथें आपण आपलें स्थान घेतलें पाहिजे. त्यागानें मिळवायचें आहे. लवून उभें राहायचें आहे. मूल आईकडे न जाईल तर त्याचे खेळ त्याला भयप्रद वाटतील. जर आपण आपलें व्यक्तित्व प्रेमानें त्याला अर्पण न करूं तर या व्यक्तित्वाचा अभिमान म्हणजे शापरूप होईल. सदैव सुंदर व सदैव नवीन असें जें अनंत तत्त्व तें आपणांमधून प्रकट होण्यांतच आपल्या जीवनाची पूर्णता, यांतच आपल्या जीवनाला अर्थ.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १०८४८
शाखा

# प्रेमरूपानें साक्षात्कार

सान्त आणि अनन्त, मर्यादित आणि अमर्यादित, आत्मा आणि परमात्मा यांच्या एकत्र राहण्याचा जो सनातन प्रश्न त्याचा आतां आपण विचार करूं. जीवनाच्या मुळाशीं असणारा हा फार भव्य व उदात्त असा विरोधाभास आहे. मर्त्य आणि अमर्त्य एकत्र कसे राहणार? तर्कशास्त्रांत हा प्रश्न उत्पन्न होतो. प्रत्यक्ष व्यवहारांत या दोन वस्तु एकत्र यायला अडचण वाटत नाहीं, परंतु तर्कदृष्ट्या पाहिलें तर दोन वस्तूंमधील अन्तर कितीहि थोडें असलें तरी तें अनन्त आहे! कारण त्या अंतराचे अनंत विभाग पाडतां येतात. परंतु आपण पदोपदीं सान्तापलीकडे जात असतों आणि अनन्ताला भेटत असतों. म्हणून आपल्यांतील कांहीं तत्त्वज्ञानी म्हणतात कीं, समर्याद वस्तु नाहींच मुळीं. समर्यादता जी दिसते तो भास आहे. ती माया आहे. परंतु माया शब्द वापरल्यानें अर्थ स्पष्ट झाला असें नाहीं. सत्याबरोबर सत्याशीं विरोधी असें एक दृश्य असतें. त्याला आपण आभास म्हटलें, माया म्हटलें. प्रश्न हा आहे कीं, एकाच वेळीं या दोन गोष्टी एकत्र कशा राहतात? बुद्धीला हें कोडें उलगडत नाहीं.

सृष्टीमध्यें विरोधी वस्तूंच्या अनंत जोड्या आहेत. सृष्टि द्वंद्वात्मक आहे. धनविद्युत्-ऋणविद्युत्, उत्तरध्रुव-दक्षिणध्रुव, आकर्षण-अपकर्षण अशा विरोधी वस्तूंच्या सर्वत्र जोड्या. परंतु या विरोधी पक्षांनीं या जगांत तडजोड केल्यामुळें तर जग चालतें. जगांतील या विरोधी शक्ति ईश्वराच्या डाव्या-उजव्या हातांप्रमाणें आहेत, आणि विरोधी असूनहि ऐक्यानें काम करीत आहेत. आपलेच डोळे बघा. एक डावा, एक उजवा; परंतु त्यांच्यामध्यें कांहींतरी प्रेमबंध आहे. दोन्ही डोळे ऐक्यवृत्तीनें बघतात. सृष्टींतील द्वंद्वांत प्रकाश नि अंधार, उष्णता नि थंडी, गति नि स्थिति इत्यादींत अखंड संबंध

आहे. वाद्यांतील अगदीं खालच्या व अगदीं वरच्या सुरांत जसा मेळ असतो तसेंच हें. सृष्टींत यामुळें घोटाळा न माजतां सुसंवाद दिसतो. सृष्टि म्हणजे जर सारी अव्यवस्थाच असती, कोणत्याहि प्रकारची नियमितता, हेतुमयता येथें नसती, तर परस्परविरोधी तत्त्वांनीं एकमेकांहून वरचढ होण्यासाठीं सारखी धडपड चालवली असती. परंतु सृष्टि लहरी कायद्यानें चाललेली नाहीं. सृष्टींतील शक्ति बेलगाम नाहींत. प्रत्येक शक्तीला शेवटीं वक्ररेषेनें मागें येऊन समतोल राहावें लागतें. लाटा एकमेकांवर आदळत येतात. जणू त्यांच्यांत भयंकर स्पर्धा आहे असें वाटतें. परंतु एका विवक्षित अंतरापर्यंतच त्या लाटा वर चढतात. पुन्हां एकसाथ नाचत समुद्रांत विलीन होतात. त्या उसळणाऱ्या लाटांचा सागराच्या चिरगंभीर शान्तीशीं शाश्वत संबंध आहे.

खरें पाहूं तर हे तरंग, हे कंप, हे आरोह-अवरोह म्हणजे वेडेवाकडे आळेपिळे देणें नव्हे. सृष्टींतील हा महान् नाच आहे. हें युद्ध नाहीं. जेथें संघर्ष असेल तेथें संगीत कोठलें ? मूलभूत तत्त्वविरोध न राहतां ऐक्य असेल तरच संगीत शक्य आहे. गूढाहून गूढ असें हें ऐक्यतत्त्व आहे. जगांतील द्वंद्वें बघून आपण साशंक होतों. परंतु अद्वैतानें आपण समाधान करूं पाहतों. या द्वंद्वांत विरोध नसून खऱ्या अर्थानें नीट संबंधच आहे, असें जेव्हां दिसतें तेव्हांच सत्य सांपडलें, असें आपणांस वाटतें. आणि सर्वांना चकित करणाऱ्या विरोधाभासाचें खरें स्वरूप आपण सांगतों कीं, "एकच सत्-तत्त्व अनेक रूपांनीं नटतें. अनेक रूपांनीं त्याचें दिसणें सत्याला विरोधी असूनहि सत्याशीं तें कायमचें जोडलेलें आहे."

निसर्गाच्या विविधतेंत व्यापक कायदा कोणी बघतात. परंतु आपल्या आनंदाच्या मुळाशीं असलेली गूढ भावना अशानें दृष्टीआड होते. गुरुत्वाकर्षण म्हणजे फळ खालीं पडणें, उत्क्रान्ति म्हणजे एका जीवकोटींतून दुसरींत जाणें, संशोधन म्हणजे का एखादा नियम शोधून काढणें ? एवढ्यानें आपणांस समाधान नाहीं. बुद्धि म्हणजे आपलें सर्वस्व नाहीं. बुद्धि म्हणजे सर्व जीवन नव्हे. बुद्धि आपल्यांत असणाऱ्या अनंततेच्या भावनेला मारून टाकते.

आपण भाषा शिकतों. भाषेचे नियम शिकतों. परंतु येथेंच थांबूं तर खरा आनंद मिळेल का? भाषा कशी बनली तें पाहण्यांत दंग होऊं तर खरें ध्येय मिळालें असें होणार नाहीं. कारण व्याकरण म्हणजे वाङ्मय नव्हे. छंदः-शास्त्र म्हणजे साहित्य नव्हे. केवळ नियम बघूं तर आनंद कोठला? प्रथम आपणांस अनंत वस्तु चिरडतात. मग त्या अनंत वस्तूंतील कार्यकारण-भावाचे नियम आपण शोधतों. ते नियम मग डोक्यावर बसतात. साहित्यांत व्याकरणाचे नियम असतात. तरीहि तेथें आनंद असतो. काव्याचें सौंदर्य नियमबद्ध असलें तरी तें त्यांच्या पलीकडे जातें. नियम हे काव्याचे पंख आहेत. काव्याचा आत्मा खालीं न खेचतां त्यांनीं तो स्वातंत्र्याच्या आकाशांत न्यायला हवा. काव्याचें रूप नियमबद्ध आहे. त्याचा आत्मा सौंदर्यमय आहे. स्वातंत्र्याची पहिली पायरी म्हणजे नियमपालन. नियमांच्या चौरंगावर सौंदर्यदेवता बसलेली आहे. सौंदर्य म्हणजे मुक्ति. सौंदर्यांत सान्त व अनन्त एकत्र येतात, एकरूप होतात. बंध व मोक्ष यांचा रमणीय समन्वय सौंदर्यांत असतो.

हें जग म्हणजे महाकाव्य आहे. या काव्याचे छंद कोणते, येथील पात्रें कोणतीं, संकोच-विकास येथें कसकसा आहे, हें सारें पाहणें मनाचें काम आहे. परंतु येथेंच थांबून चालणार नाहीं. एक रेल्वे स्टेशन आलें, म्हणजे कांहीं घर आलें असें नाहीं. हें सारें जगत् आनंदमय आहे, अशी ज्याला पूर्ण अनुभूति आली, त्यालाच अंतिम सत्य लाभलें.

मानवी हृदय व निसर्ग यांचा संबंध किती गूढ असला पाहिजे, यांचा विचार राहून राहून माझ्या मनांत येतो. निसर्गाचें बाह्यरूप एक आणि आपल्या अंतरंगांत त्याचें निराळेंच रूप असतें. उदाहरणार्थ, एक फूल घ्या. फूल कितीहि सुंदर असो, त्याला एक मोठें कार्य करायचें असतें. त्याचे रंग नि गंध त्या कामासाठीं. त्याचा आकारहि त्या कामाला अनुरूप असतो. त्या फुलाला फळास जन्म द्यायचा असतो. वृक्षजीवनाची परंपरा भंगली तर सृष्टि उजाड होईल. फुलाचा गंध नि रंग यांच्या मूळाशीं महान् उद्देश आहे. मधमाशी येते, त्या फुलावर बीजोत्पादक परागकण फेकते. फुलाचें फळ होऊं लागतें. फळ होऊं लागतांच त्या फुलाच्या सुंदर पाकळ्या गळूं लागतात. सृष्टींतील काटकसरीचा कठोर कायदा त्या फुलास लागू होतो. गंध-रंग सारें

संपतें. त्या फुलाला छानछोकी करायला अवसर नाहीं. तें कामांत व्यग्र आहे. सृष्टींतील प्रत्येक वस्तु अशा रीतीनें कर्ममग्न दिसेल. कळीचें फूल, फुलाचें फळ, फळांतून बीज, त्यांतून पुन्हां नवा अंकुर आणि पुन्हां वृक्ष—अशी ही सृष्टि अखंड चालली आहे. या कामांत अडथळा करणारी वस्तु दूर फेकली जाईल. निसर्गाच्या प्रचंड कचेरींत बहुविध कामें सुरू असतात. येथें नाना खातीं. तें रंगीत नखरेबाज दिसणारें फूल कर्महीन नाहीं. उन्हातान्हांत श्रमणारें ते मजूर आहेत. त्या फुलाला आपल्या कामाचा हिशेब द्यायचा आहे. त्याला मजा मारायला वेळ नाहीं.

परंतु हें फूल मानवी हृदयांत शिरतें, तेव्हां त्याचें स्वरूप बदलतें. तें फूल विश्रान्ति आणि आनंद यांचें निधान वाटतें. जी वस्तु बाहेर अनंत श्रमांची मूर्ति असते, ती वस्तु हृदयांत सौंदर्य नि शान्ति यांची मूर्ति बनते !

शास्त्र येऊन म्हणेल कीं, फुलाचें बाहेरचें स्वरूप तेंच खरें. तुमच्या मनोमय कल्पना फोल आहेत. परंतु आपलें हृदय ग्वाही देतें कीं, मनाची कल्पनाहि बरोबर आहे. निसर्गाच्या बाह्य जगांत उपयुक्त काम करण्याची मला खूप शक्ति आहे, असें फूल प्रशस्तिपत्र दाखवील. परंतु आपल्या हृदयाच्या दाराजवळ तें सौंदर्य घेऊन येतें. बाह्य जगांत राबणारें तें फूल माझ्या हृदयांत मुक्त व स्वतंत्र आहे. फुलांचें कोणतें स्वरूप खरें ? फुलाचें वृक्षपरंपरा राखण्याचें, फळ म्हणून होण्याचें बाहेरचें स्वरूप खरें आहेच. परंतु ही बहिः-सत्यता झाली. परंतु आंतहि एक सत्य आहे व तें म्हणतें, " आनंदात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते । "—हें सारें चराचर आनंदांतून जन्मतें.

फुलाला बाह्य सृष्टींत एक काम करायचें आहे, मानवाच्या मनःसृष्टींतहि एक करायचें आहे. हें मनःसृष्टींतील कोणतें काम ? निसर्गांत त्याचें काम सेवकाचें आहे. परंतु मनुष्याच्या हृदयांत राजाचा दूत म्हणून तें येतें. सीता अशोकवनांत रडत असते. रामचंद्राची मुद्रिका घेऊन हनुमान् दूत बनून येतो. ती खूण बघतांच दूतानें काय बातमी आणली असेल तें सीता ओळखते. आपला प्रियकर आपणांस विसरला नाहीं, तो आपणांस लवकरच मुक्त करील, असें सीतेला ती अंगठी सांगते.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नोंः दिः ....................

हें फूलहि प्रियकराकडून संदेश घेऊन येतें. सीता सोन्याच्या लंकेंत असूनहि वनवासी होती. आपलीहि तीच स्थिति असते. श्रीमंतींत लोळत असूनहि आपण दरिद्री असतों. जगांतील वैभव आपल्या हृदयास जिंकूं बघतें. रावण वैभवानें सीतेला वश करूं बघतो. परंतु तें फूल येतें, परतीराहून खूण येते. तें फूल कानांत म्हणतें: " मीं त्याचा संदेश आणला आहे. त्यानेंच मला पाठविलें. त्या प्रेममयाचा, आनंदमयाचा मी दूत. तूं इकडे अनाथाप्रमाणें पडलीस. त्यानें आतां सेतु बांधला आहे. तो तुला विसरला नाहीं. तो तुला मुक्त करील, हृदयाशीं धरील. हा मोह तुला कायमचें गुलाम नाहीं करूं शकणार. "

तुम्ही फुलाला जर विचाराल कीं, तूं त्याचा दूत कशावरून ? तर तें म्हणेल. " हे पाहा त्याचे रंग, हे त्याचे गंध. ही त्यानें प्रेमभेट पाठविली आहे. " ती प्रेमाची भेट आपल्या हृदयांत अपार उत्कंठा उत्पन्न करते. ज्या सोन्याच्या लंकेंत आपण आहोंत, त्याच्याशीं आपणांस कांहींएक करायचें नाहीं. आपला मोक्ष या सोन्याच्या मोहांतून पलीकडे जाण्यांत आहे. त्यांतच जीवनाची कृतार्थता, परिपूर्णता.

सृष्टीच्या बाह्य व्यवहारांत ते रंग नि गंध मधाचा अचूक मार्ग दाखवायला मधमाशीस उपयोगी पडतात. परंतु आपल्या हृदयांत तें फूल केवळ आनंद घेऊन येते. तें फूल म्हणजे परमेश्वराचें जीवात्म्याला नानारंगी शाईंत लिहिलेलें प्रेमपत्र होय !

म्हणून मी म्हणत असतों कीं, आपण किती जरी व्यवहारमग्न असलों, तरी अंतःकरणांत असें एक गुप्तमंदिर आहे कीं, जेथें आपला आत्मा जातो-येतो. तेथें कारखान्याची भट्टी नसते. तेथें प्रेममंदिर असतें. सृष्टींतील कार्य-कारणभावाची जड शृंखला तेथें नसते. ती जड शृंखला येथें वीणा बनते. प्रेमाचें संगीत ऐकवते.

सृष्टींत एकाच वेळीं दास्य नि मोक्ष यांचें स्वरूप असावें, याचें आश्चर्य वाटतें. सहेतुकता व अहेतुकता एकाच वेळीं ! निसर्ग बाह्यतः कार्यमग्न दिसतो तर त्याचें अंतरंग अपार शान्तीनें भरलेलें असतें. काम करणारी सृष्टीच

हंसत खेळत जाणारी दिसते. सृष्टीकडे बहिर्दृष्टीनें बघाल तर तिथें बंधनें दिसतील. अंतर्दृष्टीनें बघाल तर ती सौंदर्याची खाण वाटेल.

ऋषि म्हणतो : " आनंदात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते, आनंदेन जीवन्ति, आनंदं प्रयन्ति, आनंद अभिसंविशन्ति । " म्हणजे सर्व प्राणिमात्र आनंदांतून जन्मले, आनंदावर पोसले गेले. ते आनंदाकडे जात आहेत. आनंदांत शिरत आहेत. " असें म्हणणारा आनंदोपासक ऋषि नियमांची उपेक्षा करतो असें नाहीं. अमूर्त विचारांत रमून तो असें म्हणतो असें नाहीं. सृष्टीचे अभंग कायदे तो जाणतो, त्यांचें महत्त्व ओळखतो. तो म्हणतो : " त्याच्या भीतीनें अग्नि जाळतो, वायु वाहतो, सूर्य प्रकाशतो. त्याच्या भीतीनें मेघ वर्षतो, मृत्यु आपलें काम करतो. " सृष्टीचे नियम वज्रप्राय आहेत. सृष्टीच्या राज्यांत दयामाया नाहीं. कायदेभंग कराल तर थप्पड खाल. तरीहि हा कवि म्हणतो, " प्राणी आनंदांतून जन्मले, आनंदावर पोसले गेले, आनंदांत नांदतात, आनंदाकडे जातात, आनंदांत शिरतात. तो अमर परमात्मा आनंदरूपानें स्वतःला प्रकट करतो—" आनंदरूपं अमृतं यद् विभाति । " या अपार आनंदाचें आकारांत प्रकट होण्याचें जें स्वरूप त्यालाच नियम म्हणतात. आनंदाला कांहीं तरी रूपानें प्रकट व्हावें असें वाटतें. गवयाचा आनंद गानानें, कवीचा काव्यानें प्रकट होतो. मनुष्य हा निर्माता आहे. हृदयांतील अपार आनंदामुळें हे नाना आकार तो निर्मितो.

या आनंदाचेंच दुसरें नांव म्हणजे प्रेम. आनंदाच्या प्रकटीकरणांस द्वैत हवें. ज्या वेळेस गवयाला स्फूर्ति येते, त्या वेळेस त्याचे जणू दोन भाग होतात. अंतःकरणांत त्याचें एक रूप ऐकत असते. बाहेरचा श्रोतृवृंद हें त्यांचेंच विस्तृत असें दुसरें स्वरूप. प्रियकर आपल्या प्रिय वस्तूंत आपलेंच दुसरें रूप बघतो. आनंदानेंच वियोग आणि विरोध, द्वैत दूर करून परस्पर ऐक्य अनुभवून आनंद भोगायचा.

अमृतस्वरूपी परमात्म्याचें दुसरें एक रूप जीवात्म्याच्या रूपानें निर्मिलें. जीवात्मा आणि परमात्मा अलग अन् निराळे असले तरी हा निराळेपणा, हा वेगळेपणा कायमचा नाहीं. तो कायमचा असता तर जगांतील दुःखाला व

दुष्टपणाला सीमाच राहिली नसती. मग असत्याकडून सत्याकडे कधींहि आपण जातों ना. हृदयाची पावनता कधींहि लाभती ना. जगांतील विरोध, भेद सारे तसेच राहिले असते. विविधतेंतील एकतेचा धडा दिसला नसता. नसती भाषा, नसतें ज्ञान, नसतें सहकार्य, नसतें हृदयाला हृदय मिळणें. परंतु जगांत याच्या उलट दिसत आहे. जगांतील वेगळेपणा वज्रलेप नाहीं. वस्तु बदलत आहेत. एकमेकांत मिसळत आहेत. शास्त्रच अध्यात्मविद्या होऊन जात आहे. दिवसेंदिवस वस्तुजात आपल्या मर्यादा ओलांडीत आहे. जीवनाची व्याख्या अधिक स्पष्ट होत आहे.

परमात्म्यापासून आपण निराळे झालों. परंतु परम प्रेमामुळेंच आपण निराळे झालों. एकमेकांस पाहण्याचें सुख मिळावें म्हणून अलग झालों. जगांतील दुःखें, असत्यें, क्लेश, कष्ट यांना आपण जिंकून घेतों. एवढेंच नव्हे तर त्यांना निराळेंच रूप देऊन त्यांतून सौंदर्य व सामर्थ्य प्रकट करतों.

मानवी जीव प्रवास करीत आहे. नियमांतून प्रेमाकडे, बंधनांतून मोक्षाकडे, नैतिक दशेंतून दैवी पारमार्थिक दशेकडे तो जात आहे. बुद्धदेवांनीं नैतिक जीवनाचा, व्रती, संयमी जीवनाचा उपदेश केला. परंतु हें जीवन म्हणजे ध्येय नव्हे. कायदे पाळून, बंधनें पाळून त्यांच्या पलीकडे जातां येतें. या मार्गानेंच सुखाच्या माहेराला, त्या परम आनंदाला आपण जाऊन मिळतों. बंधनांच्या मर्यादित रूपांतहि तें ब्रह्मच प्रकट होत असते. भगवान बुद्ध या गोष्टीला 'ब्रह्मविहार' म्हणत. ब्रह्माबरोबर खेळण्याची परम दशा ज्याला प्राप्त करून घ्यायची आहे, त्यानें कोणाचा मत्सर करूं नये, कोणावर रागावूं नये, कोणाला मारूं नये. त्यानें सर्वांवर प्रेम करावें. त्यानें जगाची आई व्हावें. वर-खालीं, पुढेंमागें सर्वत्र त्यानें प्रेम पसरावें. त्या प्रेमाला नको सीमा, नको अडथळा. प्रेम अमर्याद असो, सदिच्छा विश्वव्यापी असो.

प्रेमाचा अभाव म्हणजे जगाविषयीं बेफिकिरी. तो दुष्टपणा होय. प्रेम म्हणजे पूर्ण जाणीव. आपण दुसऱ्याचा विचार करीत नाहीं म्हणून प्रेमहि करीत नाहीं; किंवा आपण दुसऱ्यावर प्रेम करीत नाहीं म्हणून त्याचें स्वरूप आपणांस कळत नाहीं. सर्व वस्तुमात्राचें अंतिम फलित प्रेम होय. प्रेम ही

भ्रान्त कल्पना नसून ते सत्य आहे. सृष्टीच्या मुळाशीं असलेला आनंद त्याला प्रेम म्हणतात. उपनिषद् म्हणते—

" कः प्राण्यात् यदेष आकाशे
आनंदो न स्यात् । "

" या जगांत सर्वत्र आनंद नसता तर कोण जगता, हालचाल करता ?" प्रेमामुळें आपण जगतों. आपल्या बुद्धीला, जाणिवेला प्रेममय करून जगभर प्रेम पसरूं, तरच ब्रह्मविहार शक्य होईल.

देणें, सतत देणें हा प्रेमाचा स्वभाव आहे. प्रेम सहज स्फूर्तीनें अनंत देणग्या देत असतें. या देणग्यांच्या पाठीमागचें प्रेम आपण न पाहूं तर सारें स्वारस्य जाईल. ज्याच्या हृदयांत प्रेम नाहीं तो प्रियकरानें दिलेल्या देणग्यांचा केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनेंच विचार करतो. परंतु ही उपयुक्तता ही तात्पुरती असते. जरूर असेल तेव्हां उपयोग. जरूर नसतां वस्तु समोर असेल तर ओझें वाटतें. परंतु हृदयांत प्रेम असेल तर साधी वस्तूंहि चिरंतन मोलाची वाटतें, कारण ती विशिष्ट उपयोगासाठीं नसते. प्रेम प्रेमासाठीं असतें. त्या लहानशा प्रेमचिन्हाचा आपणांस कधीं कंटाळा येत नाहीं.

ईश्वरानें प्रेमानें हें विश्व तुम्हांला दिलें आहे. त्याचा कशा रीतीनें आपण स्वीकार करतां, हा प्रश्न आहे. आपणांस प्रिय वाटणाऱ्या वस्तु आपण हृदयमंदिरांत पूजतों, त्याप्रमाणें या जगाला आपल्या हृदयांत स्थान आहे का ? या जगाच्या भांडारांतून आपण सारखें घेत आहोंत, अधिकाधिक मिळावें म्हणून झगडत आहोंत. सृष्टि भीषण स्पर्धाक्षेत्र झाली आहे ! या जगावर मालकी हक्क स्थापण्यासाठीं का आपण जन्माला आलों ? हें जग म्हणजे का बाजारांतील एक वस्तु ? जगाचा उपयोग कसा करून घ्यावयाचा इकडेच सारें लक्ष असेल, तर या जगाची खरी किंमत तुम्हीं ओळखली नाहीं, असें म्हणावें लागेल. आधाशी मूल एखाद्या थोर ग्रंथांतील पानें फाडून तोंडांत कोंबतें, त्याप्रमाणेंच सृष्टीच्या या विशाल ग्रंथाचें आपण करणार का ?

जेथें मनुष्य मनुष्याकडे भक्ष्य दृष्टीनें बघतो तेथें संस्कृति कधीं फुलणार नाहीं. कारण मानवी जीवनाची खरी किंमतच तेथें कळत नाहीं. मनुष्यानें

मनुष्याला काकडीसारखें खाणें याला आपण राक्षसीपणा म्हणत असूं. परंतु राक्षसीपणाचा हा एकच नमुना नाहीं. तितक्याच दुष्टपणाचे दुसरे शेंकडों प्रकार आज सर्वत्र राजरोस सुरू आहेत. स्वतःची संस्कृति श्रेष्ठ मानणाऱ्या देशांतहि मनुष्य मनुष्याला केवळ यंत्र मानीत आहे. मनुष्य म्हणजे जणू त्याचा देह. तो बाजारांत विकला जातो, विकत घेतला जातो! उपयुक्ततेवरून त्याची किंमत. धनिक लोक माणसाला यंत्रच समजतात. स्वतःच्या या स्वार्थासाठीं मानवाला त्यांनीं अत्यन्त हीन दशेला आणलें आहे. स्वार्थांध माणसाला मनुष्यांतील दिव्यता कशी दिसणार? स्वार्थांध होऊन आपण विवेकशक्ति गमावतों. आपली जाणीव मरते. आध्यात्मिकदृष्ट्या आपण आत्महत्या करतों. कोठली संस्कृति नि काय? मग पीनल कोडें तयार होतात. नरकासारखे तुरुंग अस्तित्वांत येतात. दुसऱ्या राष्ट्रांना पंगू करून गुलाम केलें जातें. त्यांची संघटित रीत्या लुटमार केली जाते. हृदयशून्यतेमुळें जगावर हे अनर्थ कोसळतात.

मनुष्याचा देह एक आश्चर्यकारक यंत्र आहे. मन तर आणखीच आश्चर्यकारक. परंतु मनुष्यांत दिव्यता आहे, ही सर्वांत महत्त्वाची वस्तु. परमात्म्याचा तो अंश आहे. मनुष्यांतील आध्यात्मिकता त्याच्या प्रेमावरून ओळखतां येते. अमक्या मनुष्यापासून कोणतें काम करून घेतां येईल, याच दृष्टीनें जेव्हां आपण पाहूं, त्या वेळेस त्याचें खरें ज्ञान आपणांस होणार नाहीं. मग आपण त्याच्याजवळ अन्यायानें वागतों. मजुरी कमी द्यायची, अधिक काम उकळून घ्यायचें, यांतच आपणांस आसुरी आनंद वाटूं लागतो. परंतु मनुष्यांत परमात्मा आहे. आपल्यांतील आत्मतत्त्व त्याच्यांतहि आहे असें जाणून वागूं तर सारे तुम्हांला आपले वाटतील. मग माणसांशीं कठोर होणें म्हणजे स्वतःशींच कठोर होणें वाटेल.

एकदां नौकेंतून बसून गंगेच्या प्रवाहांतून मी जात होतों. सूर्य नुकताच मावळला होता. आकाशांत कांठोकांठ निःस्तब्ध शान्ति होती. गंगेच्या त्या विशाल प्रवाहावर एकहि तरल तरंग उठत नव्हता. सायंकालीन रंगांच्या छटा प्रतिबिंबित झाल्या होत्या. दूरचें वाळवंट एखाद्या नागराजाप्रमाणें पसरलें होतें. नौका शांतपणें जात होती. इतक्यांत एक भला मोठा मासा

पाण्यांतून एकदम वर आला नि पुन्हां खालीं गेला. त्याच्या अंगावर क्षणभर ते सायंकाळचे रंग चमकले. पडदा दूर करून सायंकाळच्या मुक्या संगीताला साथ द्यायला का तो आला होता ? मला वाटलें कीं, एक मित्र आला आणि रामराम करून, अभिवादन करून गेला. हा विचार मनांत येतांच माझें हृदय भरून आलें. परंतु नावाडी म्हणाला, " केवढा मासा होता ! निसटला, गेला ! " त्याच्या डोळ्यांसमोर मासळीचें जेवण होतें. त्याला त्या माशाकडे खाण्याच्या डोळ्यांनींच फक्त पाहतां येत होतें. माशाच्या जीवनांतील अर्थ त्याला काय कळणार ? मनुष्य हा केवळ पशु नाहीं. त्याला आध्यात्मिक दृष्टि आहे. तो वर उड्डाण करूं इच्छीत असतो. ती आध्यात्मिक दृष्टि म्हणजेच संपूर्ण सत्याची दृष्टि. परंतु आपल्या भोगवासना सात जन्मींच्या वैऱ्याप्रमाणें या सत्यदृष्टीच्या, आत्मसाक्षात्काराच्या आड येतात. स्वार्थी वासनांमुळें सहानुभूतीचा विकास होत नाहीं, पाप होतें. ईश्वर व आपण यांमध्यें पापाचा पर्वत उभा राहतो. आपलें ध्येय मर्यादित करणें, संकुचित दृष्टि घेणें, म्हणजेच पाप. आपण तेवढे चांगले, बाकीचे वाईट, स्वतःच्या फायद्यासाठींच सारें बघणें, करणें म्हणजे पाप.

म्हणून मी पुन्हां सांगतों कीं, मनुष्याबद्दल प्रेम असल्याशिवाय कोठली मानवता ? तुमचें सामर्थ्य हें संस्कृतीचें माप नव्हे. मानवांच्या संस्थांनीं नि कायद्यांनीं प्रेमवृत्तीचा किती विकास केला आहे, यावरूच संस्कृति मापिली जाते. तुम्ही मनुष्याला यंत्र समजतां कीं तो दिव्यतेची मूर्ति मानतां, हाच पहिला व शेवटचा प्रश्न आहे. ज्या ज्या वेळेस माणूस कठोर झाला, हृदयशून्य झाला, त्या त्या वेळेस संस्कृति नष्ट झाल्या. जेव्हां प्रबळ लोक दुर्बळांना दास करतात, जेव्हां माणसें किंवा त्यांचे प्रबळ संघ मानवाच्या मोठेपणावर घाव घालतात, मानव्याचीं मुळेंच तोडतात, स्वातंत्र्य, प्रीति आणि न्याय यांचे खून पाडतात, त्या वेळेस साऱ्या संस्कृति धुळीस मिळतात. आसुरीपणा कराल तर संस्कृति जगणार नाहीं. मनुष्य ज्यामुळें मनुष्य आहे, असें जें कांहीं, त्याची वाढ प्रेमानें आणि न्यायानेंच होईल. जसें माणसाचें तसेंच या विश्वाचें. केवळ भोगाच्या, उपयुक्ततेच्या दृष्टीनें जगाकडे नका बघूं. विश्वाचें खरें स्वरूप अशानें कळणार नाहीं. जग तुमच्या गरजा भागवतें, जगाचा उपयोग आहे हें सारें खरें. परंतु जगाचा व आपला संबंध येथेंच संपला नाहीं. जगाशीं

आपण अधिक खोल अशा बंधनांनीं संबद्ध आहोंत. आपणांस जीवनाचें प्रेम वाटतें, याचा तरी अर्थ काय ? या विशाल जगाशीं अधिक काळ संबंध राहावा, असाच नाहीं का अर्थ ? हा संबंध प्रेमाचा आहे. अनंत तंतूंनीं जगाशीं आपण बांधलेले आहोंत. या पृथ्वीपासून ताऱ्यापर्यंत पसरलेल्या धाग्यांनीं बांधलेले आहोंत. सृष्टीपासून स्वतःला अलग करून तिच्यावर सत्ता गाजवायला जन्मलों आहे असें मनुष्य मानतों. सृष्टीहून स्वतःला श्रेष्ठ मानतो. परंतु हा हास्यास्पद प्रकार आहे. सृष्टीला तो शत्रु मानतो. परंतु जसजसें ज्ञान वाढत आहे तसतसा सृष्टीपासूनचा अलगपणा सिद्ध करणें त्याला जड जात आहे. सृष्टीपासून स्वतःला निराळें समजण्यासाठीं जे जे काल्पनिक मनोरे मनुष्य उभारतो, ते पडूं लागतात. मनुष्याच्या बुद्धीला तो अपमान वाटतो. परंतु याला उपाय काय ? आत्मसाक्षात्काराच्या आड अहंकार आणाल नि ऐक्य मारूं बघाल, तर सत्याच्या प्रचंड चाकांखालीं तुमचा अहंकार चुरडला गेल्याशिवाय राहणार नाहीं. सृष्टीपासून अलग राहून स्वतःला मोठें मानणें म्हणजे अर्थशून्य तुसडेपणा होय. आपण कोणीतरी मोठे, बाकी साऱ्या जगानें गुलामाप्रमाणें आपल्यासमोर सेवा करीत राहावें हा विचार का स्पृहणीय ? बाबा रे, सृष्टी तुझ्याहून हीन नाहीं. तुझ्यासारखीच ही सृष्टि, हें जग. एवढेंच नव्हे तर तुम्ही उभयतां एकरूप आहांत. शास्त्रीय शोधानें हें दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट होत आहे. ही जी ऐक्यजाणीव, ती केवळ बुद्धिगम्य न राहतां सर्वात्मकतेच्या रूपानें सतेज होईल, त्याच वेळेस ती आनंददायी व प्रेमरूप होईल. सृष्टीशीं एकरूप होण्यांतच अमरतेची निःशंक खूण. विभक्तपणा म्हणजे मरण. ज्या वेळेस आत्मा विश्वात्म्याशीं मिळून जातो, तेव्हां कोठलें मरण ? ज्यावेळेस जीवनांत विश्वात्म्याचें संगीत सुरू होतें तेव्हां मुक्ति आली असें समजा. मग सृष्टीचा नि परमात्म्याचा जो प्रेमाचा खेळ चाललेला असतो, त्यांत आपणहि सामील होतों, प्रेमाच्या विश्वव्यापी मेजवानींत सामील होऊन अमरतेच्या प्रसादाचे वांटेकरी होतों. जीवनांतील सारे विरोध प्रेमांत बुडून जातात. प्रेम हें एकाच वेळीं द्वैतमय व अद्वैतमय असतें. असलेंच पाहिजे. प्रेम हें चल आहे आणि स्थिरहि आहे. प्रेम मिळेपर्यंत हृदय बदलत असतें, अशान्त असतें. शेवटीं शान्त नि स्थिर होतें. प्रेमामध्यें लाभालाभ एकत्र राहतात. प्रेमाच्या जमाखर्चांत जमा व खर्च एकाच बाजूला. या सृष्टीच्या

महान् समारंभांत तो परमात्मा प्रेम मिळावें म्हणून रोज देणग्या देत आहे. देणें व घेणें अविरोधीपणानें जेथें चालतें, तेथेंच प्रेम आहे समजा.

प्रेमाच्या एका टोंकाला अहं आहे, दुसऱ्या टोकाला निरहं आहे. अहं प्रत्ययाशिवाय प्रेम करायचें कसें ? आणि पुन्हा अहं असेल तर प्रेम कसें होईल ?

प्रेमाच्या राज्यांत बंध व मोक्ष विरोधी नाहींत. प्रेम अत्यंत स्वतंत्र, तर अत्यंत बांधलेलेंहि. ईश्वर अत्यंत स्वतंत्र असता तर सृष्टि दिसती ना. त्या अनंतानें सान्ताची माया पत्करली. प्रेमरूप परमेश्वराच्या ठिकाणीं मर्यादित-अमर्यादित एकरूप आहेत.

आपणांस केवळ स्वातंत्र्याचीच इच्छा असत नाहीं, गुलामगिरीचीहि आपणांस इच्छा असतें. सर्व बंधनें स्वीकारून पुन्हां त्याच्यापलीकडे जाणें हें तर प्रेमांत परम थोर कार्य. प्रेमांत जितकी स्वतंत्रता तितकी कोठें आहे ? त्याचबरोबर प्रेमांत जितकें परावलंबन आहे, तसें अन्यत्र कोठें ? प्रेमाच्या सृष्टींत स्वातंत्र्याइतकीच गुलामगिरीहि शोभादायक नि सुखदायक असते.

भागवतधर्म घोषणा करतो कीं, ईश्वरानें स्वतःला जीवाशीं बांधून घेतलें आहे. या सान्त सृष्टीच्या तालबद्ध नाचांत तोहि सामील आहे. सृष्टींत अपार सुंदरता प्रकटवून तो जीवाच्या अंतःकरणाला वश करूं पाहतो. सृष्टींतील सौंदर्याचा दुसरा काय अर्थ ? हें सौंदर्य पदोपदीं सांगत आहे कीं, सामर्थ्याचें प्रदर्शन हा सृष्टीचा हेतु नाहीं. जेथें जेथें रंगच्छटा असेल, मधुर स्वर असेल, सुंदर आकार असेल, तेथें तेथें हृदयांतील प्रेमाला कोणीतरी हांक मारीत असतें. मानवाला तहानभूक आहे. परंतु तहानभूक भागवणें एवढेंच जीवनाचें साध्य नाहीं. तहानभूक झुगारणारे, दुःखांनीं वा गरजांनीं न दबणारे थोर पुरुष अनेक झाले आहेत. खरें जीवन जगणाऱ्याला पावलो-पावलीं तहानभूक दूर ठेवावी लागते.

या जगांतील सौंदर्याची ही गंमत कीं, तें तुमच्या स्वातंत्र्यावर गदा आणीत नाहीं. त्याची सत्ता मानली जावी म्हणून तें बोटहि वर उचलीत नाहीं. या सौंदर्याची उपेक्षा केलीत तर सज़ा नाहीं मिळणार. हें सौंदर्य हांक

मारतें, दरडावीत नाहीं. प्रेम वळजबरीनें मिळत नसतें. धाकदपटशानें मनुष्य ऐकणार नाहीं. परंतु आनंद व प्रेम यानें वळेल. सृष्टींत अपार आनंद आहे, सृष्टीला पांघरूण घालणारा हा हिरवा शालू यांत तो आनंद आहे. आकाशाच्या नील गंभीरतेंत तो आनंद आहे. वसंतऋतूंतील बहर वा हिंवाळ्यांतील प्रखर वैराग्य यांत तो आनंद आहे. आपल्या शरीरांत आनंद आहे. जीवनांत आनंद आहे. आपल्या सर्व शक्तींचा उपयोग करण्यांत आनंद आहे ज्ञानार्जनांत आनंद आहे. जगांतील असत्यता नि दुष्टता यांच्याशीं झुंजण्यांत आनंद आहे. दुर्लभ ध्येयासाठीं मरण्यांत आनंद आहे. आनंद इतका आहे कीं, जरूरीहून तो अधिक आहे. त्याची वाण तर नाहींच नाहीं.

कां हा आनंद ? कां हा आपल्यासमोर अनंत रूपांनीं येतो नि नाचतो ? कायद्याचीं जीं बंधनें आहेत, त्यांचा अर्थ प्रेमदृष्टीनें पहा, असें सांगण्यासाठीं आनंद उभा आहे. प्रेम व कायदा हे आत्मा व शरीर याप्रमाणें आहेत. सर्वत्र अद्वैत आहे. याचा साक्षात्कार म्हणजे आनंद. जीवात्म्याची सृष्टीशीं एकता आहे व सृष्टीची परमात्म्याशीं, त्या परम प्रियकराशीं एकरूपता आहे. हें अनुभवास येणें म्हणजे आनंद होय.

* * *

# कर्मरूपानें साक्षात्कार

नियमपालनानें आनंदप्राप्ति होते, हें ज्यांनीं ओळखलें तेच नियमांच्या पलीकडे जाऊं शकतात. त्यांना मग नियम उरत नाहींत, बंधनें राहत नाहींत, असा याचा अर्थ नव्हे. तर तीं बंधनेंच त्यांना मोक्षरूप वाटतात. मुक्तात्मा बंधनांना झुगारूं इच्छित नाहीं. उलट तीं त्याला सहज वाटतात; तीं त्याला उत्साहदायी, आनंददायी वाटतात.

खरें पाहूं तर जेथें बंधनें नाहींत, तेथें आत्मा स्वतंत्रच राहूं शकत नाहीं. तेथें आत्म्याची हत्या होत असते. मोहाचें आमंत्रण येऊन जीव व्रतच्युत होतो, आणि मग त्याला निराधार वाटतें. मातेच्या हातून हिसकावून घेतलेलें मूल जसें अगतिकपणें रडूं लागतें तसें जिवाचें होतें. मग तो ओरडतो व म्हणतो, " हें पाप अनिर्बंध नि भीषण आहे. मला वांचवा. मला बंधनांनीं बांधा आणि त्याचबरोबर आनंदाशींहि बांधा. "

बंधन म्हणजे आनंदाच्या विरुद्ध, हें मानणें जसें चुकीचें, त्याप्रमाणेंच कर्म म्हणजे मुक्तीच्या आड येणारी वस्तु, असें जें आपल्याकडे मानलें जातें, तेंहि चुकीचें. या लोकांना कर्म करणें म्हणजे खालच्या भूमिकेवर येणें, आत्म्याच्या स्वतंत्र वृत्तीला मर्यादा घालणें, आत्म्याचे पंख तोडणें असें वाटतें. परंतु आपण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आनंद ज्याप्रमाणें बंधनांतून निर्माण होतो त्याप्रमाणें मोक्षसुद्धां कर्मद्वारा सिद्ध होत असतो. आनंदाला आनंदांतच आंतरिक समाधान नाहीं. त्या आनंदाला बाहेरच्या बंधनांची इच्छा होते. त्याचप्रमाणें आत्म्याला केवळ आंतरिक स्वतंत्रतेंत अर्थ वाटत नाहीं; त्याला बाह्य कर्मांची अपेक्षा असते. जीवात्मा कर्म करूनच सकल कोशांपासून, आवरणांपासून मुक्त होत असतो. घडी केलेलें वस्त्र ज्याप्रमाणें मोकळें करावें,

त्याप्रमाणें हा गुंडाळलेला सुप्त आत्मा कर्मद्वारा महान् होतो; आपली विशालता, स्वतंत्रता अनुभवूं शकतो. असें नसतें तर जीवात्म्याला, काम करावें असें आपण होऊन कधींच वाटतें ना.

अधिकाधिक कर्मानें अधिकाधिक शक्ति प्रकट होते नि ती ध्येयाकडे नेते.कर्मद्वारां मानवाचें वैशिष्टय प्रकट होतें. तो स्वतःचा विकास अनुभवतो. इतरांपासून स्वतःच्या विशिष्ट गुणधर्मांनीं उमटून पडतो नि शोभतो. त्याच्या जीवनाचा गंध दरवळतो नि सुख प्राप्त होतें. स्वातंत्र्य, कोंपऱ्यांत एकलकोंडे पडून राहण्यांत नाहीं. अंधारांत एकटें पडून राहणें यासारखें भयानक बंधन दुसरें नाहीं. कळी फुलूं पहात असते. बीज अंकुरण्यासाठीं धडपडतें. त्याप्रमाणें आपल्या मनांतील विचार कार्यरूपानें प्रकट होऊं इच्छितात. सारें पापुद्रे फोडून साकार होऊं इच्छितात. आपल्या भावना प्रकट होण्यासाठीं संधि बघत असतात. आपला जीवात्मा कोंडून घेऊं इच्छीत नसतो. नवनवीन कार्यक्षेत्रें तो शोधतो. त्याच्या शक्तीला अंत ना पार. मर्त्य जीवनाला आवश्यक अशा गोष्टीच तो करूं बघतो असें नाहीं, तर इतर अनेक क्रियाकलापांत तो रंगतो. जीव हें सारें कां करतो ? त्याला मोक्ष हवा असतो. स्वतःच्या स्वरूपाचा साक्षात्कार व्हावा, अशी त्याला अदम्य इच्छा असते.

दलदली हटवून, रोगोत्पादक जंगलें तोडून मनुष्य उपवनें फुलवतो, मळे पिकवितो. कुरूपतेच्या तुरुंगांत पडलेली सुंदरता, ओंगळपणाच्या कचाट्यांत सांपडलेलें लावण्य मनुष्य मुक्त करूं बघतो. परंतु हें सौंदर्य आत्म्याचेंच होय. बाहेर तो सौंदर्य न फुलवता तर त्याच्या आत्म्यालाहि कृतार्थता न वाटती. अनिर्बंध समाजांत व्यवस्था यावी म्हणून तो कायदे करतो. पदोपदीं होणारा अविचाराचा अडथळा दूर करून जें सत् आहे त्याला वाव देतो. मनुष्य हें सारें करून स्वतःचा सद्भावच नाहीं का प्रकट करीत ? बाहेरच्या या आविष्काराशिवाय आंत मोक्षाचा आनंद कोठला ? मनुष्य स्वतःची शक्ति, स्वतःचा सद्भाव सारखा बाहेर ओतीत आहे. आणि यांत ज्या मानानें त्याला यश लाभावें, त्या मानानें आपण महान् होत आहोंत, असा त्याला अनुभव येतो.

उपनिषद् सांगतें :

“ कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः । ”

कर्म करीत शंभर वर्षे जगावें, अशी मनुष्यानें इच्छा करावी. आत्म्याचा आनंद आकंठ चाखणाऱ्या ऋषींचे हे उद्गार आहेत. आत्म्याचा पूर्ण साक्षात्कार ज्यांना घडला ते रडकीं गाणीं कधींहि गात बसले नाहींत. कर्म म्हणजे दास्य, जीवन दुःखरूपच आहे, असें त्यांनीं कधीं सांगितलें नाहीं. फळ होण्यापूर्वींच गळून पडणाऱ्या नाजूक देठाच्या फुलाप्रमाणें ते आत्मानुभवी ऋषि नव्हते. जीवनाला सर्व शक्तीनें ते चिकटून बसतात. " फळ पिकल्या-शिवाय देठ सोडणार नाहीं. " अशा प्रतिज्ञेनें ते बसतात. अनंत कर्मांच्या द्वारा प्रकट होण्यसाठीं ते उत्साहानें अविरत झिजतात. दुःखसंकटांनीं ते खचत नाहींत. अंतःकरणावर बोजे पडून ते जमीनदोस्त होत नाहींत. विजयी वीराप्रमाणें मान उंच ठेवून ते पुढें जात असतात. विश्वांत घडामोड करणारी जी विश्वशक्ति, तिच्या आनंदाला तेहि सारखे धडपड करीत साथ देतात. सुख वा दुःख त्यांतून स्वतःचेंच तेज प्रकटवून त्या तेजांत स्वतःला पाहत ते पुढें कूच करतात. परमात्म्याबरोबर जीवात्म्याचा नाच. सूर्यप्रकाशाचा आनंद, मोकळ्या हवेचा आनंद त्यांच्या जीवनांतील आनंदांत मिसळतो. अन्तर्बाह्य एकच अखंड संगीत, एकच आनंदमय सृष्टि असे अनुभवणारे ते महात्मे सांगत आहेत, " कर्में करीत शंभर वर्षे जगेन अशी प्रत्येकानें इच्छा बाळगावी. "

हा कर्मानंद मायिक नाहीं. हें हाडें चघळणें नव्हे. हा आनंद मिथ्या आहे, कर्मत्यागविना आत्मसाक्षात्काराच्या मार्गावरचे यात्रेकरू होतां येणार नाहीं, असें म्हणणें खोटें आहे. कर्मभूमीपासून दूर राहून अनंताचा साक्षात्कार करूं पाहणें वेडेपणाचें आहे. त्यानें हित-मंगल होणार नाहीं.

सक्तीमुळें मनुष्य कर्म करतो, हें म्हणणें खोटें आहे. एका अर्थी सक्ती असली तरी दुसऱ्या अर्थीं आनंद आहे. मनुष्याच्या गरजा त्याला श्रमावयास लावतात हें जरी खरें असलें तरी त्यामुळेंच तो स्वतःचा विकास करून घेत असतो, पूर्णतेकडे जात असतो, हेंहि खरें. म्हणून जसजशी संस्कृति वाढते तसतशा तो स्वतःच्या जबाबदाऱ्याहि वाढवून घेतो. स्वेच्छेनें नवनवीन कर्मक्षेत्रें निर्मितो. मानवाला सतत कर्ममग्न ठेवण्यासाठीं सृष्टीनें आधींच भरपूर तजवीज करून ठेवली आहे, असें म्हटलें तरी चालेल. क्षुधातृषांच्या

तृप्त्यर्थ मरे मरेतो काम करावें लागतेंच. परंतु एवढ्यानें तो तृप्त होत नाहीं. पशुपक्ष्यांप्रमाणें सृष्टीनें नेमून दिलेलें तेवढेंच करण्यांत त्याला समाधान नाहीं वाटत. मानवेतर सृष्टीहून आपण अधिक करावें, असें त्याला वाटतें. मनुष्या-इतकें कोणत्याच प्राण्याला राबावें लागत नाहीं. मानवानें अपार कार्यक्षेत्र स्वतःसाठीं निर्मिलें आहे. तो जुनें पाडतो, नवें उभारतो. जुने कायदे रद्द करून नवीन करतो. नानाप्रकारची सामग्री जमवितो. रात्रंदिवस विचार करतो. शोधबोध चालवतो. श्रमतो, सहन करतो. आजवर त्यानें अनेक लढाया दिल्या आहेत. नवीन नवीन मिळविलें आहे. संकटांना कवटाळलें आहे, मृत्यूला शोभविलें आहे.

परिस्थितीच्या पिंजऱ्यांतील आपण पक्षी नाहीं, हें सत्य मानवानें शोधून काढलें आहे. या जाणाऱ्या क्षणाहून मी मोठा आहें, हें त्यानें ओळखलें आहे. कांहीं न करतां उभें राहण्यांत क्षणभर बरें वाटलें तरी अनंत जीवनाचा कोंडमारा होऊन जीविताचा हेतूच दूर राहतो.

अकर्मानें ' महती विनष्टिः '—घोर नाश, असें श्रुति सांगते. मनुष्य कर्म करून अनंत आपदांना तोंड देत मोठा होतो. धडपडींतच मानवाचा मोठे-पणा आहे. जें आज आपण नाहीं तें होण्याची त्याची अविश्रांत खटपट असते. कष्ट, संकटें हें तर आपलें भूषण तो मानतो. आपल्या कार्यक्षेत्राला मानव मर्यादा घालूं इच्छीत नाहीं. कधीं कधीं त्याच्या अतिरेकामुळें भयंकर भोंवरे उत्पन्न होतात. स्वार्थ, सत्ता यांचे भोंवरे कर्मप्रवाहांत उसळतात. परंतु जोंपर्यंत प्रवाहाची शक्ति कायम आहे, ती आटून जात नाहीं, तोंवर भय नाहीं. उत्साहभरांत मानव नसतें कर्महि अंगावर घेतो. परंतु तो उत्साहानें चुकाहि निस्तरतो. खरा शत्रु तेव्हां जेव्हां मनुष्य पडून राहतो. मग अशा अडचणी येतात कीं, त्यांतून पार पडणें अशक्य होतें. म्हणून ते प्राचीन आचार्य सांगतात कीं, " काम करण्यासाठीं जग व जगण्यासाठीं काम कर. जीवन नि कार्य एकरूपच आहेत. "

स्वतःशीं एकटें राहण्यांत जीवनाची परिपूर्णता नाहीं. आंतरिक पूर्णता बाहेर प्रकट व्हायला हवी. बाह्य नि आंतर जगाची सतत देवाण-घेवाण चालू

हवी. अशानेंच आत्म्याचें वैभव वाढतें. जीवन संपन्न होतें. जगण्यासाठीं या शरीराला हवेशीं, प्रकाशाशीं संबंध ठेवावे लागतात. परंतु जीवनशक्ति मिळवण्यासाठींच नव्हे तर ती प्रकट करण्यासाठींहि या बाह्य जगाशीं संबंध ठेवणें आवश्यक असतें. हें शरीर शरीरान्तर्गत अनेक व्यापारांशीं कसें जोडलेलें आहे पाहा. हृदयाचें स्पंदन सारखें सुरू हवें. नाडीचा ठोका पडत रहायला हवा. जठर, मेंदू यांना सारखें काम आहेच. एवढ्यानेंच भागलें नाहीं. शरीर बाहेरच्या कामांतहि मग्न असतें. शरीराला केवळ शरीरान्तर्गत व्यापारांनीं समाधान नाहीं. बाहेरचे व्यापारहि त्याला हवे असतात. श्रम नि क्रीडा यांचा नाच अखंड सुरू आहे. त्यांत शरीर रंगलें आहे. आंत रक्त फिरत आहे. बाहेर पाय फिरत आहेत. हा अन्तर्बाह्य क्रियात्मक आनंद, यांत मानवाची परिपूर्णता आहे.

जसें शरीराचें तसेंच जीवाचें. जीवाला मनांतील विचार नि भावना एवढ्यानें समाधान लाभत नाहीं. बाह्य वस्तूंची त्याला सतत जरूरी भासते. आंतील जाणिवेला पोसण्यासाठींच नव्हे तर कार्याला वाहून घेण्यासाठीं, केवळ घेण्यासाठीं नव्हे तर देण्यासाठीं म्हणूनहि बाहेरच्या जगाशीं जीवाला संबंध ठेवण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

परमात्मा सत्यरूप आहे. जीवात्माहि सत्यरूप आहे. या सत्याचें स्वरूप विविध आहे. त्यांतील एकच घेऊन चालणार नाहीं. सत्याचे खंड पाडाल तर जगणें अशक्य होईल. आपण आंतर व बाह्य या दोन्ही रूपांनीं मिळून पूर्ण आहोंत. बाहेरचा अनंत परमात्मा व आंतरिक परमात्मा, दोघांमध्यें आपण नांदलें पाहिजे. दोहोंपैकीं कोठेंहि एके ठिकाणीं त्याला नाकारणें म्हणजे आत्मवंचना व आत्मनाश होय.

“ मा अहं ब्रह्म निराकुर्याम्
मा मां ब्रह्म निराकरोत् । ”

मीं ब्रह्माला सोडतां कामा नये, तें ब्रह्महि मला न सोडो. ब्रह्माचा आंतरिक ध्येयानेंच फक्त साक्षात्कार करून घेऊं म्हणाल व बाहेरच्या कर्मांत न घ्याल, हृदयांतच प्रेम द्याल व कर्मांनीं पूजा न कराल, किंवा याच्या उलट बाहेरच्या

कर्मांतच पाहाल व मनांत न बघाल तर दोन्हींत नाश आहे. तोल कोणत्याहि एका बाजूला अधिक जाणें म्हणजे खालीं पडणें. जीवन समतोल हवें.

पाश्चिमात्यांकडे पाहूं तर त्यांचा आत्मा कर्मरूपानें सारखा बाहेर विस्तारत आहे असें दिसेल. आत्म्याच्या आंतररूपाकडे तिकडे लक्ष नाहीं. अंतरंगांतहि एक कुरुक्षेत्र आहे व तेथेंहि विजयी व्हायचें आहे, याची स्मृति त्यांना नाहीं. आंतरिक जगावर त्यांचा विश्वासच नाहीं. मनाच्या समाधानाची परिपूर्णता कोठें आहे, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. शास्त्र सांगतें कीं, जगाची सारखी उत्क्रांति होत जाणार. परिपूर्णता शब्दच नाहीं. शेवटचा मुक्कामच नाहीं. पाश्चिमात्य अध्यात्मशास्त्र ईश्वराच्याहि उत्क्रान्तीबद्दल बोलत असतें. "ईश्वर आहे," अशी कबुली ते देणार नाहींत. ईश्वरहि विकास पावत आहे, असें म्हटल्यावांचून त्यांच्यानें राहवणार नाहीं.

कल्पनागम्य सर्व मर्यादांहून अनंत हें सदैव मोठेंच राहणार. एवढेंच नव्हे तर तें परिपूर्णहि आहे, ही गोष्ट ते विसरतात. एका अर्थानें ब्रह्मफूल फुलत आहे, तर दुसऱ्या अर्थानें तें सदैव फुललेलेंच आहे. एका अर्थानें ब्रह्म पूर्ण आहे, सर्वांचें रहस्य आहे. दुसऱ्या अर्थानें तें प्रकट होत आहे. दोन्ही रूपांनीं एकाच वेळेस तें आहे. गाणें व गायन हें जसें, तसेंच हें. गाणें पूर्ण असून गायनांत तें प्रकट होत असतें. फक्त गाणें चाललें आहे असें म्हणणें म्हणजे गाणाऱ्याला विसरणें. गाणाऱ्याच्या हृदयांत तें गीत पूर्णपणें सांठवलेलें आहे. गाणें ऐकत असतां एकाच क्षणीं तें सारें आपण जरी अनुभवीत नसलों तरी गाणाऱ्याच्या हृदयांत तें संपूर्ण आहे हें का आपल्याला ठाऊक नसतें ?

पाश्चिमात्य जग शक्तीच्या कैफानें उन्मत्त झाल्याप्रमाणें दिसत आहे. तेथें आदळआपटीवर जोर. प्रत्येक वस्तु बळजबरीनें मिळवायची, असा जणूं त्यांचा निश्चय. ते हट्टानें सारखें हें ना तें करीत राहतील. कधीं काम संपलें असें नाहींच. जगाच्या रचनेंत तृप्तीला, समाप्तीला ते स्थानच देत नाहींत. परिपूर्णतेचा आनंद त्यांना माहीत नाहीं, तो ते ओळखीत नाहींत.

पाश्चिमात्यांकडे धोका आहे त्याच्या उलट वृत्तीचा आपल्याकडे आहे. पाश्चिमात्य बाह्य जगाचे भोक्ते तर आपण आंतरिक जगाचे उपासक. सत्तेचे,

बाह्य विस्ताराचें क्षेत्र आपण हीन लेखून दूर फेंकतों. ब्रह्माचें वैचारिक चिंतन करावें, ही आपली वृत्ति. जगांतील सर्व घडामोडींतून प्रकट होणारें परब्रह्म पहायचें नाहीं, असा जणूं आपला निश्चय. आपल्याकडचे परब्रह्माचे उपासक आपल्याच समाधींत मग्न असतात. परंतु यांतहि अधःपात आहे. त्यांची श्रद्धा नियमांना मानीत नाहीं. त्यांची कल्पना अनिर्बंध संचार करूं पाहते. त्यांच्या आचाराविषयीं त्यांना विचाराल तर उत्तर देण्याचेंहि सौजन्य तें दाखविणार नाहींत. त्यांची बुद्धि ब्रह्माला सृष्टीपासून अलग करूं पाहूं इच्छिते. परंतु त्यांची ही इच्छा फोल आहे. त्यांची बुद्धि अखेर शुष्क काष्ठाप्रमाणें निरस होतें, तर्ककठोर होते. कर्माचा कायदा झुगारल्यामुळें, या बाह्य सृष्टींत कर्म करण्याची जी आवश्यकता असते, ती त्यांच्या लक्षांत न आल्यामुळें, मानवजातीचें ते नुकसान करतात. परंतु आपण असें अमित नुकसान करीत आहोंत, मानवजातीच्या शक्तीचा नी शीलाचा ऱ्हास करीत आहोंत, याची त्यांना जाणीव नसते. आपल्याच तंद्रींत ते मस्त असतात.

खऱ्या आध्यात्मिकतेंत अन्तर्बाह्य जगाचा मेळ असतो. आपल्या आध्यात्मिक ग्रंथांतून जी अध्यात्म विद्या शिकविलेली आहे तिच्यांत समतोलपणा आहे. सत्याला मर्यादा असते, नियम असतात.

" भयादस्य अग्निस्तपति "

त्याच्या भयानें अग्नि तापतो, असें त्या सत्याचें एक वर्णन केलें तर —

" आनंदात् हि खलु
इमानि भूतानि जायन्ते । "

असें आनंदस्वरूपी त्याचें दुसरें वर्णन आहे. नियम मानल्याशिवाय खरा आनंद नाहीं, खरी मुक्ति नाहीं. ब्रह्म हेंहि ऋतसत्याच्या नियमांनीं बांधलेलें आहे व आनंदरूपानें स्वतंत्र आहे. ब्रह्म सत्यरूप व आनंदरूप आहे. सत्य म्हणजे बंधन, नियम, मर्यादा. आनंद म्हणजे स्वतंत्रता. सत्याशिवाय आनंद नाहीं, नियमाशिवाय खरें स्वातंत्र्य नाहीं.

सत्याचे नियम पाळूं तेव्हांच स्वातंत्र्यांतील खरा आनंद आपण चाखूं शकूं. वीणेला तारा बांधलेल्या असतात, म्हणून त्यांच्यांतून संगीताचा आनंद

स्रवतो. तारा शिथिल असतील तर कोठला संगीतानंद ? संगीतरूपानें, ध्वनिरूपानें स्वतःच्या पलीकडे जाऊन ती तार स्वतःचें स्वातंत्र्य प्रत्येक सुरागणिक अनुभवीत असते. सतार खरी लागेपर्यंत, सुरेल सूर बाहेर पडूं लागेपर्यंत तारा ताणायला हव्यात, पिरगळायला हव्यात.

तुमचें जीवन ढिलें, बंधनहीन असेल तर तेथें ना संगीत, ना स्वातंत्र्य. कर्तव्याची तार घट्ट बांधाल तरच मुक्तीचा सोहळा अनुभवाल. कर्तव्य झुगारून देण्यांत धर्म नसून परमेश्वराचें जें विराट् कर्मसंगीत सुरू आहे, त्यांत आपल्याहि कर्तव्यकर्मांचा सूर नीट मिळविणें यांत धर्म आहे. ईश्वराच्या कर्मसंगीताशीं आपला सूर कसा लावायचा ?

" यत् यत् कर्म प्रकुर्वीत
तत् ब्रह्मणि समर्पयेत् । "

हें आपलें ध्येयवचन आहे. येथें गुरुकिल्ली आहे. सगळ्या कर्मांनीं परब्रह्माची पूजा करायची आहे.

" मैं भक्तिभेट अपनी
तेरी शरणमें लाऊं "

प्रभु-समर्पण बुद्धीनें कर्म म्हणजे जीवाचें संगीत. ही जीवात्म्याची मुक्ति. आपलें कर्म म्हणजे परमात्म्याला जोडणारा सेतु. मग अंतःकरणांत आनंद भरून राहतो. वासनांची मग आठवणहि होत नाहीं. दिवसेंदिवस अधिकाधिकच तो आत्मसमर्पण करूं लागतो नि जीवनांत देवाचें राज्य येतें; आत्मारामाचें राज्य येतें.

मानवजातीचा कर्मद्वारांच भव्योदात्त विकास होत आला आहे, होत राहील. कर्माला कोण तुच्छ मानील ? या दिव्य आत्मसमर्पणाची कोण थट्टा कराल ? युगायुगांतून वादळ असो वा सूर्यप्रकाश असो, संकटें असोत वा सुखें असोत, मानवजातीचें महान् मंदिर उभारलें जात आहे. परमेश्वराची भेट या मंदिरांत घडणार का एखाद्या वैयक्तिक कोपऱ्यांत ?

हे पथच्युत मुशाफरा ! स्वतःच्याच कल्पनांनीं झिंगून पडलेल्या ! मानव-यात्रा विजयी पावलें टाकीत कशी चालली आहे, तिचा आवाज का तुझ्या

कानांवर येत नाहीं ? मानवजातीचा प्रगतिरथ कसा धडधडत जात आहे, तें का तुला ऐकूं येत नाहीं ? मानवी आत्म्याचा विश्वरूप होण्याचा हा प्रयत्न आहे. या ध्येयमार्गांतील सगळ्या अडचणी पायाखालीं तुडवल्या जातील. कर्मद्वारां उन्नत होऊन, महान् होऊन जीव शिवाला मिळेल. उत्तुंग पर्वत फोडले जात आहेत व मानवी प्रगतीसमोर मान वांकवीत आहेत. मानव-जातीच्या प्रगतीचें यशोधन उंच फडकत आहे. सूर्योदय होतांच धुक्याची धांवपळ सुरू होते, त्याप्रमाणें मानवी आत्म्याच्या प्रगतीपुढें गोंधळांत पाडणारीं नाना भेंडोळीं नष्ट होतील. मानवी प्रगतीमुळें दुःख, रोग, अव्यवस्था इत्यादि गोष्टी मागें हटत आहेत. अज्ञानाचे पडदे टराटर फाडण्यांत येत आहेत. डोळ्यांवरची झांपड दूर होत आहे. ती पाहा दिव्य मानवजात पुढें पुढें जात आहे, ध्येयाप्रत पोंचत आहे. तें पाहा पूर्ण आरोग्य, तें पहा सौभाग्य, ती पहा भाग्यलक्ष्मी, त्या बघ कला. तें पहा ज्ञानविज्ञान ! तो बघ थोर धर्म ! ध्येयभूमि दृष्टिपथांत येत आहे. मानवजातीचा हा प्रचंड रथ पृथ्वीला डळमळवीत विजयानें सारखा पुढें जात आहे. प्रगतीच्या खुणांचे दगड ठायीं ठायीं ठेवून पुढें जात आहे. या दिव्य भव्य वेगवान् रथाला कोणी सारथीच नाहीं, असें का तुला वाटतें ? मानवजात विजय-यात्रेवर निघाली आहे. या यात्रेंत सामील व्हा, अशी हांक मारण्यांत येत असतां कोण असा दळभद्री कपाळकरंटा आहे कीं कोंपऱ्यांत बसून राहील ? या संस्फूर्त मेळाव्यापासून दूर राहण्याचा मूर्खपणा कोण करील ? दुःखाच्या दरींतून, सुखाच्या शिखरावरून अमित श्रम करीत अनादिकाळापासून विकासोन्मुख मानवजातीचा हा प्रगतिप्रवाह अन्तर्बाह्य संकटांना तोंड देऊन जो सारखा पुढें जात आहे, तो का मिथ्या ? ही युगायुगांची आटाआटी का खोटी, मायामय ? या दिव्य इतिहासाला कोण भ्रामक म्हणेल ? ही प्रगति म्हणजे वंचना असें म्हणणाऱ्याची सत्यस्वरूप परमेश्वरावर तरी श्रद्धा आहे का ? जगापासून पळून जाणाऱ्याला देव कोठें व कसा भेटणार ? पळून जाणें म्हणजे शून्यांत बुडणें नाहीं, अशा मार्गानें प्रभुप्राप्ति नाहीं. पळपुट्याला कुठला परमेश्वर ? या क्षणीं, या ठिकाणीं मी परमेश्वराला भेटत आहें, असें म्हणण्याची हिंमत आपल्याजवळ असायला हवी. कर्मद्वारां स्वतःची ओळख स्वतःस पटते, त्याप्रमाणें प्रभूचा अनुभवहि अंतरंगांत येत आहे, असें निःशंक म्हणतां आलें पाहिजे. आमच्या

कर्ममार्गांतील सर्व विघ्नें निरस्त करून आम्ही त्या परमेश्वराला मिळवीत आहोंत, असें छातीठोकपणें म्हणण्याचा हक्क आपण मिळविला पाहिजे. म्हणा कीं, " माझ्या कर्मांत माझा आनंद आहे व या माझ्या आनंदांत तो परमानंद, सच्चिदानंद आहे. "

उपनिषदांनीं " ब्रह्मविदां वरिष्ठः । " अशी पदवी कोणाला दिली ?

" आत्मानंदः आत्मरतिः क्रियावान् । " ज्याचा आनंद आत्म्याच्या ठिकाणीं आहे, आत्म्याचीच ज्याला आवड तो, क्रियावान् असतो, तो ब्रह्मवेत्त्यांत श्रेष्ठ. आनंददायक खेळाशिवाय आनंदाला अर्थ नाहीं. क्रियेशिवाय असणारा खेळ तो खेळच नव्हे. आनंदाचा खेळ म्हणजे कर्म. ज्याचा आनंद ब्रह्माचे ठायीं तो पडून कसा राहील ? ज्या रूपानें ब्रह्माचा आनंद प्रकट होतो, तें रूप आपल्या कर्मानें त्यानें नको का प्रकट करायला ? जो ब्रह्म जाणतो, ब्रह्माचे ठायीं ज्याचा आनंद, त्याचें सारें कर्म ब्रह्मासाठीं व्हायला हवें. त्याचें सारें जीवनच ब्रह्ममय. कवीला काव्यांत आनंद, कलावंताला कलेंत, शूराला शौर्यांत, प्रज्ञावन्ताला सत्यदर्शनांत, त्याचप्रमाणें ब्रह्मवेत्त्याचा आनंद दिवसाच्या सर्व कर्मांत. कर्म लहान असो वा महान् असो. सत्याच्या, सौंदर्याच्या, मांगल्याच्या रूपानें त्यांतून अनंत परमात्म्याला आपण अखंड प्रकटवीत राहिलें पाहिजे.

" बहुधा शक्तियोगात् वर्णान्
अनेकान् निहितार्थो दधाति । "

तें ब्रह्म आपल्या विविध शक्तीनें नाना वर्णांच्या लोकांचें पालन करतें, त्यांच्या गरजा भागवतें. तें परब्रह्म, तो परमात्मा अनंत कर्मांनीं स्वतःला देऊन टाकीत आहे. अखंड श्रमणाऱ्या परमात्म्याला कर्म सोडून तूं कसें मिळवणार ? तो परमात्मा अनंत आनंद देत आहे. ही सृष्टि म्हणजे त्याची आनंद-देणगी.

परमेश्वराशीं, त्या परात्पर पित्याशीं साधर्म्य अनुभवायचें असेल तर स्वतःला कर्मद्वारां देत जा.

" यः आत्मदा यः बलदा । "

असें वेदांत ब्रह्माचें वर्णन आहे. परमात्मा स्वतःला देतो, आपलीं लेंकरें

आपल्यासारखीं व्हावीं म्हणून त्यांना बल देतो. सर्वतोपरीं देऊन टाकणाऱ्या त्या परमात्म्याची ऋषींनीं पुढील प्रार्थना केली आहे.

" स नो बुद्‌ध्या शुभया संयुनक्तु । "

तो आमचें शुभबुद्धीशीं लग्न लावो. त्या प्रभूबरोबर काम करतां यावें म्हणून शुभबुद्धीची, सद्भावाची या प्रार्थनेंत आपण मागणी करीत आहोंत. ज्या मानानें कर्मांत शुभबुद्धि, सद्भाव, त्या मानानें प्रभूशीं ऐक्य. शुभबुद्धि म्हणजे काय? दुसऱ्याच्या कल्याणांत स्वतःचें कल्याण बघणें ही शुभबुद्धि-मानव-जातीच्या कार्यांतील आपण आपले कर्मभार उचलावेत. समाजाचें मानव-जातीचें असें कर्म करण्यांतच तुझा आनंद, असें जी बुद्धि सांगते ती शुभबुद्धि, सद्‌बुद्धि. या सद्‌बुद्धीच्या अनुरोधानें वागूं तर आपल्या जीवनांत संयम येईल, सुसूत्रता येईल. तें जीवन यांत्रिक नका म्हणूं. कारण आत्म्याच्या आनंदानें प्रेरित होऊन तें कर्म आपण करतों. तें कर्म भित्रेपणाचें, आंधळें, गतानुतिक असणार नाहीं. कर्माच्या आद्यन्तीं परमात्मा भरलेला आपण पाहूं. तें कर्म प्रथमपासून शेवटपर्यंत कल्याणावहच्च असेल.

" स्वाभाविकी ज्ञान-बल-क्रिया च ! "

असें त्याचें वर्णन आहे. ज्ञान, शक्ति व क्रिया असें त्याचें त्रिविध रूप आहे. कर्म करणें ही जेव्हां आपली सहज प्रवृत्ति होईल तेव्हां तें ओझा न वाटतां आनंदरूप होईल. जो कर्माचा वेळ तोच आनंदाचा. कामाचा दिवस तोच सुटीचा, तीच दिवाळी. आपण ज्या घटकेस काम करतों ती घटका आपणांस सुखाची वाटत नाहीं. फुलाला फुलण्यांत आनंद, नदीला वाहण्यांत, मानवाला कर्मांत आनंद. असें व्हायला हवें. कर्मद्वारां आपण स्वतःला देऊन टाकीत नसतों, त्यांत आपला आत्मा नसतो म्हणून तें कर्म आनंदरूप, आत्म्याचें संगीत, असें न वाटतां मानगुटीस बसणाऱ्या भुतासारखें वाटतें. तें कर्म मोक्षरूप न वाटतां पारतंत्र्याचें प्रतीक वाटतें.

स्वतःला देऊन टाकणाऱ्या प्रभो ! आनंदरूपानें नटणाऱ्या ! तुझें दर्शन अग्नीच्या ज्वालांप्रमाणें पेटून आम्हांला तुझ्याकडे येऊं दे ! फुलाच्या सुगंधा-प्रमाणें तुझ्यांत भरून जाऊं दे. आम्हांला जीवनावर प्रेम करायला शिकव.

यशापयश, सुख-दुःख—सर्वांवर प्रेम करायला शिकव. तुझ्या या विश्वांतील संगीत ऐकायला मला शक्ति दे, उत्साह दे. मी उत्साहानें अविरत श्रमावें म्हणून मला बळ दे. जें जीवन तूं दिलें आहेस तें मला पूर्णपणें जगूं दे. शूराप्रमाणें मला देऊं दे, घेऊं दे. हीच तुला आमची प्रार्थना. तुझा आनंद कर्माहून निराळा, असली दुबळी कल्पना माझ्या मनांतून काढून टाक. जेथें शेतकरी भूमि नांगरीत असतो, तेथें हिरव्यागार पिकांच्या रूपानें तुझाच आनंद नाचत असतो. कांटेरी झाडेंझुडपें तोडून दगडधोंडे फोडून मनुष्य सुंदर जागा तयार करून स्वतःसाठीं घर बांधतो, तेथें व्यवस्थितपणाच्या नि शान्तीच्या रूपानें तुझाच आनंद प्रकट होत असतो.

हे विश्वकर्मन्, वासंतिक वाऱ्याप्रमाणें तुझ्या विश्वशक्तीच्या झुळका आमच्या जीवनाकडे येवोत. त्या वसंताबरोबर विविध फुलांचा परिमल येवो, वनांतील गीतें येवोत, तृणपर्णांचे आवाज येवोत, तो वसंतवात आमच्या निर्जीव, नीरस जीवनांत सरसता, मधुरता आणो; तो आमच्या कंठांतून वाणी प्रकटवो. तो आमच्यांत शक्ति संचरवो. या विश्वांत पर्णरूपानें, पुष्परूपानें, फलरूपानें स्वतःची अनंत परिपूर्णता आपण गांठूं, असें आमच्यांतील या नवशक्तीला सदैव वाटूं दे, ही तिला उत्कंठा असूं दे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

# सौंदर्यरूपानें साक्षात्कार

ज्या वस्तूपासून आपल्याला आनंद घेतां येत नाहीं, त्या आपणांस भाररूप वाटतात. त्यांना फेंकून मोकळें व्हावें असें वाटतें. कांहीं वस्तु उपयुक्त असतात. त्यांच्याशीं आपला उपयोगापुरता, कामापुरता नैमित्तिक संबंध असतो. त्या वस्तूंचीहि उपयुक्तता संपतांच त्या भाररूप वाटतात. कांहीं वस्तु आपल्या जीवनाच्या अंगणांत भटक्याप्रमाणें क्षणभर येतात. आपण त्यांचा फारसा विचारहि करीत नाहीं. त्या आल्या तशा जातात. परंतु जी वस्तु आपणांस आनंद देणारी आहे, तीच संपूर्णपणें आपली अशी होते.

या जगाचा बराचसा भाग आपणांस असून नसल्यासारखाच असतो. परंतु असें करून चालणार नाहीं. कारण, अशानें आत्मा संकुचित होतो, लहान होतो. हें सारें विश्व परमेश्वरानें आपणांस दिलेलें आहे. त्यानें आपणांस जी शक्ति दिली आहे, तिच्या द्वारां या जगाचा वारसा आपण मिळवूं अशी श्रद्धा आपणांजवळ असण्यांतच त्या शक्तीची कृतार्थता आहे. आपल्याजवळ सौंदर्यदृष्टि असते. या दृष्टीचा आत्म्याच्या विकासांत कसा उपयोग करून घ्यायचा ? ही दृष्टि आपणांस काय म्हणून दिलेली आहे ? सत्याचें पृथक्करण करावें, त्यांतील छाया-प्रकाश बघावे, सौंदर्य व कुरूपता वेगवेगळी करून दाखवावी, यासाठीं का ही सौंदर्य-दृष्टि आपणांस दिलेली आहे ? तसें असेल तर या सौंदर्य-दृष्टीमुळें भेद जन्मतील, विरोधी भाव संभवतील. संगीताचा विरस होईल. एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशीं सन्निकर्ष येण्याच्या मार्गांत मोठीच अडचण येऊन पडेल.

म्हणून सौंदर्यदृष्टि यासाठीं नाहीं असें म्हणावें लागतें. जोंपर्यंत साक्षात्कार अपूर्ण आहे, तोंपर्यंत परिचित व अपरिचित, प्रिय व अप्रिय, ज्ञात व अज्ञात, असा विभक्तभाव राहणारच. आपणांस या जगाचें ज्ञान करून घ्यावयाचें

आहे. या गोष्टीला आपण लहरीनें मर्यादा घालूं शकत नाहीं. पूर्वी ज्ञात असलेले प्रांत आज नकाशांत दाखविलेले असतात. त्याचप्रमाणें आपली सौंदर्य-दृष्टीहि रोज नवीन नवीन सुंदरता पहात असते; नवीन विजय मिळवीत विश्व जिंकीत ती चालली आहे. सत्य सर्वत्र असल्यामुळें प्रत्येक वस्तु ज्ञानाचा विषय आहे. त्याचप्रमाणें सौंदर्यहि विश्वव्यापक आहे. प्रत्येक वस्तु आपणांस सुंदर दिसण्याची शक्यता आहे व तिच्यापासून आनंद मिळण्याची शक्यता आहे. प्रत्येक वस्तु आपणांस आनंद-दर्शन घडवील यांत शंका नाहीं.

मानवी इतिहासाच्या आरंभीं मनुष्य प्रत्येक वस्तूकडे तिच्यांत जीव आहे कीं नाहीं हें पाही. सजीव आणि निर्जीव असे दोन भाग स्पष्टपणें निदर्शनास आले. यांतून जीवनाच्या शास्त्राला आरंभ झाला. परंतु जीवनशास्त्र जसजसें वाढत आहे, तसतसें सजीव-निर्जीव यांतील अंतरहि कमी होत आहे. मानव-जातीच्या बाल्यावस्थेंत सजीव-निर्जीव भेदानें जरी मदत केली असली तरी जसजशी मानवाची जाणीव स्वच्छ नि सूक्ष्मग्राही होते, तसतसा हा सजीव-निर्जीव भेदहि गळून पडतो.

उपनिषदें सांगतात कीं, आनंदांतून सर्व चराचर जन्मलें, आनंदानेंच त्यांचें धारणहि होतें. ही गोष्ट समजून घेण्यासाठीं आपणांस प्रथम सुंदर व कुरूप असे दोन स्पष्ट भेद करूनच आरंभ करावा लागतो. परंतु हळूंहळूं हे भेद कमी होतात व सर्वत्रच सौंदर्याचें दर्शन होऊं लागतें. सौंदर्याची नि आपली पहिली ओळख अनंत रंगांच्यामुळें होते. कांहीं चांगलें, कांहीं वाईट असें भासतें. परंतु हा विरोध मावळतो. हे वरवरचे सुरूप-कुरूप भेद जाऊन एक सुंदर तालबद्धता प्रतीत होते. सर्वत्रच सुंदरता दिसूं लागल्यामुळें हें येथें सौंदर्य आहे असें ताशे-नगारे वाजवून मग सांगावें लागत नाहीं.

मानवजातीच्या इतिहासाच्या कालखंडांत त्या त्या विशिष्ट सौंदर्याची पूजा आपणांस दिसते. त्या विशिष्ट सुंदरतेचाच अभिमान बळावतो. बाकीचें सौंदर्य तुच्छ वाटतें व ती सुंदरताच नव्हे असें सांगतात. त्या त्या विशिष्ट सुंदरतेच्या उपासकांच्या मनांत मग अहंकार, दंभ, अतिशयोक्ति हे दुर्गुण ठाण मांडतात. भारताच्या प्राचीन काळांत ज्याप्रमाणें उदात्त सत्य दूर

सारून ब्राह्मण रूढींच्या भीषण जंगलांत गुरफटलेले दिसतात, आणि तें जंगलच भरमसाट वाढत गेलेलें दिसतें, त्याप्रमाणें सौंदर्याच्या प्रान्तांतहि उदार उदात्ततेचा लोप होऊन रूढी निर्माण होतात. ठराविक सांचांत सौंदर्य जाऊन बसतें.

परंतु सौंदर्याचाहि मोक्षकाळ येतो. आणि हा काळ जेव्हां येतो तेव्हां वस्तु लहान असो वा महान् असो, तिच्यांतील सौंदर्य नजरेंत भरतें; सौंदर्य अविरोधानें सर्वत्र भरून राहिलें आहे असें दिसतें. परंतु येथेंहि आपण अतिशयोक्ति मग करूं लागतों. अमुकच वस्तु सुंदर काय म्हणून मानायची असें म्हणून बंड करणारे, अत्यंत सामान्य वस्तूहि किती सुंदर आहे, असें मग म्हणूं लागतात. मारून मुटकून सामान्य वस्तूसहि असामान्य करण्याच्या हट्टास आपण पेटतों. वास्तविक आपणांस सर्वत्र मेळ घालायचा असतो. परंतु बंड पुकारल्यामुळें पुन्हा भेद निर्माण होतात. बंडाचा स्वभावच भेद निर्मिणें हा आहे. सौंदर्याचें रूढीविरुद्ध होणारें जें बंड त्याचीं पूर्वचिन्हें दिसत आहेत; आपल्या सौंदर्य-क्षेत्रांत सुंदर व कुरूप असे जे आपण भेद पाडतों ते आपली सौंदर्यदृष्टि अपूर्ण व संकुचित असते म्हणून पाडतों, ही गोष्ट आज मानवाला कळून आली आहे. मनुष्य स्वार्थ-रहित दृष्टीनें जेव्हां वस्तूकडे बघायला शिकेल, इंद्रियांच्या अनिवार भोगेच्छांपासून झडझडून दूर होऊन जेव्हां मनुष्य प्रत्येक वस्तूकडे पाहील, त्या वेळेस फक्त त्याला चराचरांत भरून राहिलेल्या सौंदर्याचें दर्शन होईल.

ज्या वेळेस सर्वत्र सौंदर्य आहे असें आपण म्हणतों, त्या वेळेस कुरूपता हा शब्दच भाषेंतून दूर करायचा आपला उद्देश नसतो. ज्याप्रमाणें असत्य म्हणून कांहीं नाहींच, असें आपण म्हणूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें कुरूप म्हणून कांहीं नाहींच, असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं. असत्य खात्रीनें आहे; परंतु विश्वाच्या विशाल रचनेंत नसून आपल्या जाणीवशक्तींत आहे. जाणीवशक्तीचा अभाव म्हणजे असत्यता. असत्यता आहे त्याचप्रमाणें कुरूपताहि आहे. आपण जीवनांतील सौंदर्याला जेव्हां छिन्नभिन्न करतों, तेव्हां ही कुरूपता जन्मते. सत्याचें अपूर्ण व अंधुक दर्शन झाल्यामुळें जी कला आपण निर्माण करतों, तिच्यांत कुरूपता उत्पन्न होते. सत्याच्या नियमांस

झुगारून कांहीं एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आपण जीवन चालवूं शकतों. सत्याचा नियम चराचरांत सर्वत्र आहे. त्याचप्रमाणें एकतानतेचा, मधुरतेचा, सुंदरतेचा नियम सृष्टींत आहे. सृष्टींत जो मेळ आहे, जी मधुरता आहे, त्याचे नियम आपण झुगारतों, तेव्हां कुरूपता जन्मते.

आपणांत सत्य समजून घेण्याची जी शक्ति असते, तिच्या साह्यानें सृष्टींतील नियम आपण जाणून घेतों. त्याचप्रमाणें सौंदर्य पाहण्याची जी आपणांत शक्ति असते, तिच्या साहाय्यानें सृष्टींतील मधुरता, मेळ आपण पाहूं शकतों. सृष्टींतील नियम समजल्यामुळें सृष्टवस्तूंवर आपण सत्ता मिळवतों व बलवान होतों. आपल्या नैतिक सृष्टीचा कायदा समजून घेऊन जेव्हां आपण स्वतःवर सत्ता चालवतों, तेव्हां आपण स्वाधीन व स्वतंत्र होतों. त्याचप्रमाणें बाहेरच्या अनंत सृष्टींतील मधुरता, सुसंवाद यांना आपण ज्या मानानें पाहूं, त्या मानानें सृष्टींतील आनंद आपणांस चाखतां येईल. आपल्या जीवनांत हा आनंद अधिकाधिक येऊं लागला कीं कलेंत सौंदर्य उत्पन्न करण्याची आपली दृष्टीहि सुंदर नि विशाल होते.

आपल्या आत्म्याच्या ठिकाणीं असलेली गोडी जेव्हां आपणांस कळेल, तेव्हांच सृष्टींत भरून राहिलेला आनंद स्पष्टपणें आपणांस समजेल. आपण प्रेमरूपानें, सद्भावरूपानें त्या अनंतासमोर सौंदर्यलहरी नाचवीत नेतों. आपल्या जीवनाचें हेंच अंतिम साध्य. सौंदर्य सत्यरूप आहे व सत्य सौंदर्यरूप आहे, हें तत्त्व आपण विसरतां कामा नये. सर्व जगताचा प्रेमरूपानें आपणांस साक्षात्कार व्हायला हवा. कारण प्रेम जगाला जन्म देतें, प्रेम सांभाळतें आणि प्रेमच अखेर पदराखालीं झांकूनहि घेतें. प्रेमानें उत्पत्ति, प्रेमानें स्थिति, प्रेमानें लय होतो. हृदय खुलें करूं, परमोदार करूं, तेव्हांच तें वस्तूंच्या गाभ्यांत शिरूं शकेल व ब्रह्माचा निरपेक्ष सहज आनंद भरपूर सेवूं शकेल. संगीत हा कलेचा अत्यंत विशुद्ध नमुना आहे. त्यांत सौंदर्य सहजपणें निर्माण झालेलें असतें. म्हणून संगीताचा आपणांवर तत्काळ परिणाम होतो. तो अनन्त परमात्मा शान्त व मर्यादित स्वरूपांत बाहेर प्रकट होत असतो. तें संगीतच आहे. सान्त, साधें, प्रत्यक्षावगम असें हें संगीत आहे. सायंकाळचें आकाश तेच तेच तारे पुनः पुन्हा उधळीत

येतें. त्या आकाशाला त्याचा कंटाळा नाहीं. आपणांस बोबडें बोलतां येतें, याचाच आनंद वाटून बालक तेच ते बोबडे शब्द पुनःपुन्हां बोलतें आणि आपणहि तेच शब्द तसेच उच्चारले तर बालक आनंदानें ऐकतें. हें आकाश त्या बालकाप्रमाणें आहे. आषाढांतील रात्र असावी. बाहेर अंधारगुडूप नि मुसळधार पाऊस असावा. पृथ्वी झोपलेली असते. रात्रींच्या निःस्तब्ध शांतीवर पाऊस आपलीं एकावर एक पांघरुणें जणूं घालीत असतो. अंधारांत दूर दिसणारीं अंधुक झाडें, पोहणाऱ्याचें डोकें दिसावें त्याप्रमाणें आजूबाजूच्या पाण्यांत दिसणारीं झाडेंझुडपें, ओलसर तृणाचा व ओल्या पृथ्वीचा वास, दूरवर पसरलेला घरापारांना वेढून राहिलेला अंधार, त्यांतून डोकें वर काढणारा देवळांचा घुमट, सारें कांहीं रात्रींच्या हृदयांतून बाहेर पडणाऱ्या संगीताच्या लहरीप्रमाणें वाटतें. आकाशाला व्यापून राहणाऱ्या पावसाच्या आवाजांत, त्या नादब्रह्मांत या सभोंवतालच्या सर्व नादलहरी, या संगीतताना मिसळतात, विलीन होतात. म्हणून जे हृदयाचे खरे कवि आहेत, जे द्रष्टे आहेत, ते या विश्वाचें वर्णन संगीतरूपानें करतात. सर्वत्र दिसणाऱ्या अनंत आकारांना ते चित्रकला म्हणणार नाहींत. निळ्या नभाच्या पार्श्वभूमीवर अनंत छटांचा चाललेला खेळ; त्याला ऋषि, ते द्रष्टे कवि, चित्रकला नाहीं म्हणणार! कां बरें ? चित्रकाराला कुंचला, रंगाची पेटी, पडदा सारें हवें. पहिला कुंचला मारला, कांहीं लक्षांत येत नाहीं. संपूर्ण चित्राची कल्पना अजून किती तरी दूर. जेव्हां चित्र संपतें, चित्रकार निघून जातो, तेव्हां तें चित्र एकाकी तेथें उभें असतें. कलावंताच्या हाताचे प्रेममय स्पर्श निघून गेलेले असतात.

परंतु गाणाऱ्याचें सारें हृदयांत आहे. त्या ताना, ते सूर, सारें हृदयांतून येतें, जीवनांतून येतें. बाहेरून मिळवलेली ती सामुग्री नसते. कल्पना व तिचा उच्चार हीं तेथें बहीणभावांप्रमाणें, एवढेंच नव्हे तर कधीं कधीं एकरूप असतात. संगीतांत हृदय तत्काळ प्रकट होतें. बाह्य वस्तूचा अडथळा तेथें येऊं शकत नाहीं.

कोठल्याहि कलेप्रमाणें संगीतासहि पूर्ण व्हायला थोडा अवधि लागतो. तरीहि प्रत्येक पावलाबरोबर पूर्ण सौंदर्य प्रकट होत असतें. संगीत प्रकट

सा....६

करण्याचें साधन जे शब्द तेहि तेथें भाररूप अडथळे वाटतात. कारण शब्दांचा अर्थ करण्यासाठीं विचार करावा लागतो. संगीताला अर्थावर विसंबून राहावें लागत नाहीं. शब्द जें कधींहि प्रकट करूं शकणार नाहींत, तें संगीत बोलून दाखवीत असतें. शिवाय, संगीत व गवयी अविभक्त आहेत. गवयी गेला कीं त्याच्याबरोबर संगीत गेलें. संगीत गाणाऱ्याच्या जीवनाशीं व आनंदाशीं अमर संबंधानें सदैव बांधलेलें आहे.

विश्वसंगीत अनंत काळापासून सुरू आहे. विश्वाच्या उद्गात्यापासून तें अलग नाहीं, क्षणभरहि दूर नाहीं. परमेश्वराचा आनंद अनंत रूपें घेऊन प्रकट होत आहे. परमात्म्याच्या हृदयाचे कंप म्हणजेच आकाशांतील शतरंग. या गाण्यांतील प्रत्येक सुरांत पूर्णता आहे. कोणताहि सूर शेवटचा नसला तरी त्यांत अनंतता भरलेली आहे. विश्वाच्या या मधुर संगीताचा अर्थ न कळला म्हणून काय झालें? तारांना बोटांचा स्पर्श होतांच सर्व मधुरता, स्वरसंगीत प्रकट व्हावें तसेंच हें नाहीं का? ही सौंदर्याची भाषा आहे. आलिंगनाची भाषा आहे. ही भाषा विश्वाच्या हृदयांतून बाहेर पडते व सरळ आपल्या हृदयाला येऊन भिडते.

काल रात्रीं मी अंधारांत एकटाच उभा होतों. सर्वत्र असीम निःस्तब्धता. आणि त्या विश्वकवीचें मधुर गान मीं ऐकलें. आणि मी जेव्हां शय्येवर येऊन पडलों व डोळे मिटले, तेव्हां माझ्या निद्रेंतहि जीवनाचा नाच चालू असेल व माझ्या शांत शरीरांतील गान विश्वसंगीताला साथ देईल, माझें हृदय नाचत राहील, नसानसांतील रक्त उसळत राहील, माझ्या शरीरांतील कोट्यवधि प्राणमय परिमाणु प्रभूचा स्पर्श होतांच, त्याच्या दिव्य वीणेंतून निघणाऱ्या सुरांबरोबर सूर लावतील, हा विचार माझ्या मनांत होता.

★ ★ ★

# अनन्ताचा साक्षात्कार

उपनिषद् सांगतें, “ इह चेत् अवेदीत् अथ सत्यमस्ति । ” याच जन्मांत परमेश्वराला समजून घ्याल तर जीवनाला अर्थ प्राप्त होईल. नाहीं तर “ महती विनष्टिः । ”—मोठा नाश आहे. ईश्वराची प्राप्ति करून घ्यायची म्हणजे काय ? अनंत वस्तूंतील एक वस्तु हा कांहीं त्या अनंत परमात्म्याचा अर्थ नव्हे. परमेश्वर ही कांहीं अशी वस्तु नाहीं कीं, जी तुमच्या रोजच्या व्यवहारांत, राजकारणांत, व्यापारांत, स्पर्धाक्षेत्रांत उपयोगी पडेल. तुमचे बागबगीचे, बंगले, महाल, गाड्याघोडे, यांच्या यादींत घालण्यासारखी ही वस्तु नाहीं. बँकेंत ठेवण्याची ही वस्तु नाहीं.

मनुष्य प्रभुप्राप्तीसाठीं तळमळतो याचा अर्थ काय ? ही का इस्टेटींत भर घालायची वस्तु आहे ? नाहीं, खात्रीनें नाहीं. संचयांत सारखी भर घालणें ही एक नीरस गोष्ट आहे. ज्या वेळेस जीवाला शिवाच्या भेटीची ओढ लागते, त्या वेळेस या सांसारिक मिळवामिळवीच्या खटाटोपांतून तो कायमचा मुक्त होऊं इच्छितो. अनित्य पसाऱ्यांतील नित्य वस्तु, सकल रसांतील तो परमोच्च रस, “ नित्योऽनित्यानां, रसानां रसतमः ”, त्याला तो मिळवूं बघतो. उपनिषदें ब्रह्मसाक्षात्कार करून घ्या, असें जेव्हां सांगतात, तेव्हां नवीन कांहीं मिळवायला नाहीं सांगत.

“ ईशावास्यमिदं सर्वं  
यत्किं च जगत्यां जगत् ।  
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः  
मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥ ”

“ या जगांत जें जें आहे तें परमेश्वरानें अन्तर्बाह्य व्यापलें आहे. देवानें जें दिलें, त्याचा उपभोग घे. परंतु तें तुझें नाहीं. त्याचा लोभ नको धरूं.”

जें जें आहे तें प्रभुव्याप्त आहे हें जेव्हां तुमच्या लक्षांत येईल, जें जें जवळ आहे ती त्याची देणगी म्हणून जेव्हां बघाल, त्याच वेळेस या सान्त जगांतील अनन्त परमात्मा, अनित्य वस्तूंतील तें नित्य तत्त्व, या देणग्यांत लपलेला तो अनंत-दानी ओळखूं शकाल. या विश्वांतील या सकल वस्तु त्या एक सत्यमय प्रभूला प्रकटवीत असतात. आपणांजवळ ज्या लहानमोठ्या अनेक वस्तु असतात, त्यांच्यामुळें आपला त्या अनंताशीं संबंध जोडला जातो, म्हणून त्यांना अर्थ. नाहीं तर या संभाराला काय किंमत ?

इतर वस्तु वा व्यक्ति आपणांस आढळतात, तसा परमात्मा नाहीं. येथें नसेल तर तो तेथें असेल, अशा प्रकारचें त्याचें स्वरूप नाहीं. प्रातः-कालीन प्रकाश विकत घेण्यासाठीं दुकानांत जावें लागत नाहीं. डोळे उघडतांच तो समोर स्वागतार्थ उभा असतो. ब्रह्म सर्वत्र आहे हें अनुभविण्या-साठीं स्वतःला देऊन टाकण्याचाच काय तो अवकाश असतो. म्हणून बुद्धदेव निक्षून सांगत कीं, स्वार्थी, संकुचित जीवनाच्या तुरुंगांतून आधीं मुक्त व्हा. या संकुचित जीवनाची जागा भरून काढणारें दुसरें विशाल नि आनंदप्रद जीवन मला मिळणार नसेल तर हा त्याग करण्यांत काय अर्थ ? स्वार्थ सोडायचा कां ? परमार्थ मिळावा म्हणून. महान् वस्तूची प्राप्ति व्हावी म्हणून.

ईश्वराची खरी पूजा म्हणजे त्याला रोज कणकण मिळवायचें अशी नसून आपण स्वतःला रोज तिळतिळ देऊन टाकणें ही आहे. त्याच्या व आपल्या ऐक्याच्या आड जे कामक्रोधादि येतात ते दूर करणें, सद्भाव-संपन्न होणें, प्रेममय होणें म्हणजे प्रभूची पूजा.

उपनिषद् सांगतें, " लक्ष्यांत घुसून बसणाऱ्या बाणाप्रमाणें परमेश्वरांत घुसून बस. " केवळ मनाच्या एकाग्रतेनें हें सारें ईश्वरानें व्यापलें आहे, हा अनुभव येणार नाहीं. आपल्या साऱ्या जीवनाचा तो ध्येयार्थी अविरत उद्योग व्हायला हवा. आपल्या आचारविचारांत त्या अनंताची सदैव जाणीव हवी. ती स्मृति दिवसेंदिवस सहज होऊं दे.

" को हि एव अन्यात्, कः प्राण्यात्  
यदेष आकाशे आनंदो न स्यात् । "

तो सच्चिदानंद या अवकाशांत सर्वत्र भरून न राहता तर कोण जगता, कोण हालचाल करता ?

कोणी म्हणतील कीं, "परब्रह्मप्राप्ति आपल्या शक्तीपलीकडची आहे. तो दुर्लभ परमात्मा आम्हांला असून नसल्यासारखाच." इतर वस्तु आपण मिळवतों, त्याप्रमाणेंच ही वस्तु मिळवायची असती तर ती खरोखरच अप्राप्य असें म्हटलें पाहिजे होतें. मनुष्याचें परमसुख वस्तूची मालकी मिळविण्यांत नसून ती मिळाली म्हणजे झालें यांत आहे. आपलीं शारीरिक सुखें अननुभूत अशा वस्तूला जागाच देत नाहींत. त्यांचें क्षेत्र फार मर्यादित असतें. ज्या वेळेस आपण जेवत असतों, भूक शमवीत असतों, त्या वेळेस जो आनंद वाटतो, तो प्रत्येक क्षणीं अनंतास स्पर्श करीत असतो. परंतु खाण्याची क्रिया संपतांच त्या सुखाचाहि अंत होतो. आपल्या बौद्धिक सुखांची सीमा याहून विस्तृत असते. आपल्या खोल प्रेमवृत्तींत मिळणें व न मिळणें या दोन्ही गोष्टी नेहमीं बरोबर असतात. एक प्रियकर आपल्या प्रियेला म्हणतो : "जन्मल्यापासून मी तुझें सुखसौंदर्य पाहत आहें. तरी हे डोळे बुभुक्षित आहेत. लाखों वर्षें तुला हृदयाशीं धरून ठेवलें तरी हें हृदय अतृप्तच राहील."

यावरून हें स्पष्ट होईल कीं, आपण आपल्या सर्व सुखांत अनंताला शोधून काढीत असतों. श्रीमंत होण्याच्या आपल्या इच्छेंत इतकी रक्कम मिळविणें असा अर्थ नसतो. ती इच्छा अमाप व अस्पष्ट असते. आपलीं क्षणिक सुखेंहि अनंत परमेश्वराचींच क्षणिक सुखें. त्या आनंदसागरावरचेच हे क्षुद्र तरंग. ज्या वस्तु कधींहि अनंत व असीम व्हायच्या नाहींत, त्यांच्या मर्यादा वाढविण्याचा व्यर्थ प्रयत्न करणें, यांत मानवाचें सारें दुःख, त्याची करुण कहाणी आहे. सान्ताची शिडी कितीहि उंच केलीत तरी ती अनन्ताला कशी पोंचणार ?

मालकीच्या कल्पनेच्या पलीकडे जाण्याची आत्म्याची असोशी असते. आत्मा नानाविध वस्तुजातांस स्पर्श करतो व अखेर म्हणतो, "मला या वस्तूंचा वीट आला. जो अप्राप्य, ज्याला मिळवायचें नसतें, तो कोठें आहे ?"

मानवी इतिहासांत एक गोष्ट स्पष्ट दिसते कीं, मनुष्याचें सत्यस्वरूप हें त्यागानें नटलेलें आहे. त्याग हें आत्म्याचें स्वरूप. ज्या वेळेस जीव म्हणतो, "ही वस्तु मला नको, मी हिच्याहून मोठा आहें," त्या वेळेस एका उदात्त सत्याचा तो उच्चार करीत असतो. बाहुलीपेक्षां आपण प्रत्येक बाबतींत श्रेष्ठ आहोंत असा जेव्हां मुलीला अनुभव येतो, तेव्हां ती तिला कोपऱ्यांत फेकते. ज्या अर्थीं वस्तु आपल्या ताब्यांत असतात, त्या अर्थीं त्यांच्याहून आपण मोठे आहोंत हें उघड आहे आणि अशा क्षुद्र गोष्टींनीं आपणांस गुलाम करावें, ही केवढी खेदाची गोष्ट ! गृहत्याग करतांना याज्ञवल्क्य आपली मालमत्ता जेव्हां मैत्रेयीस देऊं लागतो, तेव्हां ती प्रश्न विचारते, "या मर्त्य वस्तु त्या अमर्त्य परब्रह्माची प्राप्ति करून घेण्याच्या कामीं उपयोगी पडतील का ?" निराळ्या शब्दांत हाच प्रश्न पुढीलप्रमाणें विचारतां येईल, "माझ्या आत्म्यापेक्षां या वस्तु मोलाच्या आहेत का ?" याज्ञवल्क्य मैत्रेयीस म्हणतो, "सांसारिक दृष्ट्या या वस्तु तुला श्रीमंत करतील." ती म्हणते, "मग यांचा मला काय उपयोग ?" आपल्याला खरोखर काय मिळवायचें आहे, आपल्याजवळ जें आहे त्याची वास्तविक किंमत काय ? हें सारें जर मनुष्य नीट समजून घेईल, तर तो मोहांत पडणार नाहीं. या वस्तु-संभाराहून अति थोर, परमोच्च असें माझें स्वरूप आहे, ही गोष्ट त्याला कळून येईल. क्षुद्र बंधनांतून मग तो मुक्त होईल. मनुष्य मोहमय संपत्तीच्या पलीकडे जेव्हां जाईल, तेव्हांच त्याला स्वतःच्या स्वरूपाची खरी किंमत कळेल. अनन्त जीवनाकडे जाण्याचा मार्ग अनंत त्यागाच्या पायऱ्यांनीं बांधलेला आहे.

अनन्त परमात्मा संपूर्णतेनें मिळविणें अशक्य आहे, असें बुद्धीनें निर्धारण्याचा हा प्रश्न नाहीं. ही अनुभव घेण्याची वस्तु आहे. हा अनुभव आनंदरूप आहे. आकाशांत उडणारा पक्षी पंखांच्या प्रत्येक फडफडण्याबरोबर आकाशाच्या अनंततेची जाणीव मिळवीत असतो. हे पंख आकाशाच्या अतीत आपणांस नेणार नाहींत, हें तो पूर्णपणें समजतो. परंतु असें समजण्यांतच आनंद आहे. त्याच्या पिंजऱ्यांतील आकाश मर्यादित आहे. त्याच्या जीवनास तेवढें पुरेसेंहि असेल. गरजेहून तें अधिक नाहीं. परंतु गरजेपुरत्या जीवनांत पक्ष्याला आनंद नाहीं. आपणांस जरूर आहे त्यापेक्षां अनंत पटीनें मिळालें आहे, ही कल्पना कळेल तेव्हांच पक्ष्याला आनंद होईल.

याप्रमाणें अनंत परमात्म्याकडे आत्मा उड्डाण करीत जाऊं दे. जें आपणांस मिळवायचें आहे तें मिळवायला आपणांस पुरेशी शक्ति नाहीं, हें पदोपदीं अनुभवास येऊन आनंद होऊं दे. हें समजण्यांतच मोक्ष आहे.

मनुष्याचें शाश्वत सुख अमुक एक मिळवून घेण्यांत नसून जें आपणांहून महान् आहे, त्याच्या चरणीं स्वतःला समर्पिण्यांत आहे. आपल्या व्यक्तिगत जीवनाहून थोर अशीं जीं सामाजिक, राष्ट्रीय, मानवजातीसंबंधीं कर्तव्यें आहेत, तदर्थ जीवन देणें यांत मानवाचा मोठेपणा आहे. आपणांजवळचें सारें, एवढेंच नव्हे तर प्राणहि, या कर्तव्यासाठीं द्यायला आपण आनंदानें सिद्ध होतों. या वस्तु इतक्या थोर असतात कीं, त्या आपल्या उदात्ततेनें आपणांस व्यक्तिगत जीवनाची क्षुद्रता पटवतात. सारें जीवन त्या महनीय ध्येयासाठीं होमावें असें वाटतें. जोंपर्यंत एखाद्या महान् ध्येयासाठीं आपण आपलें जीवन समर्पीत नाहीं, तोंवर तें जीवन नीरस, कंटाळवाणें वाटतें. जिच्यासाठीं आपण सर्वस्व सोडूं, अशी एखादी उज्ज्वल ध्येयभूत वस्तु मानवाला हवी असते. बुद्ध, खिस्त, सारे संत, पैगंबर, प्रेषित, हे उदात्त विचारांचे व ध्येयांचे प्रतिनिधि आहेत. सर्वस्वसमर्पणाची संधि ते दाखवीत असतात. ते आपलें दिव्य भिक्षापात्र तुमच्यासमोर करतात व तुमच्या सर्वस्वाची भिक्षा मागतात. त्यांना नाहीं म्हणणें जिवावर येतें. आणि देण्यांतच माझा सारा आनंद सांठवलेला आहे, त्यांतच मोक्ष आहे; ज्या मानानें देईन, त्या मानानें अनंताशीं जोडला जाणार आहे, हें जीवाला कळून येतें.

मनुष्य अपूर्ण आहे. त्याला पूर्ण व्हायचें आहे. आपलें हें वरवरचें स्वरूप अति क्षुद्र आहे. येथेंच आपण थबकूं तर पुढें विकास नाहीं. मग या लहान डबक्यांत पडून नरक—भीषण नरक अनुवभवाल. तुमचें ध्येयभूत जीवन असीम आहे. तुम्हांला जें खरोखर व्हावयाचें आहे, तें परमोच्च आहे. तुमच्या सुप्त मोठेपणास मर्यादा नाहीं. तुमचा मोक्ष, ती स्थिति मिळवून घेण्यांत आहे. आपलें वर्तमान-कालीन जीवन जें क्षणाक्षणाला अनुभववाला येतें, त्याच्याशीं जोडलेलें आहे. परंतु ध्येयभूत जीवन अनन्तासाठीं धडपडत असतें, तें कधीं गमावतां येणार नाहीं. कारण तें कधीं मिळत नसतें.

जीवनाची मर्यादा व्यावहारिक जीवनास उपयोगी आहे. जगण्यासाठीं मनुष्य अन्न मिळवितो, ऊब असावी म्हणून कपडा मिळवितो. सृष्टीच्या या पसाऱ्यांत वस्तु मिळवितो. इस्टेट वाढविणें यांतच मनुष्य गुंग असतो.

जगांतील हें मिळवणें आपल्या गरजेनें मर्यादित असतें. जेवढी जरूरी तेवढें मिळवितो. भांड्यांत रिकामी जागा असेल, त्या मानानें पाणी आंत जाणार भुकेपुरतें अन्न. राहण्यापुरतें घर. वस्तु गरज भागवते म्हणून ती उपयुक्त. अशा रीतीनें कांहीं वस्तु आपण मिळवीत असतों मिळवण्याचा लोभ हा संसाराचा स्वभावच आहे.

परंतु आपणांत मर्यादितपणाबरोबर अमर्याद तत्त्वहि आहे. आपल्यांतील हा अमृतत्वाचा अंश अनंताकडे जाऊं इच्छितो. त्याला संपत्तीची स्पृहा नसते. त्याला स्वातंत्र्य, आनंद या वस्तु हव्या असतात. तेथें मिळवणें नसून कांहीं तरी व्हायचें असतें. काय व्हायचें? ब्रह्माशीं एकरूप व्हायचें. अनन्ताच्या राज्यांत पूर्णैक्य आहे. उपनिषदें सांगतात, " येथेंच जाणून घेशील तर खरें. " ईश्वराच्या राज्यांत कांहीं मिळवायचें नसतें, तर व्हायचें असतें. शब्दाचा केवळ अर्थ समजून भागत नाहीं तर अर्थरूप व्हावें लागतें.

ख्रिस्तानें, 'माझ्या पित्याशीं माझें ऐक्य आहे,' अशी थोर घोषणा केली. ईश्वराप्रमाणें अव्यंग बना, असा अनुयायांना त्यानें उपदेश केला. परंतु ज्या ख्रिस्ताचा धर्म युरोप पाळतें, त्या युरोपला त्या अनंत चिच्छक्तीशीं आपलें ऐक्य आहे हा विचार अजून पटला नाहीं. मनुष्यानें ईश्वर होणें म्हणजे ईश्वराचा उपहास, असें त्यांना वाटतें. ख्रिस्तानेंहि मनुष्यानें मनुष्यत्व विसरून परब्रह्मरूप व्हावें, हें स्पष्टपणें नाहीं सांगितलें. ख्रिस्ती संतांनाहि ही कल्पना अपरिचितच होती. परंतु युरोपमध्येंहि वरील विचार अलीकडे लोकप्रिय होत आहे.

पौरस्त्य ऋषि, ईश्वराचा उपयोग आपल्या रोजच्या कामकाजासाठीं करून घ्यावयाचा आहे, असें कधीं सांगत नाहींत. ऐहिक इच्छापूर्तीसाठीं ईश्वराला मिळवून घेणें हा विचार त्यांच्या मनांत नसे. ईश्वराशीं अधिकाधिक एकरूप होणें ही आपली उंचांतील उंच आकांक्षा असे. या भौतिक सृष्टींत, या

प्रपंचांत आपण वस्तुसंपदा मिळवून मोठे होतों. परंतु आध्यात्मिक सृष्टींत आपण स्वतःला देऊन टाकल्यानें मोठे होत असतों. मिळविण्याची क्रिया मर्यादित आहे. परंतु होण्याची क्रिया अमर्याद आहे. अनंताशीं आपला जो संबंध, आपलें जें साधर्म्य त्यांतून ती ओढ जन्माला येते. अनंताशीं आपला संबंध असल्यामुळेंच परिपूर्णतेचें तत्त्व आपल्या अंतःकरणांत असतें. आपणांस ब्रह्ममय व्हावेंसें वाटतें, पूर्णाला मिठी मारावी असें वाटतें. त्या परमोच्च पूर्णतेचा अनुभव जीवनांत आम्हांला कधींच घेतां येणार नसेल, तर आमचें अस्तित्व निरर्थक आहे. ध्येयाचें दर्शन कधींच घडणार नसेल, तर तें ध्येयच नव्हे.

ब्रह्म आणि जीव यांच्यांत का फरक नाहीं ? फरक आहे. त्याला अज्ञान म्हणा, माया म्हणा, भ्रम म्हणा, परंतु तो फरक आहे. ब्रह्म म्हणजे ब्रह्म. पूर्णतेचें अनंत ध्येय म्हणजे ब्रह्म. तेंच आपलेंहि खरें स्वरूप. परंतु आपण आज तसे नाहीं आहोंत. आपणांस तसें व्हायचें आहे. ब्रह्मरूप होत जायचें आहे. प्राप्त परिस्थिति व ती ध्येयात्मक स्थिति यांच्या दरम्यान अनंत काळापासून तो प्रेमाचा खेळ चालला आहे. या खोल गूढतेंत सकल सत्याचा नि सौंदर्याचा उगम आहे. या विशाल सृष्टीचा अखंड नाच त्यामुळेंच चालला आहे.

जोरानें पुढें जाणारा प्रवाह आनंदानें व निःशंकपणें गर्जत असतो, " मी समुद्र होणार हो, समुद्र होणार !" ही गर्जना म्हणजे भ्रान्त कल्पना नाहीं, किंवा ही अहंकारमय दर्पोक्ति नाहीं. ही नम्रतेची गर्जना आहे. कारण, तिच्यांत सत्यता आहे. नदीला दुसरें ध्येय नाहीं. तिच्या तीरावर शेतेंभातें, वनें-उपवनें असतात. पुरेंपट्टणें असतात. ती या सर्वांच्या उपयोगी पडते. ती घाण वाहून नेते, अन्न देते, वाहतुकीस उपयोगी पडते. तिचे या सर्वांशीं संबंध असले तरी तिचें आंतडें येथें गुंतत नाहीं. हे तिचे वाटेवरचे तात्पुरते संबंध. ती क्षणभर तेथें घुटमळते, परंतु पुढें जाते. ती वनरूप होणार नाहीं, नगररूप होणार नाहीं. ती समुद्ररूपच होणें शक्य, व ती होईलहि. तिचें तें चंचल, खेळकर, नाचरें पाणी, त्याचा त्या अनंत जलराशीशीं संबंध आहे.

हजारों वस्तूंस स्पर्श करीत नदी पुढें जाते व जेव्हां समुद्रास मिळते तेव्हांच ती कृतार्थ होते.

नदी समुद्र होऊं शकली तरी सर्वस्वीं ती नाहीं होऊं शकणार. जरी तिनें विशाल व रुंद अशा जलाशयाला वेढलें असलें तरी तिला आपण म्हणूं, "तुझा प्रवाह अजून समुद्रांतच विश्रांति मिळावी म्हणून धडपडत आहे. तुझा ओघ समुद्राला कधींहि मर्यादा घालूं शकणार नाहीं."

ज्या अर्थानें नदी समुद्र होऊं शकते, त्याच अर्थानें जीव ब्रह्मरूप होऊं शकतो. नदी अनेक वस्तूंना स्पर्श करीत पुढें जाते, त्याप्रमाणें जीवात्माहि या वस्तुजातांतून अखेर परब्रह्माकडे जातो. सागराला मिळेपर्यंत नदीची धांवपळ; मगच विश्रान्ति व शान्ति. ब्रह्मप्राप्ति झाल्यावर आणखी कोठें मग जायचें उरत नसतें. माझी विश्रान्ति ब्रह्माच्या ठिकाणीं, ही गोष्ट एकदां जीवाला पटली कीं, मग त्याच्या प्रत्येक कृतीला अर्थ प्राप्त होतो. त्याचे सर्व उद्योग त्या इष्ट स्थळीं पोंचण्यासाठीं होऊं शकतात. आपल्या दैनंदिन विकासाला जें अपूर्व सौंदर्य प्राप्त होत असतें तें त्या अंतिम ध्येयाच्या ध्यासामुळें. साहित्य-संगीतादि कलांतून ही रमणीयता प्रकट होत आली आहे.

कवितेंत एक विचार भरून राहिलेला असतो. त्या कवितेंतील प्रत्येक वाक्य त्या विचाराकडे नेत असतें, त्या विचाराला स्पर्श करीत असतें. त्या कवितें-तील मध्यवर्ती कल्पना जेव्हां वाचकांच्या लक्षांत येते, तेव्हां त्याला अपार आनंद होतो. त्या मध्यवर्ती विचाराच्या प्रकाशांत कवितेंतील सर्व भाग प्रकाशित होतात. कवितेंतील प्रत्येक चरणांत त्या मध्यवर्ती कल्पनेचा भाग जर दिसून आला नाहीं, एक सूत्र जर सर्वत्र अनुस्यूत नसेल, तर ती कविता कितीहि चांगली असली तरी नीरस वाटेल. आपल्या जीवनाचा विकास कवितेप्रमाणें आहे. तो अनंत परमात्मा मिळविणें हें जीवाचें ध्येय. आपल्या जीवनाच्या काव्यांतील ही मध्यवर्ती कल्पना. आपले सारे उद्योग मग या ध्येयाकडे नेणारे व्हायला हवेत. ध्येयहीन धांवपळ आपणांस सतावते, पिशाच्चाप्रमाणें ती मानगुटीस बसते. परंतु ध्येयाच्या ध्रुवताऱ्याला समोर ठेवून जर सर्व कर्मे होत जातील, तर ती केवढी कृतार्थता !

लहानपणीं आम्हांला एक शिक्षक होते. ते संस्कृत व्याकरण आम्हांला मुखोद्गत करायला लावीत. परिभाषेचा अर्थ न सांगतां ते आमच्याकडून घोकून घेत. दिवसामागून दिवस जात होते. परंतु ही घोकंपट्टी कशासाठीं तें आम्हांला कळेना. ध्येयहीन मनुष्य जसा उगीच आदळआपट करीत राहतो, तसें आमचें घोकणें चाललें होतें. ज्याच्या डोळ्यांसमोर ध्येय असतें त्याच्या धडपडीला, अगणित श्रमांना समतोलपणा, हेतुमयता नि म्हणूनच सुंदरताहि प्राप्त होते. धडपड कशासाठीं हें लक्षांत न येईल तर मग कोठला आनंद? कारण सत्याचें दर्शनच नाहीं. जीवाला ब्रह्मरूप व्हायचें आहे ही खरी सत्यता. यांत जीवाचा आनंद. आपल्या सर्व क्रिया ह्या ध्येयार्थ हव्यात.

उपनिषदांत एक अत्यंत विचारप्रवर्तक वाक्य आहे—

" नाहं मन्ये सुवेदेति
नो न वेदेति वेद चित् । "

" त्याचें मला नीट ज्ञान झालें आहे, असें मला वाटत नाहीं. मी त्याला जाणलें कीं जाणलें नाहीं, हेंहि मला कळत नाहीं. " केवळ पांडित्यानें तो अनंत परमात्मा समजून घेतां येणार नाहीं. परंतु तो दुष्प्राप्यच असेल तर त्याचा व आपला संबंध तरी काय? खरी गोष्ट अशी आहे कीं, त्याचें ज्ञान जरी आपणांस झालें नाहीं, तरीहि आपण त्याला ओळखतों. दुसऱ्याच एका औपनिषदिक वाक्यांत हेंच तत्त्व सांगितलेलें आहे,

" यतो वाचो निवर्तन्ते
अप्राप्य मनसा सह
आनन्दं ब्रह्मणो विद्वान्
न बिभेति कदाचन । "

" शब्द, वाणी, मन सारीं त्याच्यापासून मागें मुरडतात. त्याचा आनंद जो जाणतो, तो निर्भय होतो. " बौद्धिक ज्ञान मर्यादित आहे. बुद्धि त्याच वस्तूंचें ज्ञान करून देईल, ज्याचें पृथक्करण करतां येतें. परंतु ब्रह्म पूर्ण आहे. अपूर्ण ज्ञानानें त्या पूर्णाचें ज्ञान होणार नाहीं. मर्यादित ज्ञानानें अमर्याद वस्तूंचें स्वरूप कसें कळणार? परंतु त्या अमर्याद तत्त्वाला, त्या अनन्ताला

प्रेमानें नि आनंदानें जाणतां येईल. आनंद हेंहि एक ज्ञानाचें रूप आहे. परंतु या ज्ञानांत पूर्णता असते. आनंद सर्व जीवनानें अनुभवायचा असतो. ज्ञान-गम्य वस्तूंपासून बुद्धि आपणांस अलग राखते. परंतु प्रेम ज्ञेय वस्तूशीं एकरूप होऊन ज्ञान करून घेतें. जें ज्ञान आनंद नि प्रेम यांच्यामुळें होतें, तें निःसंशय असतें व तत्क्षणीं मिळतें. तें जणूं स्वतःसच अधिक समजून घेणें असतें. अलगपणा उरतच नाहीं. म्हणून उपनिषद् म्हणतें, " मनानें, वाणीनें, बुद्धीनें ब्रह्माला जाणतां येणार नाहीं. त्याला प्रेमानें नि भक्तीनेंच आकळतां येईल. त्याच्याशीं येणारा आपला संबंध ऐक्यरूपच असूं शकेल. त्याच्याशीं समरस होणें, मिळून जाणें—त्याच्याप्रमाणें अव्यंग नि पूर्ण होणें. "

परंतु हें कसें व्हायचें ? ती जी अनंत परिपूर्णता, तेथें पायऱ्या नाहींत. ब्रह्मांत अधिक अधिक वाढत जाणें ही गोष्ट येथें नाहीं. ब्रह्म परिपूर्ण आहे. परमात्म्याचा आपल्या अंतरात्म्यांत साक्षात्कार होणें म्हणजे संपूर्ण पूर्णतेची स्थिति. आपल्या मर्यादित शक्तीनें हळूंहळूं ती स्थिति येईल, असें म्हणतां येणार नाहीं. ईश्वराजवळचा आपला संबंध जर स्वतःच्या श्रमानें साध्य करून घ्यावयाचा असेल, तर तो संबंध सत्यमय असेल याची तरी काय कसोटी ? आपणच निर्माण केलेल्या आधारावर आपणच कसें विसंबायचें ?

खरी गोष्ट अशी कीं, तें दिक्कालातीत तत्त्व आपणांत आहे याची आपणांस जाणीव हवी. उत्क्रान्तीचे सारे दुवे जेथें मिळतात असें तें तत्त्व आपणांत आहे. आत्म्याजवळ परमात्माचें ऐक्य आधींचेंच आहे. उपनिषद् सांगतें :

> सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म
> यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् ।
> सोऽश्नुते सर्वान् कामान् सह
> ब्रह्मणा विपश्चित ॥

" आपल्या अंतरंगांत खोल गुहेंत, त्या हृदयाकाशांत लपून बसलेलें तें ज्ञानरूप, सत्यरूप, अनन्त ब्रह्म जो जाणतो, त्याचें व ब्रह्माचें ऐक्य होतें. ब्रह्मासह सर्व वस्तूंचा तो उपभोग घेतो. "

जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य दुकानांत वस्तु घडवायची तसें नाहीं. परमात्म्यानें जीवरूपी वधूला आधींच माळ घातलेली आहे.

" यदेतत् हृदयं मम तदस्तु हृदयं तव । " हें माझें हृदय तुझें असो, हा पवित्र मंत्र पूर्वींच उच्चारला गेला आहे. हें चिरलग्न आहे. तें हळूंहळूं लागायचें आहे असें नाहीं. 'हा' या शब्दाहून ज्याचें अधिक वर्णन करतां येत नाहीं, असा हा 'हा' अनाम, अरूप, प्रत्यक्, परमात्मा, तो सदैव अंतरंगांत आहेच.

एषा अस्य परमा गतिः ।

आपल्या जीवाची परम गति, म्हणजे 'हीच'—शेवटीं त्याला जाऊन मिळायचें.

एषा अस्य परमा संपत् ।

जीवाची सर्वश्रेष्ठ संपत्ति म्हणजे हीच.

एष अस्य परमो लोकः ।

ह्या जीवाचें श्रेष्ठ धाम म्हणजे 'हा'.

एष अस्य परम आनंदः ।

जीवाचा परम आनंद म्हणजे 'हा' होय. असा हा जो 'हा', ह्याच्याशीं जीवाचें परम प्रीतीचें लग्न कालातीत कालीं कधींचें लागलेलें आहे. आतां केवळ प्रेमलीला चालली आहे. लपंडावाचा खेळ आहे. दिक्कालातीत अशा ठिकाणीं जो आधींच मिळालेला आहे, तोच या दिक्कालमर्यादित जीवनांत पुन्हां पाहायचा, अनुभवायचा. जीवरूपी वधूला जेव्हां ही खुबी कळते तेव्हां तिचें हृदय आनंदानें उचंबळून येतें व तिला परम भक्ति लागते. नदी एका टोकाला सागराला मिळालेलीच आहे, परंतु दुसऱ्या टोकाला नेहमीं मिळायचेंच आहे, त्याप्रमाणें एका टोकाला अनंताशीं आपलें परमैक्य जडलेलेंच आहे. हीं दोन्ही टोकें कायमचीं जोडलेलीं आहेत. हें जेव्हां जीवाला समजेल, त्या वेळेस हें सारें जग त्याला कुटुंबवत् वाटेल. कारण तो जगाचा

स्वामी म्हणजे आपला प्रियकर, ही गोष्ट जीवाला कळून येईल. आणि हें एकदां कळून आलें म्हणजे सर्व सेवा प्रेमरूप वाटेल. कष्ट, संकटें म्हणजे प्रियकर घेत असलेली कसोटी वाटेल. आपण सत्त्वपरीक्षेंत उत्तीर्ण होण्याच्या ईर्षेनें सारें सहन करूं. परंतु जोंवर जीवरूपी वधू अंधारांतच रुसून बसून राहील, जगाला प्रियकराहून निराळा मानील, तोंवर तिला स्वातंत्र्य नाहीं. ती राणी होण्याऐवजीं दासी म्हणून रडत राहील.

दौर्भिक्ष्यात् याति दौर्भिक्ष्यम्
क्लेशात् क्लेशं भयात् भयम् ।

दुष्काळांतून आणखी दुष्काळाकडे, या संकटांतून त्या संकटांत, या भीतींतून त्या भीतीकडे असें जीवाला जात राहावें लागेल.

एके ठिकाणीं उत्सव होता. हजारों यात्रेकरू जमले होते आणि रात्र संपून पहाट व्हायची वेळ आली होती. त्या प्रचंड गर्दींत एका गाण्याचा छोटासा चरण मांझ्या कानांवर पडला.

" हे नावाड्या, मला पार ने, परतीराला ने, " अशा अर्थाचा तो चरण होता. आपल्या सर्व कामकाजाच्या गडबडींतून " मला पार ने " हेच शब्द उमटत असतात. भारतांतील गाडीवाला गाडी हांकीत असतो व " पार ने पार ने " म्हणत असतो. फेरीवाला गिऱ्हाइकाला माल विकतो व " पार ने, पार ने " म्हणतो

" हे दीन-बंधु
पार कर कृपा-सिंधु । "

या आर्त स्वराचा अर्थ काय? याचा अर्थ एवढाच कीं, आपण अजून आपलें ध्येय गांठलेलें नसतें. बाहुलीच्या खेळांत जिला आनंद वाटेनासा होतो, अशी मुलगी हृदय पिळवटून म्हणते, " हें नको मला, हें नको. हें तें नव्हे. हें तें नव्हे ! " मग तें दुसरें काय असतें ? कोठें असतें तें दुसरें तीर ? आपणांजवळ जें आहे त्याहून तें भिन्न का आहे ? आपण सर्व कर्में सोडल्यानें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......... वि:
नों: दि: .........



का तो मिळणार आहे ? जीवनाची सारी जबाबदारी फेकून का तो मिळणार आहे ? नाहीं. आपल्या सकल कर्मांच्या अंतरंगीं त्याचाच शोध चाललेला असतो. फुलांतच फळ असतें. मला पलीकडे ने, अशी प्रार्थना ओठ करीत असतात. परंतु हातपाय स्वस्थ नसतात.

हे आनंदसिंधो ! हें तीर नि तें तीर, ही भाषाच झूठ आहे. दोन्ही तीरें एकरूपच आहेत, तुझ्या ठायींच आहेत. माझ्यामध्यें असलेला परिपूर्णतेचा परिमल जेव्हां मी विसरतों तेव्हां " मला परतीराला न्या " असें मी रडत बसतों. माझें सारें हें व सारें तें—तुझ्या प्रेमांत मिळून जायला उत्सुक असतात.

हा माझा क्षुद्र अहं रात्रंदिवस राबत असतो. जें घर खरोखरंच आहे, तेंच मिळावें म्हणून हा " क्षुद्र मी " धडपडत असतो. जोंपर्यंत ह्या घराला तो तुझें घर असें म्हणणार नाहीं, तोंवर बिचाऱ्याची हालअपेष्टांतून सुटका नाहीं, तोंवर हृदय विव्हळेल व " हे नावाड्या, मला पलीकडे ने " अशी आर्त हांक मारीत राहील. ज्या क्षणीं हें माझें घर तुझें होईल, त्याच क्षणीं मी पलीकडे जाईन, तुला मिळेन. मग या जुन्या भिंती सभोंतीं असल्या तरी त्यांची अडचण होणार नाहीं. हा ' मी ' मोठा चळवळ्या, त्याची जी वस्तु नाहीं, जी मिळवणें धर्म नाहीं, तिच्या प्राप्तीसाठीं तो धडपडत असतो. जें वास्तविक सर्वांचें तें आपल्याच दोन हातांनीं पकडून ठेवावें, असें त्याला वाटतें. मग तो दुसऱ्याला दुखावतो नि स्वतःहि दुःखी होतो. आणि " मला न्या रे पलीकडे" असें म्हणत रडत बसतो. ज्या क्षणीं हा 'अहं' म्हणेल कीं, " माझें सारें काम तुझेंच आहे, " त्याच क्षणीं तो परतीराला प्राप्त होतो. इतर सारे उद्योग चालू असूनहि तो स्वतःला परतीरावर बघतो.

हें माझें घर तुझें करूनच मी तुला भेटूं शकेन. भेटण्याची आणखी का जागा आहे ? माझें काम म्हणजे तुझेंच काम असें मी करीन, तर लगेच तुझ्याशीं जोडला जाईन. एरव्हीं कसा बरें जोडला जाईन ! मीं माझें घर सोडलें तर तुझें मला मिळणार नाहीं, माझें काम सोडीन तर तुझ्या कर्मांत

मला सहकार्य करतां येणार नाहीं. कारण तूं माझ्यांत राहतोस व मी तुझ्यांत. माझ्याशिवाय तुला व तुझ्याशिवाय मला अर्थच नाहीं !

म्हणून आमच्या घरांत, आमच्या उद्योगांत, "मला पलीकडे ने" अशी प्रार्थना बाहेर पडते. सागर येथेंच उसळत आहे. परतीरहि येथेंच आपली वाट पाहात आहे. होय, तो अनंत सर्वव्यापी परमात्मा येथें आहे. तो दूर नाहीं. येथें नसेल तर तो अन्यत्र कोठेंहि नाहीं. येथेंच तो आहे !


१०८४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ..................
क्रमांक ........................ नोंः दिः ..................

REFBK-0010848